नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक २१६ * * नागपूर * | बुधवार, दिनांक १३ नोव्हेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

अग्राग्रलेख

## खरीखरी...

### अमरावतीकरांनो, राणांना जाणा !

आज अजित पवार आणि एकनाथ शिंदे या दोघांनीही रवी राणावर टीकेची झोड उठवली. भारतीय जनता पक्षाला अशा लोकांपासून सावधान राहिले पाहिजे, असेही या दोन्ही नेत्यांनी स्पष्ट केलेले. आहे रवी राणा यांच्या तोंडाळपणामुळे आमचा मित्र पक्ष म्हणजे भारतीय जनता पक्षाचे कारण नसताना फक्त नुकसान होत आहे. या मित्र पक्षाच्या नुकसानीची चिंता असल्यामुळेच मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राणावर तोफ डागली असेल. आताच्या घडीला राणाची बायको भारतीय जनता पक्षामध्ये आहे. परंतु, राणा मात्र आपला पक्ष आणि स्वतःचा तोंडाळपणा सोडायला तयार नाहीत. प्रश्न असा आहे की, आपल्याच युतीतील पक्षांमध्ये एकमत नसेल आणि ते कायम टिकवायचे असेल. तर या राणा सारखी बांडगुळे पाळण्याचे काम आपण करू नये. सध्याच्या घडीला महायुतीला जनतेचा चांगला पाठिंबा मिळत आहे. मग हे बिन कामाचे अखंड बडबडणारे रवी राणा भारतीय जनता पक्षाचे नुकसानच करीत आहेत. कोणत्याही परिस्थितीत स्वपक्षातील नेत्यांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न रवी राणा यांना महागात पडेल. हे त्यांनी लक्षात ठेवावे. आज महाराष्ट्रात निवडणुकीच्या धामधुमीत अनेक गोष्टींकडे कानाडोळा करावा लागतो. पण मग अशी वक्तव्ये जनमानसामध्ये जाणून-बुजून पेरण्याचे काम करणारा इसम आपल्याच पाठीत सुरा खुपसण्याचे काम करतो. याचेही दुःख आहे. सध्या भारतीय जनता पक्षात असलेल्या नवनीत राणा 2019 च्या लोकसभेच्या निवडणुकीत उभ्या होत्या. त्यावेळी त्यांना राष्ट्रवादीने पाठिंबा दिला होता. निवडणूक झाली, नवनीत राणा निवडून आल्या. त्या खासदार बनल्या. पण नंतर त्यांनी आपले खास 'दार' किलकिले करून समोरच्या 'आम' दाराने शरद पवारांना टाटा बाय-बाय करून पोबारा केला. अपक्ष असल्यामुळे त्यांचे लक्ष्य कोणते असते. हे सांगायची गरज नाही. दरवर्षी सणासुदीला चार पैशांच्या सामानाचे वाटप केले की, बिचारे गरीब मतदार आपले लाखो-करोडो पेक्षा अमूल्य असलेले मत आपल्याजवळ टाकतात. या भ्रमात कोणीतरी वावरत असावे. अशा परिस्थितीत अमरावती जिल्ह्याच्या बडनेरा मतदार संघातील राणा दांपत्य आता पुढे कोणती कोलांटउडी मारणार आहे? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. तसेही अमरावती जिल्हा वेगवेगळ्या कारणासाठी प्रसिद्ध आहे. अमरावती जिल्ह्याचे राजकारण वेगवेगळ्या पक्षांबरोबर गुरपटलेले दिसते. अशा या वातावरणात आपल्या धनशक्तीच्या बळावर अनेक मतदारांना आकर्षित करण्यासाठी वर्षातून अनेक वेळा राणा उपलब्ध असतात. अशी ही राणाशाही अमरावतीच्या राजकारणात सध्या जोराने नको तसा, नको तितका धुमाकूळ माजवीत आहे. एकूणच ही निवडणूक सहा पक्षांमधील असली. तरी खरे पक्ष दोनच आहेत. त्यामध्ये एक पक्ष मोदींचा आणि दुसरा आघाडीचा आहे. आता घोडा मैदान जवळच आलेले आहे. तेव्हा फारशी खळखळ न करता आपण इमानदारीने आपल्या मताचा उपयोग केला पाहिजे. कारण आपल्याजवळ तेवढेच एक साधन आज शिल्लक आहे. बाकी, सुज्ञांना अधिक सांगणे न लगे!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# भ्रष्टाचार करण्यात आघाडीची पीएचडी

## चिमुरच्या सभेत पीएम मोदी कडाडले

■ महासागर प्रतिनिधी
चिमूर/चंद्रपूर, दि. १२ :

विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात पुन्हा एकदा भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेच्या नेतृत्वातील महायुतीचे सरकार येणार असल्याचा ठाम विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी व्यक्त केला. राज्यात महायुतीचे बहुमताचे सरकार येणार हे स्पष्ट आहे. केंद्र व राज्यात डबल इंजिनचे सरकार असल्यामुळे विकासाचा वेगही दुपटीने वाढेल, असे ते म्हणाले.

मोदी यांची मंगळवारी चंद्रपूरच्या चिमुर विधानसभा मतदारसंघात सभा झाली. या सभेत त्यांनी महायुतीच्या संकल्पपत्राचे कौतुक करत हे संकल्पपत्र महाराष्ट्राच्या पुढील ५ वर्षांच्या विकासाची गॅरंटी असल्याचे स्पष्ट केले.

ते म्हणाले, महायुतीच्या संकल्पपत्रात लाडकी बहीण, शेतकरी, तरुण व महाराष्ट्राच्या विकासासाठी एकाहून एक सरस संकल्प करण्यात आलेत. एआय यूनिव्हर्सिटी असेल किंवा वॉटर ग्रिड प्रकल्प असो, प्रत्येक घराला नळाद्वारे पाणी पुरवठा असेल, पक्के घर असो, डिजिटल कनेक्टिव्हिटी जाळे पसरवणे असो या सर्वांचा यात समावेश आहे. हे संकल्पपत्र पुढील ५ वर्षांसाठी महाराष्ट्राच्या विकासाची गॅरंटी बनेल.



महाराष्ट्राचा वेगवान विकास ही आघाडीच्या हाताबाहेरची गोष्ट आहे. आघाडीने विकासाला ब्रेक लावण्याची पीएचडी केली आहे. कामांना अडवून ठेवण्यात काँग्रेसने डबल पीएचडी केली आहे. आघाडी म्हणजे भ्रष्टाचाराचे सर्वात मोठे खेळाडू हे लक्षात घ्यावे. त्यामुळे पुन्हा त्यांना लुटीचा परवाना मिळवू देऊ नका, असे आवाहन मोदी यांनी यावेळी केले.

महायुतीसोबत केंद्रात एनडीएचे सरकार आहे. त्यामुळे महाराष्ट्रात डबल इंजिनचे सरकार येईल. म्हणजे विकासाचा वेगही दुप्पट वेगाने होईल.

महायुतीचे सरकार किती वेगाने काम करते हे जनता पाहत आहे. पण ही महाविकास आघाडीची जमात या वेगाला कशी खिळ घालते हे चंद्रपूरच्या जनतेला चांगलेच ठावूक आहे. येथील जनता अनेक दशकांपासून रेल्वेची मागणी करत होते. पण आघाडीने त्याकडे दुर्लक्ष केले. आमच्या सरकारने कांपा - वरोरा रेल्वे लाईनला मंजुरी दिली, कामही लवकरच पूर्ण होणार आहे. याचा जनतेलाच फायदा होईल. त्यांचा वेळ व पैसे वाचतील, असे मोदी म्हणाले.




## शिंदे म्हणतात, मी शंभरवेळा तुरूंगात जाण्यास तयार..

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १२ :

राज्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना यशस्वी ठरली आहे. त्यामुळे विरोधकांच्या पोटात दुखायला लागले आहे. ही योजना आमचे सरकार आल्यावर बंद करू, चौकशी करू आणि दोषींना तुरूंगात टाकू, अशी भाषा महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केली. मी लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, लाडक्या शेतकऱ्यांसाठी एकदा नाही, शंभरवेळा तुरूंगात जाण्यास तयार आहे, असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लगावला.

शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे दर्यापूरचे उमेदवार अभिजीत अडसूळ यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. शिंदे म्हणाले, महाविकास आघाडी ही विकास विरोधी आहे. त्यांच्यावर विश्वास ठेवता कामा नये. निवडणुकीत काळात खोटी आश्वासने देतात आणि नंतर मुद्रणदोष असल्याचे सांगून शब्द फिरवतात, हे कर्नाटक, हिमाचलप्रदेशमध्ये दिसून आले आहे. आम्ही लाडकी बहीण योजना सुरू



केली. त्याला भरघोस प्रतिसाद मिळत असल्याचे पाहून आता महाविकास आघाडीने महालक्ष्मी योजनेची घोषणा केली.

याआधी महिलांना कधीही पैसे मिळाले नव्हते. हे अर्थसाहाय्य जात, धर्म पाहून दिली जात नाही. यांना योजना सुरू करायची होतीच तर महाविकास आघाडीच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात त्यांचे हात बांधले होते का, असा सवाल एकनाथ शिंदे यांनी केला.

महाविकास आघाडीच्या सरकारने अडीच वर्षांत अनेक विकास प्रकल्पांना स्थगिती दिली. राज्यात अडीच वर्ष स्थगिती सरकार होते. मात्र, आम्ही हे भ्रष्टाचारी सरकार उलथवून टाकले. महायुतीचं सरकार सत्तेवर आले आणि स्थगिती मिळालेल्या सगळ्या योजना पुन्हा सुरु केल्या, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

### धनुष्य चोरायला ते काही खेळणं आहे का?

उद्धव ठाकरेंनी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे ज्वलंत हिंदुत्ववादी विचार आणि शिवरायांची भूमी असलेल्या महाराष्ट्र राज्यातील साडेबारा कोटी जनतेचा विश्वासघात केला आहे. जनतेच्या मनातील युती सरकार न आणता काँग्रेससोबत गेले. त्यांनी बाळासाहेबांचे विचार आणि धनुष्य काँग्रेसच्या दावणीला नेऊन बांधले आम्ही धनुष्य चोरल्याचा ते आरोप करतात, पण धनुष्य चोरायला ते काही खेळणं आहे का? असा उपरोधिक सवाल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुलढाणा येथील सभेत केला. यावेळी त्यांनी महाविकास आघाडीवर सडकून टीका केली.

## उद्धव ठाकरेंच्या बॅगची सलग दुसऱ्या दिवशी तपासणी

■ वृत्तसंस्था, औसा, दि. १२ :

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या वतीने राज्यभरातील नेत्यांच्या बॅगांची आणि गाड्यांची तपासणी करण्यात येत आहे. वणी येथे उद्धव ठाकरे यांच्या बॅगांची तपासणी झाल्यानंतर राज्यभरात आरोप - प्रत्यारोप सुरू झाले होते. त्यानंतर आज पुन्हा एकदा औसा येथे सभेसाठी जाताना उद्धव ठाकरे यांच्या बॅगांची तपासणी करण्यात आली. आजही उद्धव ठाकरे यांनी व्हिडिओ शूट करत निवडणूक आयोगावर पक्षपातीपणा करत असल्याचा आरोप केला.

ज्या प्रकारे आमच्या बॅगा तपासल्या जात आहेत, त्याप्रमाणेच मोदी, फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे यांच्या देखील बॅगांची तपासणी करा, अशी तंबी यावेळी उद्धव ठाकरे यांनी निवडणूक अधिकाऱ्यांना दिली. तसेच त्यांच्या बॅगांची तपासणी करतानाचा व्हिडिओ त्यांनी आपल्या स्वतःच्या मोबाईल मध्ये रेकॉर्ड केला. यावेळी ते प्रत्येक अधिकाऱ्याला त्याचे नाव आणि तो कोणत्या जिल्ह्यातील राहणार असल्याचा प्रश्न विचारताना दिसून आले.

## मोदींनी संविधान वाचलेच नसेल

■ महासागर प्रतिनिधी
गोंदिया, दि. १२ :

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज गोंदिया येथील सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपवर जोरदार हल्लाबोल केला.

मी गॅरंटीने सांगतो की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संविधान वाचलेच नाही. कारण त्यांनी संविधान वाचले असते, तर त्याचा आदर केला असता. नरेंद्र मोदी आणि आरएसएसचे लोक २४ तास संविधानावर आक्रमण करत आहेत, अशी टीका राहुल गांधी यांनी केली.

राहुल गांधींचा खोचक टोला



राहुल गांधी म्हणाले, मी जेव्हा महाराष्ट्रात येतो, तुमच्या चेहऱ्यांवर काँग्रेसची विचारधारा दिसून येते. संविधानात महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगवान गौतम बुद्ध, नारायण गुरू, बसव आण्णा या सर्वांचे विचार आहेत. शिवाजी महाराजांचे विचार या संविधानात आहेत. संतांचे विचार आहेत. एकता, प्रेम, समानता, प्रत्येक धर्माचाआदर संविधानात आहे. आपण एकमेकांचे जीव घेतले पाहिजे, शिवीगाळ केली पाहिजे, गरीबांचे खच्चीकरण करावे, शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव देऊ नये, असे संविधानात कुठे लिहिले आहे का? लिहिले असेल, तर मला दाखवा, असे राहुल गांधी म्हणाले.

यांनी शेतकऱ्यांचा फायदा केला असता, तर शेतकरी रस्त्यावर उतरला नसता, अदाणीसारख्या उद्योगपतींचे १६ लाख कोटींचे कर्ज भाजप सरकारने माफ केले. पण मोदी यांनी किती शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले? असा सवाल राहुल गांधी यांनी उपस्थित केला.

## काँग्रेसशासित राज्यांमध्ये जनतेची केवळ फसवणूकच

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

### भाजपा नेत्यांनी केली पोलखोल

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी आलेल्या हिमाचल प्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटकमधील काँग्रेस नेत्यांनी प्रत्यक्षात तेथील निवडणुकीत दिलेली कोणतीही आश्वासने पूर्ण केली नाहीत . त्या राज्यांमधील जनतेची फसवणूक केली असा आरोप करीत तेलंगणातील भाजपा नेते जी किशन रेड्डी, शोभा करंदलाजे, अनुराग ठाकूर यांनी मंगळवारी पक्ष कार्यालयात घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत केला.

काँग्रेसची खोटारडेपणाची गाडी आता फिरत फिरत महाराष्ट्रात आल्याचे सांगत शोभा करंदलाजे यांनी पाच गॅरंटी देणाऱ्या काँग्रेसने तेलंगणा राज्यच दिवळखोरीत काढल्याचा आरोप यावेळी केला.

पूर्वी कर्नाटक सरकारवर ४६ हजार कोटींचे कर्ज होते. काँग्रेस सरकारच्या कार्यकाळात ते ८२ हजार कोटींवर पोहोचले.महिलांना मोफत बस प्रवास तसेच मोफत तांदूळ, मोफत वीज देऊ या केवळ घोषणाच राहिल्याचे ते म्हणाले.

## बहिणींचे संरक्षण करण्यात सरकारला अपयश

■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. १२ :

शरद पवारांचा आरोप



सध्याच्या राज्यकर्त्यांना महिला भगिनींचे संरक्षण करण्यात साफ अपयश आल्याची टीका शरद पवार यांनी मंगळवारी महायुती सरकारवर निशाणा साधताना केली. यावेळी त्यांनी मोदी यांच्यावरही निशाणा साधला.

मोदींचा लोकसभेला ४०० जागा जिंकून संविधान बदलण्याचा डाव होता. पण आम्ही तो हाणून पडला. आदिवासी हा कष्ट व शेती करणारा समाज आहे, मग हा वनवासी शब्द कुठून आला? असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला. कळवण - सुरगणा येथील प्रचारसभा ते बोलत होते.

## उद्धव ठाकरेंना आताच सीएम पदाचा चेहरा घोषित करा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :

हरियाणा विधानसभा निवडणुकीतील निकालाची पुनरावृत्ती टाळायची असेल तर महाविकास आघाडीने आत्ताच उद्धव ठाकरे यांच्या नावाची मुख्यमंत्रीपदाचा चेहरा म्हणून घोषणा करावी, अशी मागणी आपचे बडे नेते संजय सिंह यांनी केलीआहे.

संजय सिंह यांनी ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ही मागणी केली आहे. त्यावर मविआतील इतर पक्ष काय प्रतिक्रिया देतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

संजय सिंह म्हणाले, महाविकास

### आपच्या नेत्याची मागणी

आघाडीने आत्ताच आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्याचे नाव घोषित करावे. त्यांनी या प्रकरणी विलंब केला तर त्यांचेच नुकसान होईल. हरियाणात तेच झाले होते. तिथे काँग्रेसमधील गटांनी एकमेकांना पाडण्याचा प्रयत्न केला त्यात काँग्रेसचे जबर नुकसान झाले. त्यामुळे मविआने कुणाचे आमदार जास्त येतील, या भानगडीत पडू नये.

उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये जबरदस्त काम केले आहे. मराठी माणूस व मराठी स्वाभिमान या दोन्ही गोष्टी त्यांच्यासोबत जोडल्या जातात. त्यामुळे त्यांच्या नावाची मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार म्हणून घोषणा केली तर महाविकास आघाडीचा मोठा फायदा होईल असे मला वाटते.

भाजपचा पराभव हेच आम आदमी पार्टीचे एकमेव उद्दीष्ट आहे. त्यामुळेच आम्ही महाविकास आघाडीत जागा मिळूनही त्या घेतल्या नाही, उद्धव ठाकरे यांच्या नावाची सीएमपदाचे उमेदवार म्हणून घोषणा केली तर मतांची हे विभाजन टाळता येईल, असे संजय सिंह म्हणाले.

## ५०२ कोटींची मालमत्ता जप्त

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :

विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांनी १५ ऑक्टोबरपासून बेकायदा पैसे, दारू, अंमली पदार्थ, मौल्यवान धातू आदींच्या विरोधात केलेल्या कारवाईत एकूण ५०२ कोटी ६३ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे.

विधानसभा निवडणुकीत १५ ऑक्टोबर ते १२ नोव्हेंबर २०२४ दरम्यान राज्यभरात सी-व्हिजिल ॲपवर एकूण ५२८६ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी ५ हजार २३० तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या विविध पथकांनी ठाणे जिल्ह्यात अंजूरगाव आणि आलीमघर खाडीमध्ये हातभट्टी केंद्रावर ११ नोव्हेंबर रोजी सामूहिक धाडसत्र मोहिम राबवून एकूण सात गुन्हे नोंदविले आहे. या कारवाईत २०० लीटर क्षमतेच्या ३५४ ड्रम्स, एक हजार लीटर क्षमतेचे तीन बॉयलर आणि अन्य हातभट्टी साहित्याचा मुद्देमाल जप्त केला. सदर माल नष्ट करण्यात आला असून किंमत २० लाख ७५ हजार रुपये इतकी आहे.

## महायुतीचे सरकार आल्यास शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमाफी

■ वृत्तसंस्था, डहाणू, दि. १२ :

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डहाणू येथील सभेत बोलताना मोठे आश्वासन दिले आहे. राज्यात महायुतीचे सरकार आले, तर शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमाफी देण्याचा निर्णय सरकारने घेतला असल्याचे फडणवीस म्हणाले.

यावेळी त्यांनी डहाणूच्या विकासाबाबतही भाष्य केले. वाढवण बंदरामुळे भूमिपुत्रांना रोजगार मिळणार असल्याचे फडणवीस म्हणाले. तसेच डहाणूचा विकास करताना नैसर्गिक संपदा आणि जैवविविधतेवर गदा येणार नाही, असे आश्वासनही त्यांनी दिले.

वाढवणच्या बंदरामुळे डहाणू भागाचे चित्र बदलेल. मासेमारी करणारे कोळी बांधवांवर कोणताही अन्याय होणार नाही. पण आहे त्यापेक्षा चांगली अवस्था आम्ही तुम्हाला आणून देऊ. हा देवाभाऊचा शब्द आहे. तुमच्या पारंपारिक व्यवसायाला नवी उंची कशी मिळेल. याची योजना आम्ही आखली आहे. त्यामुळे पुढील काळात कोळी बांधव समृद्ध झालेले पहायला मिळतील, असा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला.



### फडणवीसांचे आश्वासन

ओवैसीवर हल्लाबोल
फडणवीस यांनी एमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांच्यावर जोरदार हल्लाबोल केलो. मेरे हैदराबादी भाई, उधरी रहना, इधरकू मत आना, इधरकू तुम्हारा कोई कामा नहीं, असे म्हणत हैद्राबादी भाषेत टोला लगावला. अरे सुन ले ओ ओवैसी, कुत्ता भी ना पे** करेगा औरंगजेब की पहचान परङ्खअब तो तिरंगा लहरायेगा पूरे पाकिस्तान पर, असे म्हणत मुंबईतील प्रचार सभांमध्ये फडणवीस यांनी हा हल्लाबोल केला.




## आवरा या वाचाळवीरांना

निवडणुकीचा प्रचार सुरू झाला आणि सर्वच पक्षातल्या नेत्यांना आपले भाषाकौशल्य आजमावण्याची संधी मिळाली. आपण काय काम करणार आहोत, जनकल्याणाच्या कोणत्या योजना राबवणार आहोत हे सांगण्याऐवजी आपल्या विरोधामध्ये उभा राहिलेला उमेदवार किती वाईट आहे, त्याचे चारित्र्य किती वाईट आहे, त्याने आजवर किती वाईट वर्तन केले हे सांगण्यात सारे उमेदवार आणि त्यांचा प्रचार करणारे सारे नेते गुंतले आहेत. दुर्दैव म्हणजे हे बोलणाऱ्यांची जीभ घसरते. ती जाणीवपूर्वक घसरते की अजाणता हे सांगणे कठीण असले, तरी सर्वपक्षीय नेत्यांना आता हा रोग जडला आहे असेच म्हणावे लागेल. भाषण करताना अर्वाच्च शब्द वापरायचे, दुसऱ्याच्या पदाचा, वयाचा, ज्ञानाचा, कशाचाही आदर ठेवायचा नाही. एकेरीने उल्लेख करून कुणाविषयी काहीही बोलायचे. रूप, रंग, दुखणी, आजार, वैयक्तिक नाती, शिक्षण कशावरही काहीही बोलायचे आणि फारच आरडाओरडा झाला तर 'मला तसे म्हणायचे नव्हते' असे म्हणायचे किंवा माफी मागून मोकळे व्हायचे आणि पुन्हा नव्याने गलिच्छ शब्दांमध्ये शेरे झाडायला तयार व्हायचे, असे प्रकार सर्रास बघायला मिळत आहेत. सदाभाऊ खोत, गोपिचंद पडळकर, संजय राऊत, नितेश राणे अशी कितीतरी उदाहरणं या संदर्भात सांगता येतील.

आपण चांगले आहोत हे सांगण्यासाठी दुसरा किती वाईट आहे हे सांगायची मुळीच गरज नसते आणि घाणेरड्या शब्दांचा वापर करून सांगायची तर मुळीच नाही. मोठ्या नेत्यांनो, या वाचाळवीरांना आवरा, नाही तर ते स्वत:बरोबर पक्षाचंही नुकसान करतील. निवडणूका येतात आणि जातात, मात्र हे गलिच्छ शब्द मतदार सहजासहजी विसरत नाहीत. ■■■

## कोकण पट्ट्यात भाजपची इतरांसाठी लढाई

**मागील काळात गुहागर, रत्नागिरी या मतदारसंघांमध्ये भाजपचे चांगले स्थान होते. परंतु आता महायुतीच्या जागावाटपामध्ये शिंदे गटाने चार तर अजित पवार गटाने एक जागा घेतल्याने भाजपला एकही जागा सोडली गेली नाही. त्यामुळे महायुतीतील मोठा पक्ष असलेल्या भाजपमध्ये नाराजी आहे, तर शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या शिलेदाराने उमेदवारी न मिळाल्याने कामच थांबवले आहे.**

रत्नागिरी जिल्ह्यामध्ये गुहागर, चिपळूण, रत्नागिरी, दापोली आणि राजापूर असे पाच मतदारसंघ आहेत. या पाचपैकी चार मतदारसंघांमध्ये एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने उमेदवार दिले आहेत. पहिल्याच यादीमध्ये राजापूर, रत्नागिरी आणि दापोलीमधील मतदारसंघामधील उमेदवार जाहीर केले. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला चिपळूण मतदारसंघ दिला. महायुतीमध्ये गुहागर मतदारसंघावरून भाजप आणि शिवसेनेमध्ये पेच निर्माण झाला होता. हा मतदारसंघ भाजपला सुटेल, असे कार्यकर्त्यांना वाटत होते. तशी भाजपचे माजी आमदार विनय नातू यांनी पक्षश्रेष्ठींकडे फिल्डिंगदेखील लावली होती. यासाठी महायुतीमध्ये वाटाघाटी झाल्या; परंतु एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेचा उमेदवार जाहीर करून टाकला. शिंदे यांच्या शिवसेनेने शेवटच्या टप्प्यात उमेदवार जाहीर केल्याने भाजप कार्यकर्ते चांगलेच नाराज झाले आहेत. गुहागर हा भाजपचा पारंपरिक मतदारसंघ आहे. यावर शिवसेनेने अतिक्रमण केल्याची भावना भाजप कार्यकर्ते आता बोलवून दाखवू लागले आहे. येथे भाजपच्या नाराजीचा फटका शिंदे यांच्या शिवसेनेच्या उमेदवाराला बसणार, अशी उघड चर्चा आता भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते करू लागले आहेत.



कोकणातील प्रमुख आणि महत्त्वाच्या जिल्ह्यांपैकी एक म्हणजे रत्नागिरी. तसे म्हटले तर राजकीयदृष्ट्या शांत; पण अधिक उलथापालथी होत असलेला हा जिल्हा. अणुऊर्जा प्रकल्प, रिफायनरी प्रकल्प, संभाव्य बॉक्साईट उत्खनन यासारख्या प्रकल्पांमुळे प्रसिद्ध असलेला हा जिल्हा. मासेमारी आणि हापूस आंब्यावरदेखील याचे मुख्य अर्थकारण. शिवाय, पर्यटनासाठी मिळणारी पर्यटकांची पसंतीदेखील नजरअंदाज करून चालणार नाही. रत्नागिरी जिल्हा हा शिवसेनेचा बालेकिल्ला समजला जातो. २०१९च्या विधानसभा निवडणुकीमध्ये पाचही जागांवर शिवसेना निवडून आली होती. यंदा पक्षफुटीनंतर चित्र बदलणार का, २०२४च्या विधानसभा निवडणुकीमध्ये कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष आहे. विधानसभा मतदारसंघामध्ये प्रचाराचा ज्वर वाढू लागला आहे. 'होम टू होम' प्रचारावर भर दिला जात आहे.

### रण तापले

रत्नागिरी, राजापूर-लांजा, दापोली-खेड, गुहागर मतदारसंघांमध्ये वडिलांच्या प्रचारासाठी मुले, तर काही मतदारसंघामध्ये मुलांसाठी वडील प्रचाराच्या मैदानात उतरल्याचे चित्र दिसत आहे. रत्नागिरी विधानसभा मतदारसंघामध्ये महायुतीकडून उदय सामंत यांना उमेदवारी दिली आहे. या मतदारसंघावर सलग पाचवेळा सामंत यांचा बोलबाला दिसून आला आहे. सामंत यांच्या प्रचारासाठी त्यांचे वडील रवींद्र ऊर्फ अण्णा सामंत हे प्रचाराच्या मैदानात उतरले आहेत. राजापूर मतदारसंघामध्ये किरण सामंत हे महायुतीकडून उमेदवार आहेत. त्यांच्या प्रचारासाठी त्यांची मुलगी अपूर्वा सक्रिय झाली आहे. तरुणांची मोठी फौज घेऊन ती प्रचाराच्या मैदानात उतरली आहे. वाडीवस्त्यांवर जाऊन मतदारांच्या भेटीगाठी घेत असून वडिलांचा प्रचार करत आहे. सामंत बंधूंनी उमेदवारी पदरात पाडून घेतली आहे.

गुहागर मतदारसंघामध्ये महाविकास आघाडीकडून भास्कर जाधव हे उमेदवार असून त्यांच्या प्रचारासाठी त्यांचे सुपुत्र विक्रांत जाधव हे मतदारसंघामध्ये फिरताना दिसत आहेत. विक्रांत हे जिल्हा परिषदचे अध्यक्ष राहिले आहेत. यामुळे त्यांना मतदारसंघ नवीन नाही. प्रत्येक वाडीवस्तीवर जाऊन ते प्रचार करताना दिसत आहेत. खेड-दापोली मतदारसंघामध्ये महायुतीकडून विद्यमान आमदार योगेश कदम हे मैदानात आहेत. त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीकडून माजी आमदार संजय कदम आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी रत्नागिरी जिल्ह्यामध्ये पाच विधानसभा मतदारसंघासाठी एकूण ३८ उमेदवार रिंगणात आहेत. या सर्वांमध्येच अवघ्या जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या रत्नागिरी विधानसभा मतदारसंघातून ठाकरे गटातील शिलेदार उदय बने यांनी आपला उमेदवार अर्ज मागे घेतला आहे. यासोबतच त्यांनी पक्षाचे काम थांबवण्याचा मोठा निर्णय घेतला असून उद्धव ठाकरेंसाठी हा धक्का मानला जात आहे. बने म्हणाले, की आपण निवडणुकीसाठी कधीही इच्छुक नव्हतो; मात्र अवघ्या कार्यकारिणीने माझ्या नावाची शिफारस केली म्हणून मी तयार झालो. पण उद्धवजींनी मला सांगितले, की माझ्यापर्यंत ही शिफारस आलेली नाही. त्यांनी विनायक राऊत यांनाही विचारले, की ही शिफारस माझ्याकडे का नाही आली; पण आता बास झाले. मी अडीच वर्षे वाट पाहिली, आता मी दमलो आहे. माझे ऑपरेशन झाले, त्यातूनही मी उभा राहिलो आणि पक्षाचे काम करत होतो मात्र आता मी थांबणार आहे. त्यांनी शिफारस पत्रच माध्यमांसमोर उघड केले आहे. शिवसेना नेते मंत्री उदय सामंत यांनी सांगितले की, दोन उदय एकत्र आले तर आम्ही अधिक चांगल्या जोमाने काम करू शकतो. यावर बोलताना उदय बने म्हणाले, की मी त्यांच्याही भूमिकेचे स्वागत करतो. आता जो कोणी चांगले काम करेल त्याला माझा पाठिंबा असेल. मला आता माझ्या विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून समाजकारण करायचे आहे, असे त्यांनी सांगितले. रत्नागिरी येथील विविध जिल्हा परिषद गटातून तब्बल पाच वेळा निवडून आलेले आणि तब्बल तीन वेळा जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष राहिलेले तसेच विविध समित्यांचे सभापती म्हणून काम केलेले उदय बने यांनी पक्षाचे काम थांबवण्याचा मोठा निर्णय घेतल्याने रत्नागिरी विधानसभा मतदारसंघामध्ये आता मोठा ट्विस्ट निर्माण झाला आहे. ■■■

## लातूर जिल्ह्यामध्ये लिंगायत समाज निर्णायक

**लातूर जिल्ह्यामध्ये लिंगायत मतपेढी प्रभावशील मानली जाते. जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघांमध्ये लिंगायत समुदाय मोठ्या संख्येत असून त्यांची मतपेढी या वेळी कोणाच्या बाजूने राहील, यावर जिल्ह्यामध्ये चर्चेचे फड रंगले आहेत. त्यात या वेळी लिंगायत समाजाचा कल बदलण्याच्या शक्यतेचाच सूर अधिक असून मतपेढी कोणाच्या बाजूने कलते याविषयीचे आडाखे बांधले जात आहेत.**

शिवाजीराव निलंगेकर, विलासराव देशमुख, शिवराज पाटील चाकूरकर या दिग्गजांचा जिल्हा म्हणून लातूरची ओळख आहे. हे तीनही नेते काँग्रेसचे. अलीकडच्या काळात संभाजीराव पाटील निलंगेकर यांचे नेतृत्व भाजपत उदयाला आले आहे. खासदार, आमदार आणि मंत्रिपदही भाजपकडेच होती. काँग्रेस पक्षाने या वेळी लिंगायत उमेदवार विधानसभेमध्ये दिलेला नाही तर महायुतीमध्ये भाजपला सुटलेल्या लातूर शहर विधानसभा मतदारसंघामधून लिंगायत समाजातील डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. डॉ. पाटील या काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या स्नुषा आहेत. लातूर शहर विधानसभा मतदारसंघात लिंगायत समाजाची मते ही ५० ते ६० हजारांच्या संख्येने मानली जातात. तर दुसऱ्या क्रमांकावर औसा विधानसभा मतदारसंघ येतो. या मतदारसंघात



साधारणपणे २७ टक्के मराठा व २२ टक्के लिंगायत समाजाची मते आहेत. त्यानंतर निलंगा व उदगीर मतदारसंघामध्ये साधारणत: १२ ते १५ टक्क्यांवर लिंगायत समाज येतो. अहमदपूर आणि लातूर ग्रामीण मतदारसंघामध्ये पाच ते दहा टक्क्यांच्या आसपास येतो. ही आकडेवारी पाहता अनेक ठिकाणी लिंगायत समाजाची मते निर्णायक ठरू शकतात. लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीने लिंगायत समाजातील माला जंगम उमेदवाराला लातूर या आरक्षित मतदारसंघातून प्रतिनिधित्व दिले होते. त्याचा मोठा लाभ महाविकास आघाडीला झाला. २०२४ ला काँग्रेसचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे ६५ हजारांच्या मताधिक्याने विजयी झाले. त्यांनी भाजपचे उमेदवार सुधाकर श्रृंगारे यांचा पराभव केला. २०१९ च्या निवडणुकीमध्ये भाजपचे उमेदवार असलेले श्रृंगारे हे पावणेतीन लाखांच्या मताधिक्याने विजयी झाले होते. निलंगा मतदारसंघातून काँग्रेसतर्फे डॉ. अरविंद भातांब्रे तर औसा मतदारसंघातून काँग्रेसचेच जिल्हाध्यक्ष श्रीशैल्य उटगे यांना उमेदवारी मिळेल, अशी अपेक्षा होती. निलंगा मतदारसंघ महाविकास आघाडीत काँग्रेसकडे मिळूनही काँग्रेसने अरविंद भातांब्रे यांना उमेदवारी न देता अभय साळुंखे यांना दिली, तर औसा मतदारसंघ काँग्रेसऐवजी शिवसेनेकडे गेल्यामुळे श्रीशैल्य उटगे यांची उमेदवारी रद्द झाली. काँग्रेसने फसवणूक केल्याची भावना जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघातील लिंगायत समुदायात पसरली आहे, असे समाजातील काही धुरिणांना वाटते आहे. त्यावरून लिंगायत मतपेढीचा कल या वेळी बदलेल का, याविषयीचे आडाखे बांधणे सुरू आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. लातूर जिल्ह्यामध्ये वेगवान घडामोडी घडत आहे. लातूर जिल्ह्यामध्ये विधानसभेचे सहा मतदारसंघ आहेत, तर लोकसभेचा एक मतदारसंघ आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसचे दोन, राष्ट्रवादी काँग्रेस दोन (सध्या अजित पवार गट) आणि भाजपचे दोन आमदार निवडून आले होते. लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात एकूण १८ उमेदवार रिंगणात आहेत. प्रमुख लढत ही भाजपचे रमेश कराड विरुद्ध काँग्रसचे विद्यमान आमदार धीरज देशमुख यांच्यात होत आहे. लातूर शहर विधानसभा मतदारसंघातून एकूण २३ उमेदवार रिंगणात आहेत. यात प्रामुख्याने तीन मुख्य उमेदवारातच लढत आहे. यामध्ये काँग्रसचे विद्यमान आमदार अमित देशमुख यांच्याविरोधात भाजपकडून डॉक्टर अर्चना पाटील चाकूरकर तर वंचित बहुजन आघाडीकडून विनोद खटके निवडणूक लढवत आहेत. देशमुख व अर्चना पाटील यांच्यात कोण बाजी मारतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### लक्षवेधी लढत

अहमदपूर विधानसभा मतदारसंघामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विद्यमान आमदार बाबासाहेब पाटील यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे विनायकराव पाटील तर भाजपचे बंडखोर उमेदवार गणेश हाके हे निवडणूक लढवत आहेत. उदगीर विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी अजित पवार गटाचे संजय बनसोडे विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट सुधाकर भालेराव यांच्यात लढत होत आहे. भालेराव भाजपतून पवार यांच्या पक्षात दाखल झाले आहेत. निलंगा विधानसभा मतदारसंघामध्ये विद्यमान आमदार संभाजी पाटील निलंगेकर विरुद्ध काँग्रेसचे अभय साळुंखे यांच्यात लढत होत आहे. औसा विधानसभा मतदारसंघामध्ये भाजपचे आमदार अभिमन्यू पवार विरुद्ध शिवसेना ठाकरे गटाचे दिनकर माने निवडणूक लढवत आहेत. आ. पवार हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय आहेत. ■■■

## बंडखोरी अन् लाडक्या बहिणी....
## भंडारा मतदारसंघात 'खेला होबे'



नरेंद्र भोंडेकर | पुजा ठवकर (गजभिये) | नरेंद्र पहाडे | देवांगणा गाढवे (वालदे) | प्रेमसागर गणवीर

अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव भंडारा मतदारसंघातील यावेळची निवडणूक अत्याधिक चुरशीची आणि मतदारांनाही संभ्रमात टाकणारी अशी आहे. महायुती आणि महाविकास आघाडीमध्येही बंडखोरी झाली असून, अपक्षांनी दामटलेले घोडे उधळू लागले आहेत.

२०१९ मध्ये भाजपा-सेनेने हा मतदारसंघ आठवलेंसाठी सोडला तर आघाडीने प्रा. कवाडे यांना दिला. त्यावेळी शिवसेनेचे नरेंद्र भोंडेकर यांनी बंडखोरी करीत अपक्ष म्हणून निवडणूक लढविली आणि विजय संपादन केला. अडीच वर्षापूर्वीच्या सत्तांतरात ते एकनाथ शिंदेंसोबत गेले. अर्थात, शिंदे गटाकडून तेच उमेदवार आहेत. तथापि, नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपविरोधी काम केल्याचा ठपका ठेवत भाजपाच्या एका गटाने त्यांना विरोध चालवला आहे.

भंडारा जिल्ह्याच्या तीन मतदारसंघात साकोली - काँग्रेस आणि तुमसर - शरद पवार राष्ट्रवादी अशी वाटणी असताना भंडारा मतदारसंघ उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडेच राहील, अशी खात्री होती आणि या गटाचे नरेंद्र पहाडे यांनी तशी तयारीही केली. मात्र, जागा वाटपात काँग्रेसने भंडाराही स्वतःकडे ठेवून घेतला. त्यामुळे, बंडखोरी करीत पहाडे सुद्धा खम ठोकून उभे ठाकले आहेत. महायुतीतील असंतुष्टांचे त्यांना पाठबळ असल्याचे बोलले जाते.

काँग्रेस प्रदेशाध्यक्षांच्या सूचनेनुसार भंडारा मतदारसंघात अर्धा डझन इच्छुकांनी वर्षभरापासून तयारी चालविली होती. त्यात तीन दशकांपासून काँग्रेसचे निष्ठावान मानले जाणारे प्रेमसागर गणवीर आघाडीवर होते. परंतु, ऐनवेळी काँग्रेसने पुजा ठवकर (गजभिये) यांना रिंगणात आणल्याने तमाम काँग्रेसी दुखावले आहेत. प्रेमसागर गणवीर यांनी बंडखोरी करीत अपक्ष म्हणून घोडे दामटले आहे.

महायुतीचे अधिकृत उमेदवार आणि बंडखोरांच्या या लढाईत देवांगणा गाढवे (वालदे) यांची एन्ट्री अधिकच रंगत आणणारी ठरू लागली आहे. मतदारसंघाची पुनर्रचना झाल्यानंतर २००९ च्या निवडणुकीत नरेंद्र भोंडेकर शिवसेनेकडून आमदार झाले. २०१४ मध्ये भाजपा - शिवसेना स्वतंत्र लढले. त्यावेळी देवांगणा गाढवे या बसपाकडून रिंगणात होत्या. त्यांनी ४० हजारापेक्षा अधिक मते घेवून धुराळा उडविला. या निवडणुकीत भाजपाचे अॅड. रामचंद्र अवसरे विजयी झाले होते. २०१९ मध्ये देवांगणा गाढवे निवडणुकीपासून दूर राहिल्या असल्या तरी या निवडणुकीत शिरकाव आणि मतदारांपर्यंत पोहचण्याचे, त्यांना आपलेसे करण्याचे कसब त्यांना स्पर्धेत पुढे घेवून जाणारे ठरू लागल्याचे सद्धयातरी दिसून येत आहे.

**समस्या जैसे थे...**

भंडारा विधानसभा मतदारसंघातील यावेळची निवडणूक धनशक्ती आणि कमिशनखोरीच्या विरोधात असल्याचे विरोधक म्हणतात. मागच्या पाच वर्षात भंडारा शहर आणि मतदारसंघातील समस्यांचा निपटारा झाला नाही. दोन वर्षांपूर्वी खोदलेले रस्ते तसेच दुरूस्तीच्या प्रतिक्षेत आहेत. परिणामी, सत्ताधारी महायुतीवर नाराजी असणे स्वाभाविक आहे.

**मत विभाजनाचे षडयंत्र**

बौद्ध बहुल भंडारा मतदारसंघात या प्रवर्गाचा उमेदवार कधीही आमदार झाला नाही. त्यामागच्या कारणांचा उहापोह करण्याची गरज नसली तरी, या प्रवर्गातील अधिकाधीक उमेदवार उभे करून मतविभाजन करण्याचा फंडा नियमीतपणे वापरला जात आहे. यावेळीही तोच प्रकार स्पष्ट दिसतो.

लोकसभा निवडणुकीत सुनील मेंढे या भाजपाच्या बलाढ्य उमेदवाराविरोधात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी डॉ. प्रशांत पडोळे या नवख्या तरूणाला रिंगणात उतरवले आणि निवडूनही आणले. हीच किमया यावेळी नाना पटोले करू शकतील का? संभ्रमाचे वातावरण आहे.

महायुती सरकारच्या लाडकी बहिण योजनेमुळे तमाम बहिणी खुश असल्याचे सांगण्यात येत असले तरी या मतदारसंघात मात्र दोन लाडक्या बहिणींनीच पदर खोचला असून, पुजा ठवकरचा पंजा आणि देवांगणा गाढवेची हातगाडी काय कमाल करणार? कमालीची उत्सुकता लागून राहिली आहे.

## निवडणुका, मीम्स आणि बरंच काही...

निवडणुका प्रचाराचा जोर सुरू झाला तसा सोशल मीडियावरही मीम्स, फोटो आणि गाण्यांनी बहार उडवून दिली. नेत्यांच्या तोंडी नव्या, जुन्या चित्रपटातले गाजलेले संवाद तर नटांच्या तोंडी राजकारणी नेत्यांचे शब्द टाकून प्रसिद्ध होणाऱ्या मीम्समुळे निवडणूक प्रचारांमध्ये वेगळा रंग चढव आहेत. 'दिवार'मधला अमिताभ आणि शशी कपूरचा संवाद पुन्हा एकदा लोकप्रिय झालाय. 'मेरे पास गाडी है, बंगला है, तेरे पास क्या है?' शशी कपूरच्या गदगदल्या आवाजात 'मेरे पास महायुती है...' हे जाहिरातीच्या आवाजात विरून जाते. 'ठाकरे सेनेचा युवराज' हे देखील असेच एक मीम ठरले आहे. तर उद्धव आणि आदित्य ठाकरेंचा 'यांचं ठरलंय, पोटापाण्यासाठी आता हेच करायचंय' हे मीम पण जोरात फिरते आहे. मीम्स बनवणाऱ्यांनी कोणत्याही पक्षाला सोडलेलं नाही. अनेक चित्रपटांच्या लोकप्रिय गाण्यांची विडंबने, टीव्ही आणि रेडिओवरील विविध जाहिरातीदेखील निवडणुकीची धार आणि रंगत वाढवत आहेत. ■■■

## चिन्हाखाली 'न्यायप्रविष्ट' लिहिणारा जगातला एकमेव पक्ष

राष्ट्रवादी पक्षाच्या फुटीनंतर दोन गटांमध्ये वाद सुरू असून घड्याळ चिन्ह अजित पवार गटाला देण्यात आले होते. तेव्हा राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने घड्याळ चिन्हाच्या गैरवापराबद्दल सुप्रीम कोर्टात दाद मागितली होती. त्यावरून सुप्रीम कोर्टाने राष्ट्रवादी गटातला ३६ तासात अस्विकारण पत्रक प्रसिद्ध करायला संगितले होते. त्यानुसार अजित पवार गटाने तसे नवीन हमीपत्र वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित केले. त्यामुळे अजित पवार गटाला 'प्रकरण न्यायप्रविष्ट' असल्याचे त्यांच्या सध्याच्या चिन्हाखाली लिहावे लागत आहे. आता निवडणुकीच्या प्रचारसभांना चांगलाच जोर चढला आहे. नुकतेच राष्ट्रवादीच्या (शरद पवार) जयंत पाटील हे एका प्रचारसभेत म्हणाले, जगात इतके देश आहेत, इतके असंख्य पक्ष आहेत. पण पृथ्वीवर असा पक्ष नसेल की आमचे चिन्ह 'न्यायप्रविष्ट' आहे असे त्याखाली लिहावे लागते आहे. ऑस्ट्रेलियात जा, चीन-पाकिस्तानमध्ये जा, पण अशी वेळ कोणत्याच पक्षावर आली नाही. खरोखरीच असा पक्ष आणि असे चिन्ह वापरणारा हा अवघ्या जगातला एक आणि एकच पक्ष आहे. ■■■

# मनपाच्या पुढाकाराने २०० महिला स्वयंपूर्ण:महिला व बालकल्याण विभागाच्या उपक्रमाने गरजू, विधवांना दिला आधार

**महासागर प्रतिनिधी,**
**अमरावती, दि. १२:** मनपाच्या महिला व बालकल्याण विभागाने शहराच्या विविध भागातील २०० हून अधिक गरजू, निराधार, विधवा महिलांना रोजगार उपलब्ध करून देत आधार दिला आहे. तसेच काही महिलांनी स्वयंरोजगार सुरू केला आहे. या महिला शहरातील विविध संस्था, प्रतिष्ठाने, रुग्णालयांमध्ये नोकरी करत असून, त्यांच्यापासून इतरही विधवा, परित्यक्ता महिलांना प्रेरणा मिळाली आहे.मनपा आयुक्तांच्या मार्गदर्शनात गरजू महिलांना स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. अचानक काही महिलांच्या डोक्यावर आभाळ कोसळले. काहींना कोणताही आधार नसल्याने आर्थिक चणचण सहन करावी लागली.

अशा महिलांना स्वयंपूर्ण करण्यासाठी महिला व बालविकास विभाग सतत प्रयत्नरत आहे.



याअंतर्गत गरजू, परित्यक्ता, विधवा महिलांकडून अर्ज मागवले जातात. याअंतर्गत शेकडो अर्ज मनपाकडे येत असतात.

यापैकी पात्र महिलांना त्यांच्या आवडीनुसार व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यात आले. काही महिलांना नि:शुल्क शिवणयंत्रे देण्यात आली. ज्यांच्या घरी जागा होती त्यांनी घरीच व्यवसाय थाटले. अजूनही मागणीनुसार शिवणयंत्रांचे वाटप सुरू आहे. ज्या महिलांना स्वत:चा लहान ज्या महिलांना स्वत:चा ज्या महिलांना स्वत:चा व्यवसाय थाटण्याची इच्छा होती, त्यांना ५० हजार रुपयांचे भांडवल उभारून देण्याची जबाबदारी महिला व बाल कल्याण विभागाने घेतली. यापैकी १२ हजार ५०० रुपये मनपाने दिले.

प्रशिक्षणाअंती होमगार्ड, मदतनीस, सुरक्षा रक्षक बनल्या महिला ज्यांना व्यवसाय करायचा नव्हता, ज्यांच्याकडे स्वत:ची जागाही नव्हती, अशा महिलांना प्रशिक्षण दिल्यानंतर नोकरी मिळवून देण्यात आली. प्रशिक्षणाअंती होमगार्ड, मदतनीस, सुरक्षा रक्षक बनल्या महिला ज्यांना व्यवसाय करायचा नव्हता, ज्यांच्याकडे स्वत:ची जागाही नव्हती, अशा महिलांना प्रशिक्षण दिल्यानंतर नोकरी मिळवून देण्यात आली.

यापैकी काही महिला सुरक्षा रक्षक, काही होमगार्ड, काही खासगी रुग्णालयात मदतनीस, काहींना मॉल्स, शो रूममध्ये नोकरी मिळवून देण्यात आली. त्यामुळे या महिला आता आत्मविश्वासाने जीवन जगत असून इतरांनाही रोजगार मिळवण्यासाठी मार्गदर्शन करत आहेत.

**गरजू महिलांना आधार देणे हाच उद्देश ; पात्रतेनुसार नोकरीही**

मनपाच्या महिला व बालकल्याण विभागाचा शहरातील गरजू महिलांना रोजगार देणे हाच मुख्य उद्देश आहे. ज्या प्रारंभी स्वयंरोजगार उभा करू शकत नाहीत, ज्यांना बँकाही कर्ज देत नाहीत, ज्यांच्याकडे जागाही नाही अशा महिलांना नि:शुल्क प्रशिक्षण देऊन मॉल्स, खासगी रुग्णालये, शोरूम, कंपन्यांमध्ये त्यांची आवड व शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरी मिळवून देण्यात आली.

**नरेंद्र वानखडे, उपायुक्त, मनपा.**

# खर्च सादर करण्यास अचलपुरातही ५ उमेदवाराची दांडी

**एसडीओंनी बजावली नोटीस**

**महासागर प्रतिनिधी,**
**अमरावती, दि. १२:** अचलपुर विधानसभा मतदारसंघातील २२ पैकी ५ उमेदवारांनी खर्च सादर करण्यास दांडी मारली. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी तथा एसडीओ यांनी त्या उमेदवारांना नोटीस बजावून तासांच्या आंत खर्च सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. धामणगाव मतदारसंघातही याच कारणाहून पाच उमेदवारांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत.



दरम्यान पुढच्या टप्प्यात सर्व उमेदवारांनी ठरलेल्या वेळेवर निवडणूक खर्च सादर करावा, असे आवाहन निवडणूक निरीक्षकांसह निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी केले आहे. या मतदारसंघाची पहिली खर्च तपासणी अलिकडेच पार पडली. यावेळी पाच उमेदवार अनुपस्थित होते.

निरीक्षकांनी हा मुद्दा गंभीरतेने घेतला असून निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार त्यांना नोटीस बजावून खुलासा मागवला आहे.

अचलपुर मतदारसंघात खर्चावर देखरेखीसाठी उमा माहेश्वरी यांची खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पहिली खर्च तपासणी अचलपुरच्या एसडीओ कार्यालयात पार पडली. यावेळी २२ पैकी१७ उमेदवारांनी खर्च सादर केला. अनुपस्थित पाच उमेदवारांना ४८ तासांच्या आत निवडणूक खर्चाचे लेखे सादर करण्याबाबत नोटीस देण्यात आली आहे. दरम्यान विहीत मुदतीत खर्च सादर न केल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. उमेदवरांच्या लेख्याची दुसरी तपासणी ११ नोव्हेंबर, तर तिसरी तपासणी १५ नोव्हेंबर रोजी करण्यात येणार आहे.

**दर्यापुरातही एकाला नोटीस**

दर्यापुर विधानसभा मतदार संघातही एका उमेदवाराने खर्च सादर केला नाही. त्यामुळे अनुपस्थित राहिलेल्या या उमेदवार महिलेला नोटीस बजावण्यात आली आहे. प्रकृती अस्वास्थामुळे आपण ठरलेल्या दिवशी उपस्थित राहू शकले नाही, असे या उमेदवार महिलेचे म्हणणे होते. त्यासाठीची आवश्यक वैद्यकीय दाखलेही त्यांनी पुरवले. त्यामुळे दुसऱ्या दिवशी त्यांच्या निवडणूक खर्चाचे लेखे स्वीकारण्यात आले.

# शेवटचे दोन दिवस प्रचार जाहिरातींचे प्रमाणिकरण

**उमेदवारांना समितीकडून प्रमाणपत्र आवश्यक**

**महासागर प्रतिनिधी,**
**यवतमाळ, दि.१२:** राज्यात विधानसभेसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. आयोगाच्या निर्देशाप्रमाणे निवडणुकीचा दिवस व आदल्या दिवशी वर्तमानपत्रांत प्रसिध्द होणाऱ्या प्रचार जाहिरातींचे प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्ह्यातील विविध मतदारसंघात निवडणूक रिंगणात असलेल्या उमेदवारांनी जाहिरात प्रमाणित करूनच प्रसिद्धीस द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.



वर्तमानपत्रांमध्ये मतदानाचा दिवस व मतदानाच्या आदल्या दिवशी कोणत्याही भडकाऊ, दिशाभूल करणाऱ्या किंवा द्वेषपूर्ण जाहिरातींमुळे कोणतीही अप्रिय घटना घडू नये. निवडणूक प्रक्रियेला खिळ बसेल अशा जाहिराती प्रकाशित होऊ नये, याबाबत दक्षता म्हणून आयोगाने या दिवशी प्रचार जाहिरातींचे प्रमाणिकरण करून प्रसिद्धीस देण्याबाबत दिशानिर्देश जारी केले आहेत. कोणताही राजकीय पक्ष किंवा निवडणूक उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांनी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकींतर्गत मतदानाच्या दिवशी २० नोव्हेंबर रोजी आणि मतदानाच्या एक दिवस आधी म्हणजे १४ नोव्हेंबर रोजी मुद्रीत माध्यमांमध्ये कोणतीही राजकीय जाहिरात प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे.

सदर जाहिरात राज्य, जिल्हा स्तरावरील माध्यमपूर्व प्रमाणिकरण समितीकडून पूर्व-प्रमाणित केली जात नाही, तोपर्यंत वृत्तपत्रात प्रकाशित करुन नये. तसेच राजकीय पक्ष किंवा निवडणूक उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांना या दोन दिवसाच्या कालावधीत मुद्रीत माध्यमामध्ये राजकीय जाहिरात द्यावयाची झाल्यास, अर्जदारांनी सदर जाहिरात प्रकाशित करण्याच्या प्रस्तावित तारखेच्या दोन दिवस आधी माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीकडे अर्ज करावा, असे आवाहन जिल्हाधिका-यांनी केले आहे.

समितीला शेवटच्या दोन दिवसांत यासाठी कटाक्षाने नजर ठेवावी लागणार आहे. या काळात उमेदवाराने उल्लंघन केल्यास समितीकडून नंतर काराई होण्याची शक्यता आहे.

जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन यवतमाळ येथे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात गार्डन हाल येथे जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रन समितीचे कार्यालय आहे. उमेदवारांनी या दोन दिवशी प्रचार, राजकीय जाहिराती वर्तमानपत्रात प्रसिध्द करावयाच्या असल्यास या समितीकडे अर्ज देऊन जाहिरातींचे प्रमाणिकरण करून घ्यावे व त्यानंतरच जाहिराती प्रसिद्धीस द्यावे, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीचे

# देशी कट्ट्यासह एकाला अटक

**महासागर प्रतिनिधी,**
**यवतमाळ, दि.१२:** देशी कट्टा घेवून फिरणाऱ्या एका तरूणाला शहर डीबी पथकाने ताब्यात घेतले. ही कारवाई सोमवारी ११ नोव्हेंबर रोजी दुपारी शहरातील धामणगाव बायपास मार्गावर करण्यात आली. धीरत उर्फ ब्रँड मैद, वय २१ वर्ष रा. वंजारी फैल, यवतमाळ असे ताब्यात घेतलेल्या तरूणाचे नाव आहे.

त्याच्याकडून देशी कट्ट्यासह एक जीवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, शहरातील धामणगाव बायपास मार्गावर धीरत उर्फ ब्रँड मैद हा देशी कट्टा घेवून फिरत होता. याबाबतची गोपनीय माहिती शहर डीबी पथकाला मिळाली. त्यावरून पथकातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी तातडीने धामणगाव बायपास गाठून त्याला ताब्यात घेतले. यावेळी त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्या कमरेला देशी कट्टा आणि एक जीवंत काडतूस आढळून आले. याप्रकरणी पोलिसांनी त्याला देशी कट्ट्यासह ताब्यात घेत शहर पोलिस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हे नोंद केले आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक पियूष जगताप, उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेश बैसाने यांच्या मार्गदर्शनाखाली शहर ठाणेदार सतिश चवरे व डीबी पथकातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी केली.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MOHAMMAD HARUN ABDUL SATTAR.** NOW MY NEW NAME IS **HAROON ABDUL SATTAR.** **ADD :** AT POST FAILTHANA HARISAL,TQ DHARNI,AMRAVATI RURAL -444702



# G. G. DANDEKAR PROPERTIES LIMITED

(Formerly known as G. G. Dandekar Machine Works Limited)
**Regd. Office:** B-211/1, MIDC, Butibori Industrial Area, Village Kinhi, Tal. Hingana, Dist. Nagpur-441122
**Tel.:** (07103) 295109; **CIN:** L70100MH1938PLC002869; **Email:** cs@ggdandekar.com; **Website:** www.ggdandekar.com

**EXTRACT OF STANDALONE AND CONSOLIDATED AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND HALF YEAR ENDED 30TH SEPTEMBER 2024**

(Rs. in Lakhs except EPS)

| Sl. No. | Particulars | Standalone | | | | | Consolidated | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter ended 30.09.2024 | Quarter ended 30.09.2023 | Half Year ended 30.09.2024 | Half Year ended 30.09.2023 | Year ended 31.03.2024 | Quarter ended 30.09.2024 | Quarter ended 30.09.2023 | Half Year ended 30.09.2024 | Half Year ended 30.09.2023 | Year ended 31.03.2024 |
| | | (Unaudited) | | | | (Audited) | (Unaudited) | | | | (Audited) |
| 1 | Total income from Continuing Operations | 105.44 | 155.03 | 192.73 | 251.60 | 398.92 | 98.67 | 125.19 | 185.97 | 221.77 | 369.08 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and /or extraordinary items) from Continuing Operations | (37.46) | 38.13 | (70.67) | 19.03 | (85.72) | (44.23) | 8.29 | (77.43) | (10.80) | (115.56) |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before Tax (after Exceptional and/or extraordinary items) from Continuing Operations | (37.46) | 38.13 | (70.67) | 19.03 | (85.72) | (44.23) | 8.29 | (77.43) | (10.80) | (115.56) |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after Tax (after Exceptional and/or extraordinary items) from Continuing Operations (Consolidated includes share of profit in associate company) | (40.84) | 39.46 | (78.13) | 13.07 | (422.47) | (47.61) | 9.62 | (84.89) | (16.76) | (452.32) |
| 5 | Net Profit (Loss) Before Tax from Discontinuing Operations | - | (12.50) | - | (2.37) | (27.25) | - | (12.50) | - | (2.37) | (27.25) |
| 6 | Net Profit (Loss) from Discontinuing Operations | - | (19.72) | - | (3.31) | (16.99) | - | (19.72) | - | (3.31) | (16.99) |
| 7 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | (40.84) | 19.74 | (78.13) | 9.76 | (433.73) | (37.03) | (12.55) | (73.10) | (41.60) | (435.50) |
| 8 | Equity Share Capital | 47.61 | 47.61 | 47.61 | 47.61 | 47.61 | 47.61 | 47.61 | 47.61 | 47.61 | 47.61 |
| 9 | Earnings Per Share (of Rs. 1/- each) (Not annualized) – | | | | | | | | | | |
| | 1. Basic: | (0.86) | 0.41 | (1.64) | 0.20 | (9.23) | (0.78) | (0.26) | (1.54) | (0.87) | (9.27) |
| | 2. Diluted: | (0.86) | 0.41 | (1.64) | 0.20 | (9.23) | (0.78) | (0.26) | (1.54) | (0.87) | (9.27) |

**Note:**
(a) The above results have been reviewed and recommended by the Audit Committee and approved by the Board of Directors in their respective meetings held on 12 November 2024.
(b) The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly and half yearly Financial Results is available on the website of the Stock Exchange at www.bseindia.com & at Company's website www.ggdandekar.com.

**For and on Behalf of the Board of Directors**
**Pranav Deshpande**
Executive Director
(DIN: 06467549)

**Place:** Pune
**Date:** 12 November 2024

CONCEPT



**ANNEXURE 47**
**FORMAT C-1 TO C-8 AND CA**
**FORMAT C-1**
**(FOR Candidate to publish in news paper, tv)**

**Declaration about criminal cases**

Name and address of candidate - Rajesh Shriram Shrikhade
Name of political party - Janhit lokshahi party
(Independent candidates should write "Independent" here)
Name of election : legislative assembly Constituence general election -2024 name of constituency -49- Savner legislative assembly constituency
Rajesh Shriram Shrikhande : (Name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal records

| Sr no | Name of. court | Case no and dated | Status of case (s) | Section (s) of acts concerned and brief Descriptions of offence |
|---|---|---|---|---|
| 1 | Kalmeshwar | Not applicable | Not applicable | Not applicable |
| 2 | Kalmeshwar | Not applicable | Not applicable | Not applicable |



**Format C-1**

**Declaration about criminal cases**

(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name and address of candidate : SUDHAKAR VITTHALRAO KOHALE**
**156, JANKI NAGAR, UDAY NAGAR CHOWK, RING ROAD**
**NAGPUR-440034**
**Name of political party : Bharatiya Janata Party**
**Name of Election : Maharashtra Legislative Assembly-2024**
**Name of Constituency : Nagpur West -56**

**I SUDHAKAR VITTHALRAO KOHALE,** (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents :

**(A) Pending Criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | J.M.F.C. NAGPUR 125A | 154/2018 | Pending | Reprsentation of People Act-1951 RW IPC 199 for taking stay order on complaint regarding furnishing of false information in election application |
| 2. | District Sessions Court Nagpur | 377/2017 | Pending | 415, 417, 471, 467, 120B, 34 Criminal Complaint of Property |
| 3. | J.M.F.C. NAGPUR 125A | 2249/2017 | Pending | Reprsentation of People Act-1951 RW IPC 199 Complaint regarding giving false information in election application form 2014 |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No. | Name of Court and date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil |
| 2. | Nil | Nil | Nil |
| 3. | Nil | Nil | Nil |

*In the case of election to Council of States or election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of constituency.

**Place : Nagpur**
**Date : 07/11/2024**

**Name & Signature of Candidate**
**(SUDHAKAR VITTHALRAO KOHALE)**

# सहकार महर्षी वसंतदादा पाटील



जयंती विशेष

महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राला एक वेगळे, निर्णायक वळण देऊन विकास साधणारे नेते म्हणजे वसंतदादा बंडूजी पाटील होत. क्रांतिकारक, स्वातंत्र्यसैनिक ते विधायक कार्य करणारे, पक्ष संघटना वाढवणारे राजकीय नेते, प्रभावी मुख्यमंत्री व सहकार महर्षी - असा त्यांचा जीवन प्रवास आपल्याला थक्क करतो.

त्यांचे वडील बंडूजी व आई रुक्मिणीबाई यांच्या पोटी जन्मलेल्या वसंतदादांचे शिक्षण जेमतेम सातवीपर्यंत झाले.सांगली जिल्ह्यातील, मिरज तालुक्यातील पद्माळे या छोट्या गावी जन्मलेले वसंतदादा १९७७ ते १९८५ या काळात चार वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. एकूण सुमारे ४ वर्षे त्यांनी राज्याचे मुख्यमंत्रिपद सांभाळले.

ते काही काळ राजस्थानचे राज्यपालही होते. त्या आधी १९७२ मध्ये ते प्रथम मंत्री झाले होते. तसेच स्वतंत्र भारतातल्या पहिल्या निवडणुकीतच ते सांगलीतून आमदार म्हणून निवडून आले होते. पुढील काळात सुमारे २५ वर्षे त्यांनी सांगलीचेच प्रतिनिधित्व (विधानसभेत व लोकसभेत) केले.

राजकीय जीवनात त्यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, राष्ट्रीय मिल मजदूर संघ, व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस आदी संस्था-संघटनांची अध्यक्षपदे सांभाळली. पक्ष कार्याला त्यांनी विशेष महत्त्व दिले. वसंतदादांनंतर काँग्रेस पक्ष संघटनेला एवढे बळ देणारा नेता पुढे काँग्रेसला महाराष्ट्रात मिळालाच नाही. (तसेच प्रामुख्याने ग्रामीण महाराष्ट्रात काँग्रेसचा प्रभाव कायम राहण्यात व वाढण्यात दादांचाच वाटा मोठा आहे,) असे राजकीय निरीक्षक म्हणतात. सत्तेची हाव नसलेला सत्ताधारी, असे दादांबद्दल म्हटले जाते.

महाराष्ट्राचे नेतृत्व करताना दादांनी अनेक समाजहितकारक, दूरगामी परिणाम साधणारे निर्णय घेतले. १९८३ मध्ये त्यांनी वैद्यकीय, अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतन विद्यालये विनाअनुदान तत्त्वावर स्थापन करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाने शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडवली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध होण्याबरोबरच, या निर्णयामुळे शैक्षणिक व (पयार्याने) औद्योगिक विकासालाही चालना मिळाली. वसंतदादांनी राज्याचा विकासविषयक आढावा घेण्यासाठी अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांची सत्यशोधन समिती नेमली. यातूनच समतोल विकास, विदर्भ-मराठवाड्याचा अनुशेष (बॅकलॉग) अशा संज्ञा पुढे आल्या.

शालेय विद्यार्थ्यांना मोफत एस.टी. प्रवास, परगावी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जेवणाच्या डब्यांची मोफत वाहतूक, शेतकऱ्यांना कमी व्याज दराने कर्जपुरवठा इत्यादी महत्त्वाचे निर्णय दादांनी त्यांच्या काळात घेतले. पाणी अडवा, पाणी जिरवा हे सूत्र प्रथम दादांनी महाराष्ट्रासमोर आणले. दादांच्या या लोकहितकारक निर्णयांची बीजे त्यांच्या देशभक्तीत व त्यांनी केलेल्या क्रांतिकार्यांत आढळतात.

वसंतदादा अगदी लहान वयातही (१९३०) स्वातंत्र्य चळवळीत सामील झाले होते. १९४० पासून त्यांनी लढ्यात जोमाने सहभाग घेतला. फोनच्या तारा तोडणे, पोस्ट जाळणे, रेल्वेचे नुकसान करणे, पिस्तुल-बाँबचा वापर करून ब्रिटिशांमध्ये दहशत निर्माण करणे इत्यादी कामांच्या माध्यमातून त्यांनी सांगली जिल्ह्यात, १९४२ मध्ये आपला ब्रिटिश विरोध प्रखर केला. कायदेभंग चळवळीच्या काळात सोलापूरला चार युवक हुतात्मे झाले. या हौतात्म्याची आठवण म्हणून दादांनी चहा सोडला होता. दादा काही काळ भूमिगत होते. त्यांना सुमारे ३ वर्षे तुरुंगवासही भोगावा लागला.

१९४३ मध्ये दादांनी तुरुंगातून निसटण्याचा प्रयत्न केला असता, त्यांना खांद्याला गोळी लागली होती, व त्यांना पुन्हा तुरुंगवास भोगावा लागला होता. दादांच्या सुटकेसाठी सांगलीकरांनी सभा-मोर्चा या माध्यमातून प्रयत्न केले होते. या प्रयत्नांत रामानंद भारती, बॅ. नाथ पै देखील सहभागी होते. सातारा-सांगली या भागांत दादा स्वातंत्र्यलढ्यात क्रांतिसिंह नाना पाटील, यशवंतराव चव्हाण यांच्याबरोबर आघाडीवर होते. स्वातंत्र्य मिळाल्यावर स्थानिक स्वातंत्र्य-सैनिकांकडून शस्त्रास्त्रे परत घेऊन, त्यांच्यामध्ये विधायक कार्य करण्याची प्रेरणा निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण काम दादांनी केले होते.

वसंतदादांचे महाराष्ट्राच्या उभारणीतील सर्वांत महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी सहकार क्षेत्राचा केलेला विकास व विस्तार होय. त्यांनी सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण विकास, कृषी विकास व कृषी-उद्योग विकास साधण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

कुक्कुटपालन, दुग्धविकास या क्षेत्रांत सहकाराचा प्रसार प्रामुख्याने दादांनी केला. खत कारखाने, सूत गिरण्या, तेल गिरण्या, कागद कारखाने, सिमेंट पाईपचे कारखाने, कृषी अवजारांचे उत्पादन व कृषी प्रक्रिया उद्योग इत्यादी उद्योग राज्यात वसंतदादांनी सहकारी तत्त्वावर सुरू केले.

### वसंतदादा पाटील यांनी भूषविलेली पदे

- महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्ष (१९६५)
- राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे संचालक व अध्यक्ष (१९७०-७२) साखर निर्यात मंडळाचे अध्यक्ष (१९७०-७१) होते.
- राज्य सहकारी बँक, राष्ट्रीय मिल मजदूर संघ या संस्थांचेही अनेक वर्षे अध्यक्ष होते.
- महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली.
- १९६९ साली काँग्रेसचे विभाजन झाले. त्याच वर्षी डिसेंबरमध्ये मुंबईस काँग्रेसचे अधिवेशन झाले. त्यांनी स्वागताध्यक्ष म्हणून काम केले.
- १९७१ मध्ये अमेरिकेतील लुइझिॲना येथे भरलेल्या चौदाव्या आंतरराष्ट्रीय ऊस तज्ज्ञांच्या परिषदेस भारतीय शिष्टमंडळाचे नेते म्हणून हजर राहिले. यापूर्वी तीन वेळा त्यांनी जागतिक प्रवास केला होता.

### वसंतदादा पाटील यांच्या नावाच्या संस्था

- वसंतदादा पाटील साखर कारखाना
- वसंतदादा पाटील शुगर इन्स्टिट्यूट (आधीचे नाव डेक्कन शुगर इन्स्टिट्यूट), वाकडेवाडी (पुणे)
- डॉ. वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यानिकेतन, शुक्रवार पेठ (पुणे)
- पद्मभूषण डॉ वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, पिरंगूट (पुणे)
- वसंतदादा पाटील इंजिनिअरिंग कॉलेज, सायन (मुंबई)
- वसंतदादा पाटील इंजिनिअरिंग कॉलेज, ऑफ बुधगाव (सांगली)
- वसंत दादा पाटील विद्यालय व जुनियर कॉलेज, रहिमतपूर
- पद्मभूषण वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलोजी बुधगाव (सांगली)

१९५६-५७ मध्येच त्यांनी शेतकरी सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली होती. त्या वेळी त्यांनी स्वतःशेतांमध्ये जाऊन ऊस कसा लावायचा, याचे शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक दिले होते. सहकारी साखर कारखान्यांनी साखरेसह उप-उत्पादनांचीही निर्मिती करावी असा आग्रह दादांनी धरला.

कारखान्याच्या परिसरात शिक्षण, आरोग्य, इतर उद्योग व मूलभूत सोयीसुविधा या क्षेत्रांत विकास साधण्यासाठी विकास निधी वेगळा काढण्याची कल्पना त्यांनी रुजवली. त्यामुळे आज महाराष्ट्रात कारखान्यांना जोडून निर्माण झालेली विकास केंद्रे आपल्याला दिसतात. दादांनी डेक्कन शुगर इन्स्टिट्यूटची स्थापना करून संशोधनाला चालना दिली.

याच संस्थेचे नाव आज वसंतदादा पाटील शुगर इन्स्टिटयूट आहे. आज राज्यात छोट्या-मोठ्या सहकारी पतसंस्थांचे जाळे उभे राहिलेले दिसते. यामध्येही वसंतदादांचा मोठा वाटा आहे.

सहकार क्षेत्रातील या अद्वितीय कामगिरीमुळेच १९६७ मध्ये त्यांना पद्मभूषण या पुरस्काराने गौरवण्यात आले. वसंतदादा १९५२ पासून लोकप्रतिनिधी होते, १९७२ मध्ये ते प्रथम मंत्री झाले, व नंतर मंत्री -मुख्यमंत्री असा त्यांचा राजकीय प्रवास झाला. विशेष म्हणजे १९५२ ते १९७२ दरम्यान त्यांनी सहकार क्षेत्रातील बहुतांश कार्य केले.

या पार्श्वभूमीवर दादांनी ज्या काळात सहकार क्षेत्राची पायाभरणी व विस्तार केला तो काळ १९५२ ते १९७२ असल्याचे लक्षात येते. विशेष म्हणजे सत्तास्थानांवर नसताना त्यांनी सहकाराचा प्रचार-प्रसार-विकास केला.

स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच्या विविध प्रकारच्या अनुभवांचे संचित, स्मरणशक्ती, नेतृत्वगुण, संघटनकौशल्य, समाजमन-आकलन शक्ती, निर्णयक्षमता, शेतकरी व ग्रामीण समाजजीवनाची अचूक, परिपूर्ण जाणीव - इत्यादी गुणांच्या आधारे वसंतदादांनी महाराष्ट्राचा विकास साधला.

१९१८ मध्ये प्लेगच्या साथीत दादांच्या आई-वडिलांचा एकाच दिवशी मृत्यू झाला होता. त्या वेळी केवळ एक वर्षाचे असणाऱ्या दादांचा सांभाळ, पुढील आयुष्यात त्यांच्या आजीने केला होता. या परिस्थितीत दादा जास्त शिकू शकले नाहीत. पण पुढील आयुष्यात त्यांनी केलेल्या विकास-कार्याची फळे आज महाराष्ट्र चाखतो आहे. म्हणूनच फार शिकू न शकलेला, पण तरीही सर्वांत शहाणा नेता या समर्पक शब्दांत त्यांचे वर्णन केले जाते.

---

# इतर वेळेच्या फटाके बाजीवर देखील बंदी घाला

फटाके आणि दिवाळी हे समीकरणच आहे. दरवर्षी दिवाळीत मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात त्यामुळे वायू प्रदूषण तर होतेच, पण त्यासोबतच ध्वनी प्रदुषण देखील होते. फटाक्यांचे केवळ इतकेच दुष्परिणाम आहेत असे नाही तर याशिवायही अनेक दुष्परिणाम फटाक्यांमुळे होतात.

म्हणूनच दरवर्षी दिवाळी आली की शासकीय यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटना नागरिकांना दिवाळीत जास्त फटाके वाजवू नका असे आव्हान करतात. फटाकेमुक्त दिवाळी साजरी साजरी व्हावी यासाठी विविध उपक्रम राबवले जातात.

शाळा, कॉलेजमधून त्याबाबत जनजागृती केली जाते. फटाक्यांचे दुष्परिणाम समजावून सांगितले जातात आणि ते योग्यही आहे, त्याची गरजही आहे. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करणे ही काळाचीच गरज आहे. फटाक्यांमुळे अनेक दुष्परिणाम होतात. सरकारी यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटनांच्या आव्हानांना आणि प्रयत्नांना बऱ्यापैकी यशही मिळत आहे.

यावर्षी दिवाळीत फटाके वाजले मात्र मागील वर्षीच्या तुलनेत त्याचे प्रमाण कमी होते. फटक्यांबाबत नागरिकांची जनजागृती होतेय ही अतिशय चांगली गोष्ट आहे. फटाक्यांच्या दुष्परिणामाबाबत नागरिक जागरूक होत आहे ही स्वागतार्ह बाब आहे. याबाबत सरकारी यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटनांचे अभिनंदनच करायला हवे तसेच नागरिकांचेही आभार मानावे लागेल.

नागरिकांनी दिवाळीत फटक्यांबाबात जी जागरूकता दाखवली ती इतर वेळेसही दाखवायला हवी. कारण आपल्या देशात केवळ दिवाळीतच फटाके वाजवले जातात असे नाही तर वर्षभर कोणत्या ना कोणत्या कारणांनी फटाके वाजवले जातात मग तो सण उत्सव असो की आनंदाचं प्रसंग. फटाके वाजवूनच सण - उत्सव, आनंदाचे क्षण साजरे करण्याची प्रथाच पडली आहे.

काही लोक नवीन वर्षाचे स्वागत फटाक्यांच्या आतषबाजीने करतात. ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री कानठळ्या बसतील इतकी फटाके वाजवली जातात. थर्टी फर्स्ट साजरा करताना उन्माद दाखवण्याच्या खटाटोपात नागरिक फटकेबाजी करतात.

नाताळच्या रात्रीही फटाके वाजवले जातात. ईदच्या दिवशी चांद दिसला की फटाके वाजवली जातात. वाढदिवस साजरा करताना फटाके वाजवण्याचे फॅड हल्ली सुरू झाले आहे. लग्नातही फटाक्यांची आतषबाजी पाहायला मिळते.

दिवाळीत फटाके वाजवू नका असे आव्हान करणाऱ्या राजकीय नेत्यांच्या राजकीय मेळाव्यात, विजयी मिरवणुकांतही फटाक्यांची मोठ्या प्रमाणात आतषबाजी होते. दिवाळीत जास्त फटाके वाजू नयेत यासाठी प्रयत्न करणारे या इतर वेळी केल्या जाणाऱ्या फटाकेबाजीकडे मात्र सोईस्करपणे दुर्लक्ष करतात.

दिवाळीच्या पाच दिवसांच्या फटाक्यांमुळे जे दुष्परिणाम होतात तेच इतर वेळेच्या फटाकेबाजीतही होतात. त्यामुळे या इतर वेळेच्या फटाक्यांच्या आतषबाजीवर देखील बंधने घातली पाहिजेत.

नागरिकांनीही फटाके वाजवूनच आनंद साजरा केला पाहिजे ही मानसिकता बदलायला हवी. नागरिकांनी फटक्यांबाबत जी जागरूकता दिवाळीत दाखवली ती वर्षभर दाखवायला हवी.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

---

# मिरगी : जगातील २०% रुग्ण भारतात

दंगल गर्ल फातिमा सना शेख नुकतीच तिच्या एपिलेप्सी (मिरगी) या आजाराबद्दल बोलली आहे. तिने एका मुलाखतीत सांगितले होते की, दंगल चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान तिला तिच्या आजाराची माहिती मिळाली. तिने असेही सांगितले की सुरुवातीला काही दिवस तिला मिरगीसारखा आजार होऊ शकतो हे तिला मान्य नव्हते. सुरुवातीला तिने यासाठी कोणतेही औषध घेतले नाही.

तिला सेटवर अचानक मिरगीचा झटका येऊ शकतो, अशी भीती वाटत होती. याचे कारण म्हणजे मिरगीबद्दल लोकांमध्ये जागरुकता नाही. लोकांना असे वाटते की त्याने ड्रग्ज घेतले असावे किंवा त्याला भुतांनी पछाडले असावे.

एपिलेप्सी ही एक न्यूरोलॉजिकल स्थिती आहे. यामध्ये चेतापेशी योग्य प्रकारे सिग्नल देणे थांबवतात, त्यामुळे फेफरे पुन्हा पुन्हा येतात. मिरगी दरम्यान, मेंदूतील विद्युत क्रिया खूप तीव्र होतात. या काळात व्यक्तीचे शरीर विचित्र पद्धतीने वाकू शकते. त्याला झटके येऊ शकतात आणि या दरम्यान तो बेशुद्ध देखील होतो.

वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या म्हणण्यानुसार, जगात सुमारे 5 कोटी लोक मिरगीने ग्रस्त आहेत. भारतात जवळपास एक कोटी लोकांना मिरगीचा सामना करावा लागत आहे. याचा अर्थ असा की जगातील 20% एपिलेप्सी रुग्ण एकट्या भारतात आहेत.

**एपिलेप्सी म्हणजे काय?**

एपिलेप्सी हा मेंदूचा आजार आहे. यामध्ये आपल्या चेतापेशींच्या सिग्नलिंग पॉवरवर परिणाम होतो. हे मेंदूच्या पेशींच्या नुकसानीमुळे होते. यामुळे, मेंदूच्या पेशी असामान्य विद्युत सिग्नल तयार करू लागतात, त्यामुळे झटके येतात.

**अपस्मार का होतो?**

अपस्मार (मिरगी) कोणालाही कधीही होऊ शकतो. ७०% प्रकरणांमध्ये त्यामागील कारणे अचूकपणे सांगता येत नाहीत. तथापि, काही प्रकरणांमध्ये असे दिसून आले आहे की जर



एखाद्याच्या पालकांपैकी एक किंवा दोघांना अपस्मार असेल तर त्या व्यक्तीला देखील अपस्माराचा त्रास होतो.

काही प्रकरणांमध्ये, असे दिसून आले आहे की डोक्याला दुखापत झाल्यामुळे अपस्माराचे दौरे होतात. ब्रेन ट्यूमर, स्मृतिभ्रंश आणि पक्षाघात झाल्यास मेंदूच्या पेशी खराब होतात, असे डॉ.बिप्लब दास सांगतात. याचा परिणाम सिग्नलिंगवर होतो. म्हणून, या वैद्यकीय स्थितींमध्ये मिरगी देखील होऊ शकते.

**एपिलेप्सीची लक्षणे कोणती?**

एपिलेप्सीमुळे सहसा फेफरे येतात. या काळात व्यक्ती चेतना गमावते. त्याच्या शरीराचे स्नायू अनियंत्रित होतात आणि शरीर विचित्र पद्धतीने कडक होऊ शकते. यावेळी, शरीरात थरकाप आणि थरथरणे असू शकते.

अपस्मार किरकोळ असल्यास, गोंधळाची तात्पुरती स्थिती उद्भवू शकते. कधीकधी असे होऊ शकते की एखादी व्यक्ती एका जागी बराच वेळ टक लावून पाहत राहते. त्याला अचानक खूप गरम किंवा थंड वाटू शकते. जेव्हा एपिलेप्सीची समस्या गंभीर होते तेव्हा फेफरे येतात आणि स्थिती खूप वाईट होऊ शकते.

**एपिलेप्सीचे ट्रिगर पॉईंट काय आहेत?**

डॉ. बिप्लब दास म्हणतात की एखाद्या व्यक्तीला आठवड्यातून एकदा अपस्माराचे झटके येण्याची शक्यता असते, तर दुसऱ्या व्यक्तीला दिवसातून अनेक वेळा झटके येऊ शकतात. असे घडते कारण दुसऱ्या व्यक्तीची जीवनशैली आणि आहारामुळे अपस्माराचा झटका येतो.




(उर्वरीत भाग पुढील अंकी)

---

# जीवनाचा रंगमंच..!

सौ. चैताली संगोपाल वरघट
मूर्तिजापूर, जि. अकोला
9834583685

रंगमंच म्हणजे अशी भूमी किंवा अशी जागा जेथे प्रत्यक्ष नाटकाचा प्रयोग होतो. ज्या ठिकाणी नाटकाचा प्रयोग होतो त्याला रंगमंच असे म्हणतात. पण नाट्यगृहाचे त्याच्या रंगमंचाचे स्वरूप काय असावे. रंगमंचाची रचना किंवा बांधणी कशी असावी याविषयीचा तपशील ठरलेला असतो.

रंगमंचाला इंग्रजीत 'स्टेज' असे म्हणतात. स्टेज वर प्रत्येकाला परफॉर्म करावा असे वाटतं असते . यालाच मराठीत आपण रंगमंच असे म्हणतो. रंगमंचा विषयक कल्पना सतत बदलत गेलेल्या आहेत. नाटक, नाट्यगृह आणि रंगमंच यांचा निकटचा परस्पर संबंध आहे. रंगमंचावर नृत्य केले जातात. नाटक केले जातात. खेळही खेळले जातात. वेगवेगळ्या कार्यक्रमाचे सोहळे साजरे केले जातात.'रंगमंच' हा शब्द रंग आणि मंच या दोन शब्दांपासून तयार झालेला आहे.

रंगमंच हा कलाकार किंवा कलाकारांसाठी जागा आणि प्रेक्षकांसाठी केंद्रबिंदू म्हणून काम करत असतो. प्रेक्षक रंगमंचाच्या चारही बाजूला असतात. जीवनाच्या रंगमंचाचा विचार केला तर असे लक्षात येते कीं जीवनाचा रंगमंच हा खूप वेगळा आहे, हे सत्य आहे की जीवन खरच एक रंगमंच आहे आणि त्या रंगमंचावर उपस्थित असणारे तुम्ही, आम्ही आहोत.

जीवनाच्या रंगमंचावर कितीतरी अभिनय आयुष्यात करावे लागत असतात. प्रत्येक व्यक्ती स्त्री असो वा पुरुष सर्वांनाचं आयुष्यात जीवन जगत असताना आपल्या जीवनाच्या रंगमंचाचा नट म्हणून आपलं पात्र चांगल्या प्रकारे सांभाळावं लागते. जीवनाच्या रंगमंचावर रोज अभिनय करावा लागतो. प्रत्येक व्यक्तीला आपल्या धैर्यापर्यंत पोहोचण्यासाठी सतत संघर्ष करावा लागतो. व्यक्तीला जीवनाच्या रंगमंचावर अभिनय करत असताना कधी माया, प्रेम, दया दाखवावी लागते. तर कधी गुन्हेगारी, कोणाची फसवणूक ही करावी लागते.

प्रत्येक व्यक्ती हा महत्वकांक्षा बाळगत सतत धडपडत असतो. रंगमंचावर असणारे अनेक व्यक्ती हे रंगीत असतात. कोण, कधी, कसा आणि केव्हा रंग बदलेल हें सांगता येत नाही. जीवन हे एक रंगमंच आहे आणि या रंगमंचावर आपण रोज कसे वागलो, कसे बोललो, कसे राहतो हे सगळे एका अभिनयाच्या स्वरूपात करत असतो. आपला अभिनय बघणारा डायरेक्टर प्रत्येकांच निरीक्षण करत असतो. कोणाचे कर्म कसे आहे हें बघून किती पाप पुण्य द्यायचे हे आपलं निरीक्षण करणारा डायरेक्टच्या हातात असते. म्हणून या रंगमंचावर पापाचा भागीदार होऊ नका. सत्य बोला, खोटे बोलू नका, कोणालाही फसवू नका, स्वतःशी इतरांशी प्रामाणिक राहा.

जिथे आपल्यासोबत वाईट होत असेल तिथे चांगले वागून फायदा नसतो. म्हणून जशास तसे रहा. जीवनाच्या रंगमंचावर आजूबाजूचे प्रत्येक जण आपले मित्रपरिवार, नातेवाईक, तर बरेच अनोळखी आहेत. पण ते आपले नसतात. प्रत्येकाला स्वतःची पडलेली असते. म्हणून आपण सर्वात अगोदर स्वतःवर प्रेम करावे, स्वतःच्या अस्तित्वावर सर्व साध्य करण्याचा, मिळण्याचा प्रयत्न करावा. कोणावरही अवलंबून राहू नये. सहकार्य भावं निरंतर मनात असावा. अडचणीत, दुःखात असणाऱ्या लोकांना मदद करावी, आपली सहकार्य वृत्ती असावी. रंगमंच म्हणजे जीवन आहे. रंगमंचावर जशी सुरुवात होते आणि शेवटही होतो. तसेच जीवनाच्या रंगमंचावरही सुरुवात होते आणि शेवट सुद्धा असतो. दोन्हीकडे प्रवेश केल्यावर रचनेनुसार प्रत्येकाला आपले विचार ठेवावेच लागतात. हे जर जमत नसेल तर वेळे आधीच बाहेर पडावे लागते, निघावं लागते. दोन्हीकडे प्रवेश केल्यानंतरच आपल्याला समजते, कळते आपल्यासोबत असलेले पात्रेही. मग, भले आपल्याला कितीही एखांद पात्र आवडलेले नसले तरीही त्याचा स्वीकार करावाच लागतो आणि यातच आपण समाधानी आहोत हे समजून अभिनय करावाचं लागतो.

दोन्हीकडे भूमिका आणि भूमिकेची लांबी ही ठरलेली असते. त्यात बदल करणे अशक्य असते दोन्हीकडेही आपली भूमिका संपली की त्यानंतर क्षणभर तेथेही थांबता येत नाही हें अटळ असते. म्हणूनच जीवन हे रंगमंच आहे आणि आपले जगणे हे संपूर्णता कोणाच्या एका दर्शकांच्या हातात असते असे म्हटले जाते. पण एक सत्य हें ही आहे कीं रंगमंचात अभिनय सादर करतांना आपल्याला अगोदरच संपूर्ण माहिती असते.

आपल्याला काय करायचे आहे. आपली भूमिका, आपला पोशाख, आपल्याला काय बोलायचे आहे. एकांदरीत संपूर्ण माहिती आपल्याला मिळालेल्या अपल्या पात्राबद्दल, भूमिकेबद्दल असते. जीवनाच्या रंगमंचाचे तसे नाहीं, येथे आपली भूमिका कोणती, काय बोलायचे, काय करायचे, शेवट कसा होणार. थांबायचे कोठे आहे हें ठरलेलं नसते. जे पात्र येईल ती भूमिका करावी लागते. सर्व काही जीवनाच्या रंगमंचावर अनोळखी असते. आपल्या मनानुसार निर्णय घेऊन किंवा कोणाचे तरी मार्गदर्शन घेऊन मार्ग निवडून पुढे चालत रहावं लागते. किती तरी आपुलकीचे भाव, भावना मनी रुजवून जीवनाचा सुख दुःखाचा प्रवास न थकता पूर्ण करावा लागतो. मनाच्या विरुद्ध काही झाल्यास स्वतःमध्ये सहन करण्याची ताकद, हिम्मत ही ठेवावी लागते. अपयशावर मात करावी लागते. अपल्या यशाचा मार्ग शोधावा लागतो. सतत हसत खेळत रहावं लागते. जीवनाच्या रंगमंचावर समाधानी जीवन जगावं लागते.

*जीवनाच्या रंगमंचावर*
*हतबल होऊन कसे चालणार*
*रंगमंच ठरलेला असतो*
*जीवनाचा कळलेला असतो*
*शेवट जरी सारखा असला*
*एक असलेला माहिती*
*तर, एक अनोळखा असतो*

---

# ४२ मतदारसंघात अमराठी मतांचा बोलबाला

मुंबई मराठी माणसाची या मुद्द्यावर शिवसेना, मनसेचे राजकारण सुरू आहे. दुसरीकडे मुंबईत मराठी माणसाचा टक्का घसरून अमराठी वाढत आहेत. राज्यात अमराठी समाजाची निश्चित टक्केवारी उपलब्ध नसली तरी विविध अभ्यासानुसार ती १३ ते १५ टक्के आहे. ४० ते ४२ मतदारसंघात या मतांचा बोलबाला आहे.

२०११ च्या जनगणनेत भाषेच्या तक्त्यावरून अमराठी भाषिकांची माहिती मिळते. मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगरात उत्तर (उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान), दक्षिण भारतीय (तामिळनाडू, कर्नाटक, केरळ, आंध्र प्रदेश), गुजराती, सिंधी आणि ईशान्येकडील नागरिकांची संख्या वाढत चालली आहे.

डिपार्टमेंट ऑफ मायग्रेशन अँड अर्बन स्टडीज ऑफ इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पॉप्युलेशन सायन्सचे राम बी. भगत यांच्या अभ्यासानुसार १९६१ मध्ये मुंबईत महाराष्ट्रातून स्थलांतरित होणा?यांचे प्रमाण ४१.०६% होते. २०११ मध्ये ते ३७.४%झाले. तर यूपी, बिहारमधून येणाऱ्यांचे प्रमाण १२ वरून २४%, ०.२% हून ३.५ टक्क्यांवर गेले.

**मराठी माणूस घटला**

२०११ च्या जनगणनेनुसार मुंबईत २००१ ते २०११ दरम्यान मराठी मातृभाषा असणारे लोक ४५.२३ लाखांवरून २०११ मध्ये ४४.०४ लाख (२.६४% घट) झाले. याच काळात हिंदी भाषिकांची संख्या २५.८२ लाखांवरून ३५.९८ लाख (३९.३५% वाढ) झाली. गुजराती १४.२८ लाखांवरून १४.३४ लाखांवर पोहोचले.



**अमराठी लोकसंख्या**

1. मुंबई एमएमआर : 55-60% उत्तर भारतीय बंगाली गुजराती सिंधी दक्षिण भारतीय भायखळा कुलाबा सायन-कोळीवाडा अंधेरी पूर्व धारावी मुलुंड भांडूप घाटकोपर माणखुर्द
2. ठाणे : 40-45% : ठाणे कल्याण उल्हासनगर भिवंडी पूर्व
3. नवी मुंबई : 40-45 टक्के गुजराती उत्तर भारतीय सिंधी दक्षिण भारतीय -बेलापूर, ऐरोली, पनवेल
4. पुणे : 25-30% शैक्षणिक आणि कळ हब असल्याने उत्तर भारतीय आणि दक्षिण भारतीय पिंपरी-चिंचवड, हडपसर, वडगाव शेरी, शिवाजीनगर
5. नाशिक : 20-25% : गुजराती, उत्तर भारतीय आणि मारवाडी समाज नाशिक पूर्व, नाशिक मध्य, देवळाली
6. नागपूर : 15-20% : उत्तर भारतीय आणि दक्षिण भारतीय नागपूर दक्षिण, नागपूर मध्य, नागपूर पश्चिम
7. छत्रपती संभाजीनगर : 10-15% : उत्तर भारतीय, गुजराती, सिंधी, मारवाडी छत्रपती संभाजीनगर मध्य व पूर्व 8. जळगाव, सोलापूर आणि कोल्हापूरातही अमराठी लोकसंख्या वाढली आहे.

१९५१ ते २०२४ दरम्यान मुंबईतून निवडून आलेल्या १०० पैकी ४३ खासदार अमराठी. यात काँग्रेसचे २६, भाजपचे ९ तर उर्वरित अन्य पक्षांचे आहेत. विधानसभेला महायुतीने मुंबईत ३६ पैकी १३, मविआने १२ जागांवर अमराठी उमेदवार दिले.

---

## अशोकायन

### क्या हुवा तेरा वादा ?

नेमेची येता ईलेक्शन
धुर्त नेते सोडती
आश्वासनांचे पिल्लू
मतदारांना बनवती
भाऊ उल्लू .. !

मतदार स्वप्नात
जाती रंगुन
वचननामे जाती
हवेत विरुन .. !

क्या हुवा तेरा वादा ?
विचारा आता
रोक ठोक प्रश्न
मतदार दादा !



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# टॅलेंट डेव्हलपमेंट आणि स्किल बिल्डिंगसाठी ॲक्सिस बँकेची अड्डा २४७ सोबत भागीदारी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १२ :
भारतातील खाजगी क्षेत्रातील सर्वात मोठ्या बँकांपैकी एक असलेल्या क्सिस बँकेने कौशल्य-निर्मिती उपक्रमांद्वारे प्रतिभा पाइपलाइन विकसित करण्यासाठी अड्डा २४७ सोबत धोरणात्मक भागीदारी केली आहे. क्सिस बँकेसाठी विक्री, रिलेशनशिप मॅनेजमेंट आणि ग्राहकासमोरील इतर भूमिकांमध्ये उच्च-गुणवत्तेची आणि नोकरीसाठी तयार प्रतिभा सुरक्षित करणे हे या भागीदारीचे उद्दिष्ट आहे.




या भागीदारीद्वारे, क्सिस बँक आणि अड्डा २४७ कुशल बँकर्सची पुढच्या पिढीची भरती, त्यांना ट्रेन करणे आणि तयार करण्यासाठी अनेक उपक्रम राबवणार आहे. या उपक्रमांमळे क्सिस बँकेत यशस्वी करिअर तयार करण्यासाठी तरुण व्यावसायिकांसाठी आवश्यक ज्ञान आणि कौशल्ये यावर लक्ष केंद्रित करून सह-क्युरेटेड आणि उद्देशानुसार तयार केलेल्या शिक्षणांचा आनंद घेता येईल. बँकिंगमधील विविध ग्राहक विक्री आणि सेवा परिस्थितींचा सखोल सराव करून आवश्यक कौशल्ये विकसित करण्यासाठी आणि वास्तविक-जगातील वातावरणात उत्कृष्टतेसाठी शिकण्याच्या आणि अनुभवाच्या वक्रतेला गती देण्याच्या उद्देशाने सिम्युलेशनद्वारे शैक्षणिक प्रवासाची रचना केली गेली आहे.
क्सिस बँकेचे ह्युमन रिसोर्स विभागाचे प्रेसिडेंट आणि हेड राजकमल वेम्पति म्हणाले, क्सिस बँकेत आम्ही तरुणांसाठी पुढाकार घेतो. प्रतिभेचे चित्र बदलत आहे आणि आम्ही तरुण कर्मचारी, ते कुठेही असले तरी त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी वचनबद्ध आहोत. अड्डा २४७ ने त्यांच्या प्रभावी डिजिटल उपस्थितीद्वारे प्रतिभा विकसित करण्यासाठी अनेक प्रगती केली आहे. देशाची लोकसंख्या अधिक आहे. त्यात अड्डा २४७ ची पोहोच आहे. याचा लाभ घेत आम्ही तरुण आणि उत्साही कामगारांच्या क्षमतेचा उपयोग करू शकतो. अड्डा २४७चे फाउंडर आणि सीईओ अनिल नागर म्हणाले, अड्डा २४७ ची सुरुवात २०१० मध्ये बँक पॉवर म्हणून झाली. तेव्हा संस्थापकांनी सार्वजनिक क्षेत्रातील बँकेत नोकरी करू इच्छुणाऱ्यांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. गेल्या १४+ वर्षांमध्ये, अड्डा २४७ ने एक अतिशय विशाल आणि समकालीन डिजिटल फूटप्रिंट आणि सामग्री-चालित इकोसिस्टम तयार करण्यासाठी महत्त्वपूर्ण गुंतवणूक केली आहे. आमची बँकिंग केंद्रित डिजिटल मालमत्ता यासह बँकर्सअड्डा.कॉम आणि संपूर्ण संस्थेने आम्हाला बँकिंग करिअरसाठी आमच्या पवर तयारी करत असलेल्या ९० लाखांहून अधिक तरुण बँकिंग नोकरी इच्छुकांची एक मजबूत कम्युनिटी आणि १.५ लाखांहून अधिक नोकरी इच्छुकांचा दैनिक सक्रिय वापरकर्ता आधार तयार करण्यात मदत केली आहे. या नोकरी इच्छूकांना अतिशय तरुण शिक्षक (सरासरी वय: ३२ वर्षे, ५०% महिला शिक्षक) द्वारे प्रशिक्षित केले जाते जे आमच्या लर्निंग पवरील लाइव्ह क्लासेसद्वारे नोकरी इच्छूकांना गुंतवून ठेवण्यात प्रतिभावान आहेत. आम्हांला खात्री आहे की आम्ही आमच्या दशकांच्या अनुभवाचा, डिजिटल मालमत्तेचा आणि आमच्या लर्निंग पचा क्सिस बँकेसाठी प्रभावी शैक्षणिक सहकार्य करू. अड्डा २४७च्या कौशल्य आणि उच्च शिक्षणाचे सीईओ बिमलजीत सिंग भसीन,, म्हणाला, विक्री, रिलेशनशिप मॅनेजमेंट आणि ग्राहक सेवा या भूमिकांसाठी जॉब रेडी वर्कफोर्स तयार करण्यासाठी ॲक्सिस बँकेसोबत भागीदारी करण्यास आम्ही उत्सुक आहोत.

# टेस्ट द एपिक कारण केएफसी साजरी करत आहे आपल्या लोकप्रिय खाद्य पदार्थांच्या श्रेणीची लज्जत

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १२ : केएफसी = एपिक टेस्ट. आणि तेच आता हा ब्रँड आपल्या अलीकडच्या टेस्ट द एपिक अभियानाद्वारे सांगत आहे. जवळ जवळ तीन दशकांपासून केएफसी ने आपल्या अद्भुत रुचकर क्रिस्पी चिकनने देशातल्या खवैयांना तृप्त केले आहे. या नोव्हेंबरमध्ये केएफसी आपल्या चाहत्यांच्या आवडत्या पदार्थांचा स्वाद साजरा करत आहे. यामध्ये त्यांच्या खास हॉट अँड क्रिस्पी चिकन, हॉट विंग्ज पासून बोनलेस चिकन पॉपकॉर्न पर्यंत आणि पेरी पेरी बोनलेस चिकन स्ट्रिप्सपासून झिंगर बर्गर, रोल्स वगैरेपर्यंत अनेक खाद्य पदार्थांचा समावेश आहे. देशभरातील उपभोक्ते केएफसीची ओळख असलेल्या खास खाद्य पदार्थांच्या अतुलनीय, लाजवाब चवीचा आणि क्रंचचा आस्वाद घेऊ शकतात, टेस्ट द एपिक आजमावू शकतात.




चिकन-प्रेमीरसिकांनो, चिकन ऑन बोन, बोनलेस आणि बर्गर्स अँड मोअर या तिन्ही श्रेणीतील केएफसीच्या तुमच्या आवडत्या पदार्थांनी स्वतःचे लाड करायला तयार व्हा. कारण यामध्ये प्रत्येकाला आवडेल असे काही ना काही आहेच.
चिकन ऑन बोन श्रेणी खवैयांना लाजवाब चवीचा अनुभव देते. केएफसी च्या प्रसिद्ध बकेटमधून त्यांचे खास रसाळ आणि कुरकुरीत हॉट अँड क्रिस्पी चिकन शेअर करून खाताना त्या पदार्थाची लज्जत वाढवते आणि क्रंची हॉट विंग्जमुळे जेवणात स्वादाची भर पडते.
बोनलेस श्रेणी सोयिस्कर आणि प्रवासातही नेता येतील असे स्नॅक्सचे वेगवेगळे पर्याय देते, जसे की एका घासात तोंडात टाकता येतील असे चिकन पॉपकॉर्न आणि कुरकुरीत पेरी पेरी बोनलेस स्ट्रिप्स. बर्गर्स अँड मोअर वेगवेगळ्या प्रकारांत खास केएफसीची चव सादर करते. केएफसी चे चाहते वेगवेगळ्या चिकन रोल्सचा आस्वाद घेऊ शकतात. जगभरातल्या खुमासदार स्वादांनी प्रेरित होऊन हे रोल्स बनवले जातात. उदा. थाय स्पाइसी, कोरियन टँगी, अमेरिकन नॅशविल किंवा इंडियन तंदूरी. या श्रेणीत झिंगर बर्गर्सचे देखील अनेक प्रकार आहेत. या बर्गर्समध्ये तीळ घातलेल्या मऊ बन्समध्ये कुरकुरीत चिकन फिलेट्स आणि चविष्ट सॉस घातलेल्या भाज्या यांचे चवदार संयोजन असते. यांना तुमच्या आवडत्या सुवासिक राइस बोल्झची जोड दिलीत की त्यावर पूर्ण जेवण देखील होऊ शकेल किंवा असेच कधीही खायला देखील ते उत्तम आहे. तर मग केएफसीच्या टेस्ट द एपिक साठी तयार व्हा.

# देशातील तरुणांसाठी कौशल्य विकास मोहिम

## राष्ट्रीय शिक्षण दिनी टोयोटा किर्लोस्कर मोटरचा पुढाकार

■ महासागर प्रतिनिधी,
बंगलोर, दि. १२ :
देशातील तरुणांची कौशल्यातील दरी दूर करत त्यांना रोजगारासाठी सक्षम करण्यासाठी टोयोटा किर्लोस्कर मोटर समुहाने पुढाकार घेत समाजाविषयी आपल्या वचनबद्धतेची पुष्टी केली केली. राष्ट्रीय शिक्षण दिनाचे निमित्त साधून समुहातर्फे संपूर्ण कर्नाटक आणि देशातील आर्थिकदृष्ट्या वंचित तरुणांना सक्षम बनविण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या मोहिमे अंतर्गत टोयोटा किर्लोस्कर मोटर समुहाने शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेतला आहे. रोजगाराचे नवीन मार्ग तयार करताना स्वावलंबनाला चालना देऊन देशाच्या औद्योगिक विकासात योगदान देता यावे, हा त्यामागचा उद्देष आहे.



२००७ मध्ये स्थापन टोयोटा टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट ही टोयोटा किर्लोस्कर मोटर समुहाच्या मिशनचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. गेल्या १५ वर्षांहून अधिक काळात या माध्यमातून ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील तज्ज्ञ आर्थिकदृष्ट्या वंचित घटकातील तरुणांना मोफत, उच्च दर्जाचे शिक्षण प्रदान करीत आहेत. संस्थेमार्फत तीन वर्षांचा निवासी प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जातो. यात तरुणांना केवळ तांत्रिक कौशल्येच प्रदान केले जात नाहीत तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जात आहे. हा निवासी अभ्यासक्रम प्रशिक्षण, जागतिक उत्पादन पद्धतींची सखोल माहिती, भौतिक आणि समुदाय विकासासाठी सक्रिय सहभाग यावर मुल्यांवर भर देतो. ऑटोमोबाईल क्षेत्रातल्या कुशल तंत्रज्ञांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी आणि महिला सक्षमीकरणाला पाठिंबा देण्यासाठी, टोयोटा किर्लोस्कर मोटर समुहाने ने अलीकडेच टोयोटा टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट मधील प्रशिक्षणार्थींची क्षमता १,२०० विद्यार्थ्यांपर्यंत दुप्पट केली आहे. यात ६०० महिला विद्यार्थ्यांसाठी विशेष सुविधा आहेत. संस्था निवासी सुविधा, प्रगत वर्गखोल्या आणि तंत्रज्ञानावर आधारित अत्याधुनिक उपकरणांनी सज्ज आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांसाठी सर्वसमावेशक शिक्षणाचे वातावरण उपलब्ध करून दिले जाते. स्किल इंडियाशी असलेल्या वचनबद्धतेनुसार, टोयोटा किर्लोस्कर मोटर समुहाने शिका आणि कमवा.

# सोनीसबवरील बादल पे पांव है मालिकेतील आपल्या भूमिकेविषयी गौरव शर्मा म्हणता

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १२ :
सोनी सबवरील बादल पे पांव है मालिकेत बानी (अमनदीप सिद्धू) या एका महत्त्वाकांक्षी तरुणीची कहाणी आहे, जी अनेक आव्हानांवर मात करून आपल्या कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीसाठी कटिबद्ध आहे. या कहाणीत गौरव शर्मा या अभिनेत्याच्या एंट्रीमुळे नवीन परिमाण मिळाले आहे. गौरव अलीकडेच माहिर ढिल्लन या यशस्वी तरुण वकिलाच्या भूमिकेत मालिकेत दाखल झाला आहे. माहिर आपल्या मूल्यांचा पक्का आहे आणि बानीविषयी त्याच्या मनात



कोमल भावना आहेत. पडद्यावर बानीशी असलेल्या त्याच्या नात्यापासून ते आपल्याच शहरात, चंदीगड येथे मालिकेचे शूटिंग करण्याच्या अनुभवापर्यंत विविध गोष्टींवर बोलताना गौरवने स्पष्ट केले की माहिरची व्यक्तिरेखा कशी उठून दिसते!

१. माहिर ढिल्लन ही व्यक्तिरेखा कशी आहे? आणि तू या भूमिकेकडे कसा आकर्षित झालास?
माहिर ढिल्लन या चंदीगड येथे राहणारा एक तरुण, मोहक, धनवान आणि अत्यंत यशस्वी वकील आहे. आपल्या दादीवर त्याचे फार प्रेम आहे आणि बानीला पहिल्यांदा बघितले तेव्हाच तो तिच्याकडे आकर्षित झाला होता.मला आव्हानात्मक भूमिका करायला आवडतात आणि माहिर एक आदर्शवादी, सकारात्मक व्यक्तिरेखा आहे. मी अलीकडे शेवटी जी भूमिका केली त्याच्या अगदी विरुद्ध अशी ही भूमिका आहे. या मोठ्या बदलानेच मला या भूमिकेकडे सर्वात जास्त आकर्षित केले.
२. तुझ्या मते माहिरची व्यक्तिरेखा कशामुळे प्रेक्षकांसाठी अनोखी किंवा चार-चौघांसारखीबनते?
आजच्या जगातले तरुण, यशस्वी व्यावसायिक खूप विचारी असतात, आपल्या ध्येयावर त्यांचा फोकस असतो आणि बऱ्याचदा कुटुंब, आरोग्य आणि व्यक्तिगत मूल्यांना ते प्राधान्य देतात. माहिरमध्ये हे सगळे गुण आहेत. तो सच्चा आहे, आत्मविश्वासाने भरलेला आहे आणि व्यवहाराला पक्का आहे.

# फुफ्फुस कर्करोग जागरूकता महिना जागरूकता वाढवून भीती दूर करा

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १२ :
फुफ्फुसाचा कर्करोग हा आजार जगभरातील कर्करोगाच्या मृत्यूच्या प्रमुख कारणांपैकी एक मानला जातो. त्यॉला लवकर ओळख, जोखीम घटकांची चांगली काळजी घेत फुफ्फुसाच्या कर्करोगाशी संबंधित गैरसमज दूर करण्यावर अधिक लक्ष केंद्रित केले पाहिजे, असे आवाहन सर्जिकल ऑन्कॉलॉजिस्ट डॉ. सागर भालेराव यांनी दिला.



नोव्हेंबर हा महिलना जगभर फुफ्फुस कर्करोग जागरूकता महिना म्हणून पाळला जातो. त्यानिमित्त साधलेल्या संवादात डॉ. भालेराव म्हणाले, फुफ्फुसाचा कर्करोग सर्व लोकसंख्याशास्त्रातील पुरुष आणि स्त्रिया दोघांनाही प्रभावित करतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार, हा आजार कर्करोगाचा सर्वात प्राणघातक मानला गेला आहे. जगभरात त्याच्या २ दशलक्षाहून अधिक नवीन प्रकरणांची भर पडते. त्यापैकी दरवर्षी अंदाजे १.८ दशलक्ष मृत्यू होतो. हे मृत्यू आजाराचे उशीराने निदान झाल्यामुळे होतात. कारण या कर्करोगाची प्रगती होईपर्यंत त्याची लक्षणे दिसत नाहीत. त्यामुळे २१ दिवसांपेक्षा जास्त काळ खोकला, सामान्य अशक्तपणा, थुंकीमध्ये रक्ताच्या लहान रेषा, छातीत दुखणे या सामान्य लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका. जे लोक धूम्रपान करतात आणि ज्यांना फुफ्फुसाच्या कर्करोगाचा कौटुंबिक इतिहास आहे, त्यांना जास्त धोका असतो. त्यांनी स्क्रीनिंग पर्यायांसाठी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. फुफ्फुसाचा कर्करोग उपचार करण्यायोग्य आहे. विशेषतः तो लवकर पकडला गेला तर जगण्याची शक्यता लक्षणीय वाढते. स्क्रिनिंग बाबतत समाजात अजूनही जागरूकतेचा अभाव आहे.

## जागतिक मधुमेह दिन

# रक्तातील शर्करेच्या पातळ्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी दैनंदिन आहारामध्ये मूठभर बदामांचा समावेश करा

नागपूर : दरवर्षी नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणारा जागतिक मधुमेह दिन जगभरात मधुमेहाबाबत जनजागृती निर्माण करतो आणि उपलब्ध होण्याजोग्या केअरसाठी गरज व्यक्त करतो. 'जगाची मधुमेह राजधानी' म्हणून ओळखला जाणारा देश भारताला वाढत्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. नुकतेच इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (आयसीएमआर)ने केलेल्या संशोधनामधून निदर्शनास आले आहे की दशलक्ष भारतीयांना



मधुमेह आहे, तर दशलक्ष भारतीय प्री-डायबेटिकआहेत. यामधून, विशेषत: आहारविषयक बदल आणि आपण सेवन करणाऱ्या खाद्यपदार्थांमध्ये बदल करत प्रभावी मधुमेह व्यवस्थापन धोरणांचा अवलंब करण्याचे महत्त्व दिसून येते. यापैकी एक दृष्टिकोन म्हणजे बदामांसारख्या पौष्टिक खाद्यपदार्थांचा समावेश करणे. बदामांमध्ये आवश्यक पौष्टिक घटकांसह प्रोटीन, अनसॅच्युरेटेड फॅट्स व डायटरी फायबर असते. हे पौष्टिक घटक रक्तातील शर्करेच्या पातळ्या नियंत्रणात ठेवण्यास मदत करतात. संशोधनामधून१ निदर्शनास येते की बदाम रक्तातील शर्करेच्या पातळ्या आरोग्यदायी ठेवण्यामध्ये मदत करू शकतात. टाइप मधुमेहाने


# आज का अंदाज

## बुधवार १३ नोव्हेंबर २०२४

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ७ | ८ | २ | ५ | ६ | ७ |
| २९० | १५८ | २२३ | ११६ | ३९० | ३४८ | १७८ | २५० |
| ३८० | ३४७ | ३७७ | २२४ | ४८० | २६७ | ३५८ | १७९ |
| ४७० | २२० | ४४९ | ३७८ | ५७० | १४० | २६८ | ३४० |

जोडी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ४० | ७२ | ८२ | २० | ५० | ६१ | ७१ |
| १९ | ४९ | ७३ | ८३ | २९ | ५९ | ६३ | ७३ |
| १६ | ४६ | ७५ | ८५ | २८ | ५८ | ६४ | ७४ |

## १३ नोव्हेंबर : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ५० | ७० |
| २३ | ३४ | ५९ | ७९ |
| २७ | ३७ | ५८ | ७८ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी ६० पानांचा चार्ट मिळेल. १०० टक्के खात्रीशीर . फक्त सोमवारी मिळेल.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


# आजचे राशिभविष्य

**मेष :** खराब कामगिरीमुळे तुम्हा सर्वांनाच धक्का बसेल. व्यवसायात आज कोणताही चुकीचा निर्णय घेतल्याने धनहानी होईल. गरीब आर्थिक परिस्थितीमुळे कुटुंबात विनाकारण कलह निर्माण होऊ शकतो.

**वृषभ :** स्वत:वर विश्वास ठेवा. कोणाचीही दिशाभूल करू नका. कामाच्या ठिकाणी चढ-उता होतील. अचानक मोठे निर्णय घेतल्याने अडचणी वाढू शकतात. विरोधकांच्या कारस्थानांपासून सावध राहा.

**मिथुन :** आज नोकरीच्या ठिकाणी परिस्थितीनुसार काम करणे फायदेशीर ठरेल. विरोधकांची नकारात्मक प्रवृत्ती टाळा. छोट्या प्रवासाला जाण्याची शक्यता आहे. आर्थिक क्षेत्रात विचारपूर्वक निर्णय घ्या.

**कर्क :** भौतिक सुखसोयींवर पैसे खर्च होतील. आजचा दिवस तुमच्यासाठी सकारात्मक असेल. आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवा. सामाजिक सन्मान व प्रतिष्ठा वाढेल.

**सिंह :** आजच्या दिवसाची सुरुवात चांगली बातमीने होईल. राजकारणात जनतेचा मोठा पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे. कार्यक्षेत्रात तुमच्या व्यवस्थापनाचे कौतुक होईल. नोकरीत नोकरदाराच्या वाहनाची चैनी मिळेल.

**कन्या :** तुम्हाला ऐषारामात अधिक रस असेल. व्यवसायात मंदी राहील. कामात रस कमी जाणवेल. तुम्ही तुमचे काम सोडून इकडे तिकडे विनाकारण भटकत राहाल.

**तुळ :** काही महत्त्वाच्या कामासाठी तुम्हाला घरापासून दूर राहावे लागू शकते. आज आरोग्यात बिघाड होईल. आज तुम्हाला नोकरीत बढतीची चांगली बातमी मिळेल. तुम्हाला तुमच्या नोकरीत पैसे आणि भेटवस्तू मिळतील.

**वृश्चिक :** कोणतेही मोठे निर्णय घाईघाईत घेऊ नका. कुटुंबातील अनेक शुभ धार्मिक कार्ये पूर्ण होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाव्यतिरिक्त इतर गोष्टींकडे जास्त लक्ष देऊ नये.

**धनु :** वडील किंवा वरिष्ठ नातेवाईकांच्या मदतीने कोणत्याही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील. व्यवसायात समर्पण आणि संयमाने काम करा. अपेक्षेप्रमाणे पैसे मिळतील.

**मकर :** आजच्या दिवसाची सुरुवात अनावश्यक धावपळ आणि तणावाने होईल. विनाकारण समाजात तुमचा अपमान होऊ शकतो. कोणत्याही महत्त्वाच्या कामात येणारे अडथळे दूर होतील.

**कुंभ :** आज लांबचा प्रवास टाळा अन्यथा प्रवासात जखमी होण्याची शक्यता आहे. कामाच्या ठिकाणी महत्त्वाच्या नियोजनाची जबाबदारी तुमच्याकडून परत घेतली जाऊ शकते.

**मीन :** आज तुम्हाला जुन्या कर्जातून सुटका मिळेल. व्यवसायात वेळेवर काम करा. उत्पन्न चांगले राहील. व्यवसायात हुशारीने पुढे जावे लागेल. आज तुम्हाला पैसे मिळतील.

## जोडपत्र - ४७

प्रपत्र क- १ ते सी ८ आणि क / सी ए अ : प्रपत्र क- १

**फौजदारी प्रकरणाबाबतचे घोषणापत्र**

माननीय सर्वोच्च न्यायालयाने २०११ ची रीट विनंती याचिका (दिवाणी) क्रमांक ५३६ (पब्लिक इंटरेस्ट फाउंडेशन आणि इतर विरुद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर) या प्रकरणी दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या न्याय निर्णयानुसार

**उमेदवाराचे नाव व पत्ता : श्री. अतुल नामदेवराव वांदिले प्राध्यापक कॉलनी, नंदोरी रोड, हिंगणघाट**

**राजकीय पक्षाचे नाव : नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार )**

**निवडणुकीचे नाव : विधानसभा**

**मतदार संघाचे नाव : ४६ - हिंगणघाट**

मी, अतुल नामदेवराव वांदिले वर नमूद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असून, माझ्या फौजदारी पुर्व चरित्राबद्दलचा पुढील तपशील जनतेच्या माहितीसाठी घोषित करीत आहे.

| अ. क्र. | अ) प्रलंबित फौजदारी प्रकरणे | | |
|---|---|---|---|
| १ | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्रमांक व दिनांक | प्रकरणाची सद्यस्थितीत संबंधित अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे) आणि अपराधाचे (अपराधांचे) थोडक्यात वर्णन |
| १ | मा. न्याय दंडाअधिकारी प्रथम श्रेणी हिंगणघाट | एफ. आय. आर. नं. ८९/२०२४ सध्या स्थितीत दोषारोप पत्र न्यायालयात दाखल झालेला नाही | कलम नं. १४३, १४७, १४८, १४९, ३२४, व ३२६, भा. द. वि. |
| २ | मा. न्याय दंडाअधिकारी प्रथम श्रेणी समुद्रपूर | एफ. आय. आर. नं. ००२/२०२४ सध्या स्थितीत दोषारोप पत्र न्यायालयात दाखल झालेला नाही | कलम १८८ RW, भा. द. वि. १३५ म.पो.का. |
| ३ | मा. न्याय दंडाअधिकारी प्रथम श्रेणी हिंगणघाट | एस. एस. सी. नं. १३४७/२०२१ भा. द. वि. RW, एफ. आर. आर. नं. ६९/२०२१ | कलम १८८, १४३, १३४, म.पो.का. |

| अ. क्र. | ब) फौजदारी अपराधांसाठी दोस्तसिद्ध ठरविलेल्या प्रकरणांचा तपशील | | जास्तीत जास्त ठोठावलेली शिक्षा |
|---|---|---|---|
| | न्यालयाचे नाव व आदेशाचा (आदेशाचे) दिनांक | अपराधाचे (अपराधांचे ) वर्णन व ठोठावलेली शिक्षा | |
| १ | मा. न्याय दंडाअधिकारी प्रथम श्रेणी हिंगणघाट | काही नाही | काही नाही |
| २ | मा. न्याय दंडाअधिकारी प्रथम श्रेणी समुद्रपूर | काही नाही | काही नाही |
| ३ | मा. न्याय दंडाअधिकारी प्रथम श्रेणी हिंगणघाट | काही नाही | काही नाही |

ठिकाण : हिंगणघाट
दिनांक : १३/११/२०२४

सही / -
अतुल नामदेवराव वांदिले

# रेशनकार्ड केवायसीसाठी केंद्राकडून मुदतवाढ

## लाभार्थ्यांची ई-केवायसीवेळेत न झाल्याने शासनाने घेतला निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी,**
**यवतमाळ , दि. १२ :** प्रत्येक शिधापत्रिकाधारकाला ई-केवायसी करणे बंधनकारक केले आहे. शिधापत्रिकेत नावे असलेल्या कुटुंबातील प्रत्येक सदस्याला ई केवायसी पडताळणी प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. याची अंतिम तारीख ऑक्टोबर होती. आता केंद्र शासनाने या प्रक्रियेस मुदतवाढ दिली असून ३१ डिसेंबरपर्यंत प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.



सध्या शासकीय योजनेच्या प्रत्येक लाभार्थ्याला ई-केवायसी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. बँकेचे खाते असो किंवा शासकीय योजनेचा लाभ घ्यावयाचा असो. प्रत्येक ठिकाणी ई-केवायसी बंधनकारक केले आहे.

त्यातच आता सर्वसामान्य नागरिकांकडे असणाऱ्या रेशनकार्डसाठीही ई-केवायसी बंधनकारक केले आहे. यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र, या मुदतीत संपूर्ण लाभार्थींची ई-केवायसी झालेली नसल्याने आता केंद्र सरकारने या प्रक्रियेस मुदतवाढ दिली आहे. सरकारने काही महिन्यांपूर्वी केशरी, पिवळ्या, पांढऱ्या रेशनकार्ड धारकांसाठी ई-केवायसीकरण्याची मार्गदर्शक तत्त्वे लागू केली होती. त्यात सर्व रेशनकार्ड धारकांनी ई-केवायसी करणे अनिवार्य होते. त्यासाठी आता शासनाने शेवटची तारीख ३१ डिसेंबर केली आहे. कुटुंबातील प्रत्येक सदस्याने ई-केवायसी पडताळणी प्रक्रिया पूर्ण न केल्यास संबंधितांना धान्य वितरण सेवेचा लाभ मिळणार नाही, असे पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले आहे.

लाभार्थ्यांनी प्रक्रिया पूर्ण करावी जिल्ह्यातील लाभार्थ्यांनी जवळच्या रेशन दुकानात जाऊन ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण करावी.

या प्रक्रियेसाठी आता ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्रातून कोठूनही ई-केवायसीचीप्रक्रिया पूर्ण करुन घेता येते. तसेच वेळोवेळी शासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हा पुरवठा विभागाने केले आहे.

# पैशाच्या वादात भावाचा खून

## पुरावा नष्ट करण्यासाठी प्रेत नदीत फेकले

■ **महासागर प्रतिनिधी,**
**दुसर बीड, दि. १२ :** दुसर बीड येथील खडकपूर्णा नदीपात्रात खून करुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने प्रेत फेकण्यात आले होते. ही घटना शुक्रवारी ८ नोव्हेंबर रोजी दुपारी उघडकीस आल्याने परिसरात खळबळ उडाली होती. या प्रकरणाचा तपास लावत पोलिसांनी आरोपीस सिंदखेडराजा कोर्टासमोर उभे केले असता आरोपीस १८ नोव्हेंबर पर्यंत पोलिस कोठडीची शिक्षा ठोठावली आहे. मिळालेल्या माहिती नुसार दुसर बीड परिसरातील खडकपूर्णा नदीपात्रात राहेरी पुलापासून पूर्व दिशेला ८ नोव्हेंबर रोजी ३० वर्षे वयोगटातील अनोळखी इसम लोखंडी ड्रममध्ये मृतावस्थेत दिसून आला. या घटनेची माहिती मिळताच किनगाव राजा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. यावेळी मृताचे वय अंदाजे २५ ते ३० वर्षे असून त्याच्या अंगात काळ्या रंगाचे फुल बाह्याचे जॅकेट, हाफ पॅन्ट, कथ्या रंगाची माचो कंपनीची




अंडरवेअर, पांढऱ्या रंगाचे, सोनी कंपनीचे हेड्फोन ब्लूटूथ, एक मोटर सायकलची चावी मिळून आली आहे. या प्रेताची तपासणी केली असता कोणत्यातरी या व्यक्तीचा खून करुन पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने हा ड्रम येथे आणून टाकण्यात आल्याची माहिती समोर आली. या प्रकरणी पोलिसांनी तपासचक्रे फिरवली असता मृतक हा वाशीम जिल्हयातील नंधना या गावातील रहिवासी असून तो वकील असल्याची माहिती समोर आली. मृताचे ओळख करण्यासाठी मृतकाच्या पत्नीस बोलावले असता तीने देखील मृतक हा ॲड. रघुनाथ गवळीच असल्याचे सांगितले. मृतकाचा लहान भाऊ नंदू गवळी हा कंटेनर चालक आहे. तसेच काही दिवसापूर्वी दोन्ही भावात सोयाबीनच्या विक्रीतून मिळालेल्या पैशावरून दोघात मोठा वाद झाला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

या वादातूनच आरोपीने रघुनाथ चा खून केल्याची शंका पोलिसांना आल्याने पोलिसांनी आरोपी नंदूला ताब्यात घेतले. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार विनोद नरवाडे करत आहे.

गहू विक्रीस नेत असल्याचे सांगितले होते कारण आरोपी नंदू गवळीने ड. रघुनाथ गवळी याची तीक्ष्ण हत्याराने खून करुन त्याचा मृतदेह एका ड्रम मध्ये टाकला. दुसऱ्या दिवशी गावकऱ्यांच्या मदतीने हा ड्रम वाहनात ठेवत त्याने घरातील गहू विक्रीसाठी पुणे येथे नेत असल्याचे सांगितले व हा ड्रम खडकपूर्णा नदीपात्रात आणून फेकला. आरोपीला १८ पर्यंत पोलिस कोठडी सदर आरोपीला किनगावराजा पोलिसांनी १० नोव्हेंबर रोजी वाशीम जिल्ह्यातून अटक करुन सिंदखेडराजा न्यायालयात उपस्थित केले.

यावेळी न्यायालयाने आरोपी नंदू गवळी याला१८ नोव्हेंबर पर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. भांडणामुळे धारदार शस्त्राने केला खून परिवारातील सातत्याने होत असलेले वाद व सोयाबीन विक्रीतून मिळालेल्या पैशावरून झालेली भांडण या खुनाला कारणीभूत ठरली. या गोष्टीचा राग मनात घेत नंदूने धारधार शस्त्राने रघुनाथ गवळीची हत्या केली व मृतदेह बुलडाणा जिल्ह्यात आणून फेकला असल्याची कबूली त्याने दिली.

# ३,३२९ पैकी ७११ शाळांमध्येच सीसीटीव्ही

## विद्यार्थी सुरक्षेचे काय?

■ **महासागर प्रतिनिधी,**
**यवतमाळ , दि. १ २:** बदलापूर येथील शाळेत अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचारानंतर संपूर्ण राज्य हादरले. त्यानंतर राज्याच्या शिक्षण विभागाने तत्काळ सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही बसवण्याचा आदेश जारी केला. परंतु, जिल्ह्यात या निर्णयाला बहुतांश शासकीय शाळांनीच हरताळ फासल्याचे दिसत आहे. जिल्ह्यातील ३ हजार३२४ शाळांपैकी केवळ ७११ शाळांमध्येच सीसीटीव्ही लागले आहेत. उर्वरित शाळांमध्ये अजूनही विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न कायम आहे. राज्यात बदलापूरसह एकापाठोपाठ एक शहरात अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर राज्य सरकार खडबडून जागे झाले होते. शाळांमध्ये कार्पोरेट कार्यालयाच्या धर्तीवर विशाखा व सखी सावित्री समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच शाळेत सीसीटीव्ही लावण्याचे निर्देश दिले होते. शाळा, महाविद्यालयांत दिवसेंदिवस मुलां-मुलींवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांत वाढ झाली आहे. शाळकरी मुलींवर वारंवार होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांमुळे सरकारने कडक कायदे केले आहेत.

घर, शाळा व समाजात बालस्नेही वातावरण निर्माण व्हावे, याअनुषंगाने विविध स्तरावर समित्या गठीत करण्याचे नियोजन केले आहे. यात सखी सावित्री समितीची रचना, कार्य स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुषंगाने जिल्ह्यातील ३ हजार ३२४ शाळांमध्ये सखी सावित्री समित्या स्थापन केल्या. मात्र जिल्ह्यात असलेल्या ३ हजार ३२४ शाळांपैकी केवळ ७११ शाळांत सीसीटिव्ही कॅमेरे लागलेले आहे. अद्यापही २ हजार ६१८ शाळांत सीसीटीव्ही लागलेले नाहीत.

शहर व जिल्ह्यातील बहुतांश खासगी शाळांमध्येच सीसीटीव्ही आहे. मात्र, जिल्ह्यातील शासकीय शाळांमधील सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे दिसून येत आहे. तसेच सखी सावित्री समितीची स्थापना केली तरी समितीची बैठक होत नसल्याची बाब समोर आली. ग्रामीण भागातील प्राथमिक व माध्यमिक शाळांत सीसीटीव्ही कॅमेरे नाही.

त्यामुळे अप्रिय घटना रोखण्यासाठी शालेय प्रशासनाने उपाययोजना करणे गरजेचे आहे.

सखी सावित्री समित्या स्थापन शाळांमध्ये सखी सावित्री समित्या स्थापन केल्या आहेत. अनेक शाळांची तपासणी केली असता केवळ ७११ शाळांनीच सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले असल्याचे निदर्शनास आले. उर्वरित शाळांनाही सूचना दिल्या, असे जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.

बहुतांश तक्रारपेट्या केवळ नावालाच यवतमाळमधील सर्वच माध्यमिक व प्राथमिक सर्व व्यवस्थापन व माध्यमांच्या शाळांमध्ये तक्रारपेटी बसवली आहे. पण, तक्रारी प्राप्त होत नसल्याने या पेट्या केवळ शो-पीस ठरत आहेत.

बाल लैंगिक अत्याचाराच्या घटना होवू नये, यासाठी शालेय प्रशासनाने खबरदारीच्या उपाययोजना करणे आवश्यक आहे.

# ३५ टक्क्यांहून अधिक सोयाबीनची विक्री

## भाव अजूनही ४ हजारांवरच

■ **महासागर प्रतिनिधी,**
**अमरावती, दि. १२ :** जिल्ह्यातील खरिपाचे मुख्य पीक सोयाबीन आहे. दरवर्षी जिल्ह्यात जवळपास १२ ते १४ लाख पोत्यांचे उत्पादन होते. यंदा मात्र अवेळी झालेल्या पावसाने शेतकऱ्यांना जबर फटका बसला असून सोयाबीनचे सरासरी उत्पादन ४० ते ५० टक्क्यांनी घटले आहे. त्यावरून शेतकऱ्यांनी आतापर्यंत जवळपास ३५ टक्क्यांहून अधिक सोयाबीन बाजारात विकले आहे, परंतु भावात अजूनही वाढ झाली नाही. एपीएमसीमध्ये सोमवारी येथील



शेतकऱ्यांना सोयाबीनला प्रतिक्विंटल ३८५० ते ४१४६ रुपये भाव मिळाला. यंदा सोयाबीन विक्रीला आल्यापासून हाच भाव आहे. अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत मागील सव्वा महिन्यात सुमारे सव्वादोन लाख पोत्यांची विक्री झाली (यंदाच्या एकूण उत्पादनाच्या टक्के) आहे, मात्र अजूनही भाव जैसे थेच आहे. सोयाबीन हे शेतकऱ्याचे मुख्य पीक आहे.

# कारागृह परिसरात एलसीबीने पकडली ७५ लाखांची कॅश



■ **महासागर प्रतिनिधी,**
**यवतमाळ , दि. १ २:** टोतील एका लोखंडी पेटीत असलेली लाखांची कॅश एलसीबी पथकाने जप्त केली. ही कारवाई सोमवारी ११ नोव्हेंबर रोजी दुपारी जिल्हा कारागृह परिसरातील मंदिरासमोर करण्यात आली. या पैशांबाबत उपस्थितांनी कुठलीही अधिकृत माहिती दिली नाही. त्यामुळे जप्तीतील पैसे भरारी पथकाच्या माध्यमातून अवधूतवाडी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

प्राप्त माहितीनूसार, शहरात एलसीबी पथकातील अधिकारी, कर्मचारी सोमवारी पेट्रोलिंग करत होते. दरम्यान, एका ऑटो क्रमांक एमएच-२४-एम७१५४ मधून पैशाची वाहतूक केली जात असल्याची माहिती पथकाला मिळाली. पथकाने यवतमाळ विधानसभा मतदारसंघातील भरारी पथक क्रमांक चारचे प्रमुख प्रकाश वाघमारे यांना जिल्हा कारागृहाजवळील मंदिरासमोर बोलावून सापळा रचला. दुपारी एका काळ्या रंगाच्या ऑटोला थांबवून चौकशी केली असता, त्यातील लोखंडी पेटीत पन्नास, शंभर, दोनशे, पाचशेच्या चलनी नोटांचे बंडल, एकूण लाख रुपये आढळून आले.

यावेळी ऑटोमधील घनश्याम भोयर, सुरेश निमजे, तुळशीदास खेकडे, आशिष जोग प्यारेजी हे बसून होते. त्यांना पेटीतील पैशांबाबत विचारणा केली असता, पैशाचे कुठल्याही प्रकारचे दस्तावेज त्यांच्याकडे आढळून आले नाही. त्यामुळे भरारी पथकाने पैसे जप्त करून पुढील कारवाईसाठी अवधूतवाडी पोलिस ठाण्याकडे प्रकरण वळते केले. ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलिस अधीक्षक पियुष जगताप, पोलिस निरीक्षक ज्ञानोबा देवकते यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलिस निरीक्षक सुगत पुंडगे, अमोल मुडे, पथकातील सय्यद साजिद, योगेश गटलेवार, बंडू डांगे, अजय डोळे, रूपेश पाली, योगेश डगवार, नीलेश राठोड, विनोद राठोड, रितुराज मेडवे, देवेंद्र होले, आकाश सुर्यवंशी आदींनी पार पाडली. पुढील तपास पोलिसांकडून केला जात असून ही रक्कम कुणाची आहे, याची चौकशी केली जात आहे.

# स्वत:च्या क्षमता जोखून सुधारणा करावी:अभिनेत्री गिरिजा प्रभू यांचा सल्ला

## कृषी विद्यापीठात 'इंद्रधनुष्य'चा समारोप

■ **महासागर प्रतिनिधी,**
**अकोला, दि. १२ :** 'कलाक्षेत्रात नाव कमवायचे असेल तर मायबाप प्रेक्षकांच्या आवडीनुसार अभिनयावर भर द्यावा लागतो. तसेच स्वतःच्या क्षमता जोखून त्यामध्ये उत्तरोत्तर सुधारणा होत प्रेक्षकांच्या पसंतीस उतरण्यासाठी कलाकाराने स्वतःला सिद्ध करण्यासाठी नेहमी स्वतःशी स्पर्धा करावी, असे प्रतिपादन सिने अभिनेत्री गिरिजा प्रभू यांनी येथे केले. येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात झालेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ युवा महोत्सव इंद्रधनुष्य-२०२४'च्या पारितोषिक वितरणाप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. कुलगुरू डॉ. शरद गडाख अध्यक्षस्थानी होते. 'कुठल्याही क्षेत्रात यशोशिखर गाठण्यासाठी कठोर परिश्रम घ्यावे लागतात. कला क्षेत्र देखील याला अपवाद नाही. यशाकरिता प्रामाणिक प्रयत्न करावे लागतात. स्पर्धेमध्ये सहभागी होऊन निखळ आनंद प्राप्त करणे महत्त्वाचे असते. आपल्यात दडलेल्या सुप्त गुणांना वाव मिळवून देणे महत्त्वाचे असते, असे त्यांनी अधोरेखित केले. चैतन्यदायी उत्साहाने सळसळणाऱ्या उपस्थित तरुणाईला पुढे संबोधित करताना त्यांनी जीवनात असलेले कलेचे स्थान व महत्त्व प्रतिपादित करताना त्यांनी दूरदर्शन मालिका आणि चित्रपटाच्या शूटिंगमधील बारकावे समजावून सांगितले. यशस्वी होण्यासाठी नेहमी उत्तम काम करत राहिल्यास आणि स्पर्धेमध्ये सहभागी होत राहिले तर भविष्यात हमखास यश प्राप्त होते. तसेच युवकांनी कला विश्वात उपासना करताना संयम बाळगणे गरजेचे असून, पारितोषिक न मिळाल्यास नाराज न होता जोमाने प्रयत्न करावेत असा कानमंत्र दिला.

### जाहिर नोटीस

**विद्यमान अतिरिक्त सह जिल्हा न्यायालय, अचलपूर यांचे न्यायालय**

M.A.C.P.NO.108/2022 पेशी तारी.०३/१२/२०२४
Mohd.Anas-Vs-Ramnath+2
Non-applicant :-
Rizwan Abdul Rashid
Ward No.02, Kamptee Road,
New Bhanegaon ,Nagpur, Tq. Dist. Nagpur
CLAIM :GRANT OF COMPENSATION UNDER SECTION 166 OF M.V.ACT.

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी वि. अतिरिक्त सह जिल्हा न्यायालय अचलपूर यांच्या न्यायालयात **गैरअर्जदार मोहम्मद रिझवान अब्दुल राशीद** ,वार्ड नंबर ०२ ,कामठी रोड,न्यु भानेवाडा, नागपूर ता.जि.नागपूर यांना पेपर प्रसिध्दीद्वारे नोटीस देण्यात येते की,त्यांनी अर्जाची सुनावणीसाठी **दिनाक ०३/१२/२०२४** रोजी सकाळी १०.३० वाजता वि. अतिरिक्त सह जिल्हा न्यायाधिश,अचलपूर यांचे न्यायालयात स्वत: किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदर्हु अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०४/०७/२०२४ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला.

**आदेशानुसार**
**प्र. अधिक्षक**
**अप्पर जिल्हा व सत्र न्यायालय, अचलपूर**

### Format C-1

**Declaration about criminal cases**

(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name and address of candidate : SAMEER DATTATRAY MEGHE**
**135, Pande Layout, Khamla, Nagpur.**
**Name of political party : Bharatiya Janata Party**
**Name of Election : Maharashtra Legislative Assembly -2024**
**Name of Constituency : 50 Hingna**

**I SAMEER DATTATRAY MEGHE,** a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents :

**(A) Pending Criminal cases**

| Sr. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | Civil Judge Jr. DN J.M.F.C Court no. 1 Hingna Distt. Nagpur | SCC 1076/2021, 09.10.2021 | Recording statement. | IPC 188,270, 135 of MPA. For Conducting Rally |
| 2. | Civil Judge Jr. DN J.M.F.C Court no. 1 Hingna Distt. Nagpur | SCC 1185/2020, 15.09.2022 | Awaiting Summons | IPC 188,270, 135 of MPA, for Conducting Rally |
| 3. | 17-19th Jt C.J.J.D and J.M.F.C Nagpur | SCC 19644/2021, 20.11.2021 | Awaiting Summons | 188,269, 270 IPC RW 51B Disaster Management Act RW 3, 4 EDA, 135 of MPA, for conducting Rally |
| 4. | 3 Jt C.J.J.D and J.M.F.C Nagpur | SCC 40/2020, 10.01.2020 | Appearance | 135 of MPA, for Conducting Rally |
| 5. | 23-11 Jt C.J.J.D and J.M.F.C Nagpur | SCC 15418/2022, 01.08.2022 | Awaiting Summons | 188,269, 270 IPC RW 51B Disaster Management Act RW 3, EDA, 135 of MPA, For Conducting Rally |
| 6. | 13-9 C.J.J.D and J.M.F.C Nagpur | SCC 11110/2023, 21.07.2023 | Discussion | IPC 188, 269, 270, Section 135, 37(1)(3)of MPA, for Conducting Rally |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sr. No. | Name of Court and date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil |

Name & Signature of Candidate
**(SAMEER DATTATRAY MEGHE)**

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# निरामय

## धूम्रपानाची सवय सोडण्यासाठी...

**आरोग्यमंत्र**

धूम्रपानाचं व्यसन सोडण्याची अनेकांची इच्छा असते. पण धूम्रपान करण्याची तल्लफ स्वस्थ बसू देत नाही. मनाचा कितीही निग्रह असला तरी तंबाखूमुळे सिगारेट ओढावीशी वाटते. सवय सुटत नसली तरी आपले प्रयत्न कमी होता कामा नयेत. धूम्रपान सोडण्यासाठी काय करायला हवं याविषयी...

ताणामुळे, डोकं दुखत असेल तर किंवा एकटं असताना अनेकजण धूम्रपान करतात. अशा कारणांमुळे धूम्रपान करत असाल तर त्याचा प्रभाव तुमच्यावर पडू देऊ नका. ताणामुळे धूम्रपान करत असाल तर तणावमुक्त जीवन जगण्याच्या इतर मार्गांचा असलंब करा. धूम्रपानाऐवजी चहा किंवा कॉफी प्या.



स्वत:ला व्यस्त ठेवा. धूम्रपान करावंसं वाटलं तर काही तरी तोंडात टाका किंवा च्युइंगम चघळा. धूम्रपानाची तल्लफ निर्माण होत असलेल्या वेळी आपलं लक्ष दुसरीकडे वळवा. डोक्यात धूम्रपानाचे विचार येऊ नयेत यासाठी प्रयत्न करा. भरपूर पाणी प्या. पाण्यामुळे धूम्रपानाची इच्छा मरते. शरीरातला ओलावाही टिकून राहतो.

## ब्रश ठरू शकतो धोकादायक

**आरोग्य विशेष**

दररोज सकाळी उठल्यावर आणि रात्री झोपताना आपण ब्रश करतो. कारण दातांच्या आरोग्यासाठी हे अत्यंत महत्त्वाचे आहे. तसे पाहायला गेले तर ब्रशचे काम दात स्वच्छ करणे आहे; पण हाच ब्रश तुमच्यासाठी धोकादायक ठरू शकतो. हा ब्रश वापरून तुम्ही आजारी पडू शकता, नुकत्याच झालेल्या एका संशोधनात असे आढळून आले की, टूथब्रश आणि शॉवर हेडमध्ये अनेक प्रकारचे विषाणू आणि जंतू असतात. त्यापैकी काही जंतूंचा प्रथमच शोध लागला आहे.

हे संशोधन 'नॉर्थवेस्टर्न युनिव्हर्सिटी'ने केले. तिथे संशोधनात आढळून आले, की या रोजच्या वापरात असलेल्या गोष्टींमध्ये हजारो जंतू आहेत, त्यापैकी काही पूर्णपणे नवीन आणि अविश्वसनीय आहेत. हे संशोधन एरिका एम. हार्टमन यांनी त्यांच्या टीमने केले आहे. हार्टमन म्हणाले, की सापडलेले जीवाणू पूर्णपणे नवीन आहेत. त्यांच्या शोधामुळे शास्त्रज्ञही आश्चर्यचकित झाले. संशोधनात असेही म्हटले आहे, की मानवाने त्यांच्या आजूबाजूला असलेल्या जीवाणूंबाबत जागरूक राहणे महत्त्वाचे आहे. संशोधनात बॅक्टेरियोफेज नावाचा जीवाणूही सापडला आहे. तो कोणत्याही संसर्गाला आणखी वाढवतो. हे बॅक्टेरिया शॉवरच्या हेड्सपेक्षा ब्रशच्या आत जास्त आढळले आहेत. हे असे लहान सूक्ष्मजंतू तोंडाच्या संसर्गाचा धोका वाढवतात आणि इतर अनेक मार्गांनी आपल्या आरोग्यावर परिणाम करू शकतात.



ब्रशमध्ये आढळणारे जंतू तोंडातून पोटातही जाऊ शकतात. त्यामुळे पोटाच्या समस्याही वाढू शकतात. हार्टमॅन यांनी असे म्हटले, की असे काही जंतू आहेत जे निरुपद्रवी आहेत. ते कोणतेही फायदे देत नाहीत आणि कोणतेही नुकसान करत नाहीत. संशोधनात असे आढळून आले आहे, की टूथब्रशमध्ये जंतू येण्याचे कारण म्हणजे त्याचा पाण्याशी वारंवार संपर्क होतो.

टूथब्रश ओले राहतात आणि त्यांचा सूर्यप्रकाशाशी संपर्क होत नाही. त्यामुळे ब्रशमध्ये जंतू तयार होतात. याशिवाय दात घासल्यामुळे अन्न अडकल्यानेही त्यात बॅक्टेरिया तयार होतात.

ब्रश करण्यापूर्वी आणि नंतर दोन्ही वेळेस धुवा, दर १-२ दिवसांनी गरम पाण्याने ब्रश स्वच्छ करा, तर ते वापरण्यास योग्य राहतील.

## प्रोस्टेट कॅन्सरच्या प्रतिबंधासाठी

**नवसंशोधन**

प्रतिबंध हा उपचारांपेक्षा केव्हाही चांगला असं म्हटलं जातं. कॅन्सरसारख्या विकाराबाबत तर हे विधान अधिक योग्य ठरतं. पुरुषांमध्ये प्रोस्टेट कॅन्सरचं प्रमाण वाढत असून याला बळी पडणाऱ्या रुग्णांच्या संख्येतही वाढ होते आहे. प्रोस्टेट कॅन्सरला आळा घालण्यासाठी काही उपाय करता येतील. या विकाराची तीव्रता कमी करणारे तीन घटक शास्त्रज्ञांनी शोधून काढले आहेत. प्रिसिजन ऑन्कॉलॉजीमध्ये प्रकाशित झालेल्या एका अहवालानुसार सफरचंद, हळद आणि बेरी यांच्या सेवनामुळे प्रोस्टेट कॅन्सर होण्याची शक्यता कमी होते. या संशोधनात शास्त्रज्ञांनी सफरचंद, हळद आणि द्राक्षांमध्ये असलेल्या विविध नैसर्गिक घटकांची तपासणी केली. उंदिर आणि माणसाच्या पेशींवर त्यांची चाचणी घेण्यात आली. त्यावरून शास्त्रज्ञांनी हा निष्कर्ष काढला आहे.



## टिकवून ठेवा डेंटिनचा थर

**दंतारोग्य**

दात पांढरेशुभ्र दिसावेत, असं प्रत्येकाला वाटत असतं. यासाठी दात पांढरे करणाऱ्या कृत्रिम उत्पादनांचा वापर होतो. मात्र अशा उत्पादनांच्या नियमित वापरामुळे प्रथिनांनी समृद्ध असलेल्या दातांवरच्या थरांवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. अशा उत्पादनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या हायड्रोजन पेरॉक्साइडचे धोके समोर आले आहेत. आपले दात तीन थरांनी बनलेले असतात. दातांच्या बाहेरच्या बाजूला एनामेलचा थर असतो. आतल्या बाजूला प्रथिनयुक्त डेंटिनचा थर असतो. दातांच्या मुळांना हिरड्यांशी जोडणारे टिश्यू असतात. दातांवरच्या एनामेलमध्ये खूप कमी प्रथिनं असतात तर डेंटिनमध्ये सर्वाधिक प्रथिनं असतात. या दोन्ही थरांवर होणाऱ्या परिणामांबाबत संशोधन करण्यात आलं.



## तरुण वयात जपा डोळे

**आरोग्य डोळ्यांचं**

तरुण वयापासूनच डोळ्यांची काळजी घ्यायला हवी. दृष्टिदोषांमुळे आपल्या कामावर परिणाम होतो. त्यामुळे आहार, डोळेतपासणी, व्यायाम या माध्यमातून डोळ्यांची काळजी घ्यायला हवी. डोळ्यांच्या नियमित चाचणीमुळे दृष्टिदोषांचं निदान वेळेत होऊ शकतं. तसंच हा प्रतिबंधात्मक उपाय ठरू शकतो. दृष्टी सुधारण्यासाठी आहारात 'अ' आणि 'क' जीवनसत्त्वांनी युक्त पदार्थांचं सेवन करा. नियमित व्यायामानेही डोळे चांगले राहू शकतात. यामुळे रक्ताभिसरण सुधारतं, शरीरातल्या ऑक्सिजनची पातळी वाढते आणि डोळ्यांमधले विषारी घटक बाहेर टाकले जातात.



## लाभ बिटाच्या रसाचे

**आजीबाईंचा बटवा**

लालचुटुक बिटाच्या रसाचे अनेक लाभ आहेत. बिटाचा रस हा वजन कमी करण्यापासून उच्च रक्तदाबावर नियंत्रण मिळवण्यापर्यंत अनेक विकारांवरला रामबाण उपाय आहे. रक्तातलं हिमोग्लोबिन वाढवण्याचं काम बीट करतं. बिटामध्ये नायट्रिक ऑक्साइड हा घटक असतो. यात कोलेस्टेरॉल कमी करणारे ॲटीऑक्सिडंट्स असतात. मेंदूचं कार्य सुधारण्यासोबतच हृदयाचे ठोके नियमित पडण्यासाठी उपयुक्त ठरणारं 'ब' जीवनसत्त्वही बिटामध्ये मुबलक प्रमाणात असतं. त्यामध्ये फायबरचं प्रमाण जास्त असल्यामुळे पचनाच्या तक्रारी दूर होऊ शकतात. यात दाह कमी करणारे गुणधर्म असतात. बिटाच्या सेवनामुळे खेळाडूंची कामगिरी सुधारू शकते, असंही संशोधनातून समोर आलं आहे.



## मद्यपानामुळे मृत्यूचा धोका

**लक्षात घ्या**

जीवनशैलीत काळानुसार बदल होत चालले आहेत, त्याचप्रमाणे लोकांनी आपल्या खाण्याच्या सवयींमध्ये बरेच मोठे बदल केले आहेत. सध्या फॅशनच्या नावाखाली मद्यपान करणे ट्रेंड समजले जाते. एखादी सुखाची किंवा दु:खाची बातमी असली किंवा पार्टी, वाढदिवस, लग्न अशा प्रकारच्या कोणत्याही प्रसंगी लोक दारू पितात, तर काही लोकांना रोज दारू पिण्याची सवय असते. या यादीत पुरुषांसोबत महिलांचाही समावेश आहे. दारू पिणे आरोग्यासाठी हानिकारक आहे; मात्र अनेकांकडून दारूचे सेवन काही थांबत नाही. अनेकांना वीकेंडला मित्रांसोबत आणि ऑफिसनंतर सहकाऱ्यांसोबत दारू पिण्याची सवय असते.



नुकत्याच झालेल्या एका संशोधनानुसार, जे लोक एका आठवड्यात १४ युनिटपेक्षा जास्त अल्कोहोल पितात, त्यांच्या मृत्यूचा धोका १० पटीने वाढतो. या लोकांना कर्करोग, हृदयविकाराचा झटका किंवा ब्रेन स्ट्रोक होण्याची शक्यता असते. १४ प्रत्येक प्रकारच्या पेयानुसार अल्कोहोलची संख्या बदलू शकते. उदाहरणार्थ, अल्कोहोलचे १४ युनिट्स बिअरच्या अंदाजे ६ पिंट्सच्या बरोबरीचे असतात. १० ग्लास वाइन १४ युनिट्सच्या बरोबरीचे आहे. तथापि, बिअरचा एक पिंटदेखील तुम्हाला हानी पोहोचवण्यास सक्षम आहे. त्यामुळे कर्करोगाची शक्यता वाढते.

कार्यालयातील ताणतणाव आणि विषारी कार्यसंस्कृतीमुळे लोक रोज दारू पितात, असे या अहवालात म्हटले आहे. तरुण लोक प्रत्येक वीकेंड मित्रांसोबत पार्टी करताना किंवा मॅच पाहताना असंख्य पिंट बिअर पितात. जे या लोकांच्या आरोग्यासाठी हानिकारक आहे. दिवसातून एक बिअरदेखील जीवनासाठी हानिकारक आहे.

रोज १ ग्लास वाइन प्यायल्याने कर्करोग होऊ शकतो. दररोज मद्यपान केल्याने यकृतावर परिणाम होत आहे. दररोज मद्यपान केल्याने स्मृतिभ्रंश होऊ शकतो. त्यामुळे टाइप-२ मधुमेह, ब्रेन स्ट्रोक आणि हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता असते. मद्यपान करून गाडी चालवल्यामुळे अपघात होण्याची शक्यता अशा अनेक धोक्यांचाही संशोधनात समावेश करण्यात आला आहे.

## भावना व्यक्त न केल्याने आरोग्यावर परिणाम

**आरोग्य चर्चा**

एखादी दु:ख देणारी गोष्ट घडली, किंवा सुखाची बातमी कळली, तर आपोआपच आपण आपल्या भावना व्यक्त करतो; पण असे बरेच लोक आहेत, जे त्यांच्या भावना मनातच दडपून ठेवतात, त्यांना आपल्या भावना व्यक्त करता येत नाही. आपण सर्वजण अनेकदा मानसिक आणि शारीरिक आरोग्याविषयी बोलतो; परंतु अनेकदा भावनिक आरोग्याकडे दुर्लक्ष करतो; मात्र प्रत्येकाला भावनिक आरोग्याशी संबंधित माहिती असणे आवश्यक आहे.

भावनिक आरोग्य म्हणजे आपण कसे विचार करतो. हे आपल्या आरोग्याची स्थिती, जीवनातील घटनांना सामोरे जाण्याची क्षमता आणि आपण स्वतःच्या भावना तसेच इतरांच्या भावना कशा स्विकारतो हे प्रतिबिंबित करते. याचा अर्थ सर्व वेळ आनंदी राहणे असा नाही. भावना मनातच दडपणे म्हणजे जाणीवपूर्वक व्यक्त न करणे, जरी त्या वेदनादायक भावना असल्या तरीही.

भावना दडपल्याने उच्च रक्तदाब, हृदयरोग आणि पक्षाघाताचा धोका वाढतो. स्ट्रेस हार्मोन्सच्या सतत वाढीमुळे हृदय आणि रक्ताभिसरण प्रणालीवर जास्त ताण येऊ शकतो. हृदयाशी संबंधित समस्यांपासून बचाव करण्यासाठी, भावना उघडपणे व्यक्त करणे महत्वाचे आहे.

तणाव वाढतो तेव्हा पचन समस्यादेखील वाढतात. त्यामुळे अनेकदा आतड्यांना सूज येणे, तसेच पाचक समस्या उद्भवतात.




यासोबतच अनेक वेळा व्यक्ती जुलाबाची शिकार बनते. भावनांना शारीरिक आरोग्यला हानी पोहोचेपर्यंत रोखण्यासाठी, प्रथम तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करा. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी वाटत असल्यास, तुमच्या चिंतेच्या भावना जवळचा मित्र, जोडीदार किंवा कुटुंबातील सदस्यासोबत शेअर करा. एखादी भावना तुम्हाला खूप त्रास देत असेल, तर तुम्हाला आनंद देणाऱ्या कार्यामध्ये व्यस्त राहा. किंवा त्या भावनेशी निगडीत गोष्टी समजून घेऊन दूर करण्याचा प्रयत्न करा.

## रविवारी रात्री झोप येत नाही का?

**आरोग्यभान**

सुटीच्या आदल्या रात्री आपल्याला छान झोप लागते. दुसऱ्या दिवशी कामाला जायची घाई नसल्याचं समाधानच शांत झोपेसाठी पुरेसं ठरतं. मात्र रविवारच्या रात्री अनेकांना झोप येत नाही. एखाद्या रविवारी झोप आली नाही तर फार काळजी करण्याचं कारण नाही. पण ही दर रविवारचीच कथा असेल तर हा संडे नाईट इन्सोम्निया म्हणजे रविवार रात्रीचा निद्रानाश आहे असं म्हणावं लागेल. एका सर्वेक्षणानुसार जगातल्या चारपैकी एका माणसाला ही समस्या असते. इतकंच नाही, तर ६० टक्के कर्मचाऱ्यांना रविवारी रात्री कमी झोप येत असल्याची बाबही एका संशोधनातून समोर आली आहे. या संशोधनात सहभागी झालेल्या ८० टक्के लोकांना शुक्रवारी शांत झोप लागते. रविवारी रात्री झोप न लागण्याचं कारण म्हणजे सुटीच्या दिवसांमधली आपली दिनचर्या. सोमवार ते शुक्रवार आपली दिनचर्या वेगळी असते आणि सुटी असली की आपण निवांत असतो. सुटीच्या दिवशी अनेकजण सकाळी उशीरा उठतात. दुपारची झोप घेतली जाते. शारीरिक श्रमही तुलनेने कमी असतात. या सगळ्यामुळे रविवारच्या रात्रीच्या झोपेवर परिणाम होत असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. ताण हे रविवारी रात्री झोप न येण्यामागचं महत्त्वाचं कारण आहे. नव्या आठवड्याच्या कामाचा ताण मारक ठरतो. कामाचे विचार मनात येत असल्याने शांत झोप लागत नाही.



रविवारी शांत झोप लागावी यासाठी सुटीच्या दिवशीही लवकर उठा. व्यायाम टाळू नका. पचायला जड अन्न खाऊ नका. ताणामुळे झोप येत नसेल तर रात्री गाणी ऐका किंवा पुस्तक वाचा. आपल्या काळजीचं कारण कागदावर लिहून काढा. त्यावरच्या उपाययोजनांचा आढावा घ्या. यामुळे तुमचा ताण कमी व्हायला मदत होईल.

## वाढवा रोगप्रतिरोधक शक्ती

**आयुर्वेद आणि विकार**

वाढतं वायु प्रदूषण ही सध्याची खूप मोठी समस्या आहे. पण नाईलाजाने आपल्याला याच दूषित हवेत श्वास घ्यावा लागतो. त्याचे दुष्परिणामही भोगावे लागतात. मात्र ते कमी करायचे असतील तर आयुर्वेदात सांगितलेले उपाय योजायला हवेत.

✻ प्रदूषणाच्या दुष्परिणामांपासून दूर राहण्याचा खात्रीशीर उपाय म्हणजे शरीराची रोगप्रतिरोधक शक्ती वाढवणं. पचनाचं तंत्र उत्तम असेल तर शरीर वात, पित्त आणि कफ या त्रिदोषांपासून मुक्त होतं आणि रोग प्रतिरोधक क्षमता वाढल्यामुळे प्रदूषणाचा सक्षमतेने सामना करु शकतं. या हेतूनेच आयुर्वेदामध्ये दररोज आलं, लसूण, तुळस, कडूलिंब आणि काळ्या मिरीच्या सेवनाला प्राधान्य देण्याविषयी सांगितलं गेलं आहे.



✻ फुफ्फुसांची स्वच्छता आणि तंदुरुस्तीसाठी गुळाचं सेवन करायला हवं. यातल्या लोहामुळे धमन्या स्वच्छ होतात. अशा साफ धमन्यांमधून रक्तापर्यंत ऑक्सिजनची पर्याप्त मात्रा पोहोचते आणि श्वासासंबंधीच्या तक्रारी कमी होतात. हे लाभ मिळवण्यासाठी दररोज पाच ग्रॅम गुळाचं सेवन करण्याचा सल्ला दिला जातो. गूळ दिवसा अथवा रात्री झोपण्यापूर्वी गरम दुधाबरोबर घेता येतो. चहात साखरेऐवजी गुळाचा वापर करणं, शेंगदाणे अथवा तीळाच्या कुटात गूळ घालून केलेल्या लाडवांचं सेवन चांगले परिणाम देणारं ठरतं. अर्थात उन्हाळ्यात गुळाचं सेवन प्रमाणात ठेवणं केव्हाही चांगलं.

## शिंक आल्यास...

**आपण कुठे चुकतो?**

शिंकणं, हलका ठसका लागणं, घशात काही अडकल्यास खोकला येणं, जांभई येणं या सगळ्या आपसूक आणि ठराविक अंतराने घडणाऱ्या क्रिया आहेत. त्या थांबवणं अथवा त्यावर नियंत्रण ठेवणं आपल्याला शक्य नसतं. मात्र तरीही त्यांचा प्रतिरोध करण्याचा प्रयत्न केला तर काही दुष्परिणाम बघायला मिळतात. म्हणूनच ही चूक करु नये.

शिंकणं या क्रियेबाबत आपल्याकडे अनेक समज-गैरसमज प्रचलित आहेत. याला शुभ-अशुभाचे काही संकेतही चिकटवले जातात. महत्त्वाच्या कामासाठी बाहेर पडताना मागून कोणी शिंकणं अशुभ समजतात. चारचौघात मोठ्याने शिंकणं शिष्टाचाराच्या विरुद्ध समजलं जातं. म्हणूनच शिंकल्यानंतर 'एक्सक्युज मी' अथवा 'सॉरी' म्हणण्याचं प्रशिक्षण मुलांना लहानपणापासूनच दिलं जातं. बऱ्याचजणांना शिंकताना तोंडावर हात ठेवण्याची सवय असते. मात्र शिंकण्याविषयीचे हे सगळे भ्रम दूर करुन ही नैसर्गिक क्रिया तितक्याच नैसर्गिक पद्धतीने व्यक्त करण्याचा सल्ला तज्ज्ञांकडून मिळतो. शिंक रोखणं अथवा शिंकताना तोंडावर हात ठेवण्याच्या सवयीमुळे आपण आजारी पडू शकतोच; त्याचबरोबर आजूबाजूच्या लोकांनाही आजारी पाडू शकतो हे लक्षात घ्यायला हवं.



शिंकताना हात नव्हे तर तोंडावर रुमाल अथवा टिश्यू धरावा. पण कोणत्याही परिस्थितीत हात तोंडासमोर धरु नये. आपण याच हाताने दरवाजा उघडतो. एखाद्या व्यक्तीशी हस्तालोंदन करतो. या वेळी शिंकेवाटे बाहेर पडलेले घातक विषाणू अथवा जिवाणू दुसऱ्या व्यक्तीच्या संपर्कात येण्याची दाट शक्यता असते. संशोधकांच्या मते, एका शिंकेद्वारे कमीत कमी एक लाख बॅक्टेरिया बाहेर पडत असतात. रोगप्रतिरोधक शक्ती कमी असलेल्या शरीराला व्याधीग्रस्त बनवण्यास ही संख्या पुरेशी आहे. त्यामुळे शिंक आल्यास रुमाल अथवा शर्टची बाही, पदर, ओढणी तोंडासमोर धरणं योग्य.

## युटीआयचा धोका ओळखा

**व्याधी विचार**

उन्हाळा अनेक विकारांना आमंत्रण देतो. वाढत्या तापमानामध्ये अनेक प्रकारचे आजार उदभवण्याची शक्यता असते. असाच एक आणि विशेषत: महिलांना सतावणारा त्रास म्हणजे यूरिन इन्फेक्शन अर्थात युटीआय (युरिनरी ट्रॅक इन्फेक्शन). वेळीच दखल घेतली नाही या संसर्गामुळे बराच त्रास सहन करावा लागतो. संसर्ग वाढल्यास मूत्राशय आणि किडनीपर्यंत पोहोचण्याची शक्यताही जास्त असते. म्हणूनच याबाबत सतर्क रहायला हवं. पोटदुखी, ओटीपोटातील वेदना, लघवीच्या वेळी जळजळणं, आग होणं, अस्वस्थ वाटणं, वारंवार मूत्रविसर्जनाची भावना होणं, हलका ताप, मूत्राला उग्र दुर्गंध येणं आदी लक्षणांवरुन हा संसर्ग ओळखता येतो. ई-कोली बॅक्टेरियांमुळे हा संसर्ग उत्पन्न होतो. पाणी कमी पिणं, अधिक मात्रेत कॅफीन पोटात जाणं, कोल्ड ड्रिंकचं अतिसेवन, अस्वच्छ स्वच्छतागृहांचा वापर आदी कारणांमुळे युटीआयची शक्यता वाढते. शरीरात कॅफीनची अधिक मात्रा गेल्यास तहान कमी लागते, सहाजिकच पाण्याचं सेवन कमी प्रमाणात होतं. ही बाब डिहायड्रेशनला कारक ठरते आणि असं शरीर सहज ई-कोली बॅक्टेरियांच्या हल्ल्याला बळी पडतं.



उन्हाळ्यात तहान भागवण्यासाठी थंड पेयांचं सेवन केलं जातं. हा द्रवपदार्थ कार्बोनेटेड असल्यामुळे मूत्र क्षारीय बनतं आणि लघवीच्या वेळची जळजळ कमी होते. त्यामुळे हा त्रास होत असेल तर काही जण कोल्ड ड्रिंकचं अधिक प्रमाणात सेवन करतात. पण ही बाबही डिहायड्रेशनला कारणीभूत ठरते. म्हणजेच पाण्यापेक्षा कोल्ड ड्रिंकचं सेवन अधिक प्रमाणात असेल तर युटीआयचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो.

उन्हाळ्यात विविध आजारांना कारणीभूत ठरणाऱ्या जिवाणू आणि विषाणूंचा हवेत पसरण्याचा वेग आणि प्रमाण वाढतं. त्यातच अस्वच्छ ठिकाणी त्यांचं प्रचंड प्रमाणावर अस्तित्व दिसून येतं. असं असताना अस्वच्छ शौचालयाचा वापर झाला असता युरिनरी ट्रॅक इन्फेक्शनचा धोका कैक पटीने वाढण्याची शक्यता असल्याचं तज्ज्ञ सांगतात. त्यामुळेच ते नेहमी स्वच्छ शौचालयांचा वापर करण्याचा सल्ला देतात. घरातलं बाथरुमही अतिशय स्वच्छ ठेवायला हवं. कारण स्वच्छता हा अनेक रोगांपासून दूर राहण्याचा एक खात्रीशीर उपाय आहे. अगदी नाईलाजाने सार्वजनिक स्वच्छतागृहाचा वापर करण्याची गरज पडली तर आधी फ्लश करावं. टॉयलेट सीटवर भरपूर पाणी टाकावं. सीटवर पेपर नॅपकीन पसरुन कमोडचा वापर करणं हादेखील सुरक्षेचा उपाय ठरु शकतो. या आजारापासून दूर राहण्याचा आणखी एक उपाय म्हणजे तंग कपडे टाळणं. अनेकींना स्किन फिटिंगच्या जीन्स अथवा तंग जेगिंग्ज घालण्याची सवय असते. मात्र उन्हाळ्यात फॅशनमधला हा ट्रेंड बाजूला ठेवून सैलसर कपडे घालावेत. या उष्ण दिवसांमध्ये सुती कपड्यांना प्राधान्य द्यावं. मूत्र रोखून धरण्याची सवय टाळावी. रात्री धने-जिरे भिजत घालून सकाळी ते पाणी प्यावं. या उपायांमुळे विकार दूर राहू शकतो.




# काँग्रेसने १९४७ पासून देशासोबत विश्वासघात केला

# योगी आदित्यनाथ यांचा हल्लाबोल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर/अकोला/अचलपूर, दि. १२ :
जातीच्या नावावर वाटणाऱ्या काँग्रेसने १९४७ पासून देशासोबत विश्वासघात केला. काँग्रेसचे अस्तित्व आता संपवण्याची वेळ आली आहे, असा हल्लाबोल उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री व भाजप नेते योगी आदित्यनाथ यांनी केला.

अकोला, अचलपूर आणि नागपूर येथे महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ मंगळवारी आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. तिन्ही ठिकाणच्या सभेमध्ये योगी आदित्यनाथ यांनी काँग्रेससह मल्लिकार्जुन खरगे आणि अन्य नेत्यांवर टीका केली. सभेला प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह भाजपा आणि महायुतीचे नेते, उमेदवार तथा पदाधिकारी उपस्थित होते. कटेंगे तो बटेंगे असा नारा देत योगी आदित्यनाथ यांनी विरोधकांचा खरपूस शब्दात समाचार घेतला.

योगी आदित्यनाथ म्हणाले, महाराष्ट्र ही संत, महापुरुषांची पुण्यभूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वांना एकत्रित करून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. भारतासाठी ते सदैव प्रेरणादायी आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य बाळगंगाधर टिळक, बाजीराव पेशवे यांनी आदर्श घडवला. त्यांच्या प्रेरणेतून देश व समाजासाठी कार्य केले जात आहे.



१९४७ पासून निरंतर सत्ता चालवण्याची संधी काँग्रेसला मिळाली होती. मात्र, काँग्रेसने देशासोबत धोका केला. अखंड भारताचे तुकडे केले. आता काँग्रेस अध्यक्ष खरगे माझ्यावर राग व्यक्त करीत आहेत. माझ्यापेक्षा हैदराबादच्या निजामावर त्यांनी राग काढावा.

निजामाच्या अत्याचारावर पडदा टाकण्याचे काम काँग्रेस करीत आहे, असा आरोप योगी आदित्यनाथ यांनी केला. जिथे विभागणी होते, त्याच ठिकाणी हिंदू उत्सवादरम्यान दगडफेक होते. त्यामुळे मतांचे विभाजन होऊ देऊ नका. महाविकास नव्हे तर महाअडाणी आघाडी विरोधात आहे. ते लव जिहाद, लँड जिहाद सारख्या प्रकाराला प्रोत्साहन देतात. त्यामुळे चुकूनही त्यांचा विचार करू नका. अन्यथा आपले सण गणेशोत्सव, रामनवमीच्या मिरवणुकीवर दगडफेक होईल. निवडणुकीत कुठल्याही परिस्थितीत वाटले जाऊ नका, असे आवाहन योगी आदित्यनाथ यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आता नवीन भारताच्या सीमा सुरक्षित आहे. ५०० वर्षांत जे कार्य झाले नाही, ते नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात अयोध्यामध्ये भव्य राम मंदिर उभारून झाले. हा डबल इंजिन सरकारचा लाभ आहे. सर्व समस्यांचे समाधान केवळ डबल इंजिन सरकार असू शकते, त्यामुळे महायुतीच्याच उमेदवारांना विजयी करा, असे देखील ते म्हणाले.

### महायुतीचाच मुख्यमंत्री होणार - बावनकुळे

२० तारखेची निवडणूक १४ कोटी जनतेच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. काँग्रेस नेत्यांचा लाडकी बहीण योजनेला विरोध आहे. काँग्रेसने काहीही केले तरी भाजप लाडकी बहीण योजना सुरूच ठेवेल. केंद्र आणि राज्य सरकारच्या ५८ योजना प्रभावीपणे राबवणार आहे. निवडणुकीनंतर महायुतीचाच मुख्यमंत्री होणार आहे, असा विश्वास प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. तिकीट दिले नाही म्हणून समोर काही गद्दार उभे असल्याचेही ते म्हणाले.

## शिंदे, पवारांनी राणांना खडसावले

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १२ :
बडनेराचे युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रवी राणा यांनी दर्यापुरात शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे उमेदवार अभिजीत अडसूळ यांच्या विरोधात त्यांच्या पक्षाचा उमेदवार रिंगणात आणला आहे, तर अमरावतीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) उमेदवार सुलभा खोडके यांच्या विरोधात भूमिका घेतली आहे. त्यावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रवी राणा यांना खडसावले आहे.



दर्यापूर येथील शिवसेनेचे उमेदवार अभिजीत अडसूळ यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलताना एकनाथ शिंदे यांनी महायुतीत मिठाचा खडा टाकू नका, असे आवाहन रवी राणा यांना केले. एकनाथ शिंदे म्हणाले, रवी राणा हे महायुतीचे घटक आहेत. महायुतीत सरकार त्यांच्या बाजूने उभे राहिले आहे. म्हणून राज्यात आपले सरकार आणण्यासाठी अभिजीत अडसूळ देखील आपल्याला पाहिजे आहेत. त्यामुळे रवी राणांनी महायुतीची शिस्त पाळली पाहिजे. महायुतीत राहायचे आणि महायुतीच्या विरोधात काम करायचे, हे कुणीही करता कामा नये, असे आवाहन मुख्यमंत्री म्हणून मी करीत आहे. राज्यात महायुतीचे सरकार येणार आहे. हे सरकार आणण्यासाठी ज्यांनी योगदान दिले, त्यांचा सन्मान होईलच.

एका सभेत बोलताना रवी राणा यांनी अमरावतीची एक जागा निवडून आली नाही तर काही होत नाही, असे वक्तव्य केले होते. याच वक्तव्यावरुन उपमुख्यमंत्री अजित पवारांकडून रवी राणा यांची कानउघडणी करण्यात आली आहे. अजित पवार म्हणाले, लोकांना फार नकारात्मक बोललेले आवडत नाही. जनता फार सकारात्मक विचार करत असते. आम्ही देखील एकेकाळी राणांचे समर्थन केले आहे. पण राणा यांनीच स्वतःच्या बोलण्यातूनच पत्नीचा पराभव करून घेतला. रवी राणा यांनी आता तरी बोलताना काळजी घ्यायला हवी. त्यांनी महायुतीच्या उमेदवाराच्या विरोधात देखील उमेदवार दिला आहे.

त्यांच्याशी देवेंद्र फडणवीस यांनी बोलायला हवे. त्यांना समजून सांगावे, रवी राणांची विनाशकाले विपरीत बुद्धी झाली आहे. रवी राणा यांना देवेंद्र फडणवीस यांनी समजून सांगायला हवे आणि महायुतीत अंतर पडणार नाही, याची काळजी घ्यायला हवी, असा सल्ला देखील अजित पवार यांनी दिला आहे.

## एकनाथ शिंदेसह माझ्याही बॅगा तपासल्या

अजित पवार



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :
परभणी मध्ये माझ्या देखील बॅगा तपासण्यात आल्या होत्या. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या देखील बाग्या तपासल्या गेल्या होत्या. मात्र, अशा पद्धतीने विरोधी पक्षांनी तक्रार करणे, आरोप करणे हे चुकीचे असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.

पोलिसांच्या माध्यमातून असे होत असल्याचा आरोप विरोधक करत असतील तर आमच्या सोबत असणाऱ्या पोलिसांच्या देखील बॅगा तपासा, असे आवाहन देखील त्यांनी केले. विरोधकांच्या आरोपाला त्यांनी सडेतोड उत्तर दिले आहे.

आता शेवटच्या टप्प्यात निवडणूक आली आहे. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचून आमची भूमिका मांडण्याचा आम्ही प्रयत्न करत आहे, असे देखील अजित पवार यांनी म्हटले आहे. उमेदवारी देताना आम्ही सोशल इंजिनिअरिंग पाळले असल्याचा दावा देखील अजित पवार यांनी केला आहे. मी साडेबारा टक्के आदिवासी, साडेबारा टक्के मागासवर्गीय आणि साडेबारा टक्के महिलांना उमेदवारी दिली असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

## 'बाण' गेला, 'खान' उरला...

### राज ठाकरे यांचा उद्धव ठाकरेंवर निशाणा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :
राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंवर जोरदार टीका केली. बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना आणि धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह आता एकनाथ शिंदे यांच्याकडे गेले आहे. तर उद्धव ठाकरे यांच्यासोबत केवळ खान राहिले आहेत, अशा शब्दात राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसे प्रमुख राज ठाकरे यांची दिंडोशी मालाड येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या मतदारसंघातील मनसेचे उमेदवार भास्कर परब यांच्या प्रचारार्थ राज ठाकरे यांनी सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली.

शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवारांनी उर्दूमध्ये पत्र काढले आहे, अशा शब्दात राज ठाकरे यांनी निशाणा साधला. मराठवाड्यामध्ये 'खान हवा की बाण हवा' अशा घोषणा दिल्या जात होत्या. मात्र आता उद्धव ठाकरे यांच्याकडून बाण निघून गेला आहे तर फक्त खान उरला आहे, असे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

## शरद पवारांनी केला खोत यांचा गेम

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :
सदाभाऊ खोत यांच्या रयत क्रांती सेनेचे युवा प्रदेशाध्यक्ष पांडुरंग शिंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे. या माध्यमातून शरद पवार यांनी आपल्यावर अश्लाघ्य टीका करणाऱ्या खोत यांना प्रत्युत्तर दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.



सदाभाऊ खोत यांनी नुकतीच शरद पवार यांच्यावर अश्लाघ्य टीका केली होती. शरद पवार यांनी आपली महाराष्ट्राचा चेहरा-मोहरा बदलण्याची इच्छा असल्याचे म्हटले आहे. आता त्यांना महाराष्ट्राचा चेहरा स्वतःच्या चेहऱ्यासारखा करायचा आहे काय? असे ते म्हणाले होते. त्यांच्या या टीकेनंतर त्यांच्यावर टीकेची झोड उठली होती. या पार्श्वभूमीवर पांडुरंग शिंदे यांनी शरद पवार गटात प्रवेश केला आहे.

पांडुरंग शिंदे यांनी शरद पवार यांच्या उपस्थितीत शरद पवार गटात प्रवेश केला. जळगावमध्ये आयोजित प्रचारसभेत हा छोटेखानी पक्षप्रवेश सोहळा झाला. यावेळी शिंदे यांनी रयत क्रांती संघटनेला सोडचिठ्ठी दिल्याचे कारणही सांगितले. सदाभाऊ खोत यांनी काही दिवसांपूर्वी शरद पवार यांच्यावर टीका केली होती. मला ही टीका पटली नाही. त्यामुळे मी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला. सदाभाऊ खोत सध्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांपासून लांब गेले आहेत. त्यांची कामे व्यक्ती केंद्रीत झाली आहेत, असे ते म्हणाले.

पांडुरंग शिंदे यांनी यावेळी सदाभाऊ खोत यांच्या धोरणांवर पक्षातील अनेक नेते नाराज असल्याचाही दावा केला आहे. माझ्या संपर्कात जिल्ह्यातील मोठे 25 कार्यकर्ते आहेत. ते ही लवकरच शरद पवार गटात प्रवेश करणार आहेत, असे ते म्हणाले. त्यांच्या या दाव्यामुळे ऐन विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत सदाभाऊ खोत यांना मोठा झटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सदाभाऊ खोत यांनी देवेंद्र फडणवीस यांनी गायीचे सर्व दूध तिच्या वासरांनाच देण्याची भूमिका घेतली आहे. यामुळे शरद पवारांना नववा महिना लागून त्यांना कळा सुटल्या, असे अपमानजनक वक्तव्य केले होते.

## राज ठाकरे वाचतात गुजराती व्यापाऱ्यांची स्क्रिप्ट

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :
उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना राज ठाकरे यांनी भान ठेवावे, अशा शब्दात उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी राज ठाकरे यांच्यावर निशाणा साधला.

राज ठाकरे हे गुजरामधील दोन व्यापाऱ्यांनी दिलेली स्क्रिप्ट वाचत असल्याचा आरोपही त्यांनी केला. उद्धव ठाकरे आणि शरद पवार हे महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी लढत आहेत. त्यांच्यावर राज ठाकरे हे टीका करीत असल्याचेही राऊत यांनी म्हटले आहे. निवडणूक आयोग निष्पक्ष पणे वागत नसल्याचा आरोपही त्यांनी या वेळी केला.

राज ठाकरे हे दुसरे मोराजी देसाई आहेत. आम्हाला मोरारजी देसाईंची आठवण झाली, हे फार दुर्दैव आहे. ते फार मोठे नेते होते. मात्र, उद्धव ठाकरे यांच्या विषयी बोलताना राज ठाकरे यांनी थोडेसे भान ठेवावे. ते शिवसेनेचे पक्षप्रमुख आहेतच मात्र महाराष्ट्रावर डल्ला मारणाऱ्यांच्या विरोधात त्यांची लढाई सुरू आहे, असे म्हणत संजय राऊत यांनी राज त्यांच्यावर टीका केली.

### राऊतांचे प्रत्युत्तर



विक्रोळीत वारंवार एखादा नेता सभा घेत असला तरी आमचाच पक्ष निवडून येणार आहे. विक्रोळीत दोन सभा काय? त्यांनी येथेच घर करून राहावे, मात्र तरी देखील तेथे सुनील राऊत निवडून येतील असा दावा देखील राऊत यांनी केला आहे.

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची जीभ घसरली

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १२ :
काँग्रेसचे नेते नाना पटोले यांची भाजपवर टीका करताना जीभ घसरल्याचे पहायला मिळाले. अकोला येथील आयोजित सभेत बोलताना नाना पटोले यांनी भाजपवर निशाणा साधताना वादग्रस्त वक्तव्य केले आहे. भाजपला आता कुत्रा बनवण्याची वेळ आली आहे. ते इतके मस्ती आलेत की, स्वतःला देव समजत आहेत, असे नाना पटोले म्हणाले. या वक्तव्यामुळे नाना पटोले यांच्यावर भाजपकडून टीका होत आहे.

अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार साजिद खान मन्नत खान यांच्या प्रचारार्थ रविवारी रात्री नाना पटोले यांची सभा पार पडली. या सभेत बोलताना नाना पटोले म्हणाले, येथे ओबीसी समुदायातील लोक सुद्धा उपस्थित आहेत. अकोला जिल्ह्यातील



ओबीसी लोक भाजपला मतदान करतील का? जे तुम्हाला कुत्रा बोलतात. त्यामुळे आता भाजपला कुत्रा बनवण्याची वेळी आली आहे. यांना इतकी मस्ती आली की, हे आता स्वतःला देव समजत आहेत, अशी टीका पटोले यांनी केली.

नाना पटोले यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावरही निशाणा साधला. मला सगळे लोक पहिल्यापासून नाना भाऊ म्हणतात. मला घरात तसेच तुम्ही सगळे नाना भाऊ म्हणतात. फडणवीसांना सगळे देवेंद्र फडणवीस म्हणायचे. पण, आता त्यांनी आपले नाव बदलून देवाभाऊ केले आहे. काही दिवसांनंतर ते त्यांच्या नावापुढील भाऊ हा शब्द देखील काढतील. त्यानंतर काय राहील? यावर सर्वांनी देवा असे उत्तर दिले. यावर नाना पटोले म्हणाले, एक विश्वगुरू दिल्लीत बसलेत. दुसरे महाराष्ट्रात तयार होत आहेत.

## विकासासाठी बदल आवश्यक

### सरपंच शारदा गायधने यांचे मतदारांना आवाहन

■ महासागर प्रतिनिधी
पवनी / भंडारा, दि. १२ :
मतदारसंघाचा विकास रखडला आहे, या क्षेत्रात सर्वत्र अनागोंदी माजली असून, भ्रष्टाचाराने तर कळस गाठला आहे, कमिशनशिवाय कोणतीच काम होत नाही, असे आरोप करीत बदल केल्याशिवाय विकास करणे शक्य नाही, असे प्रतिपादन बेला येथील पुरस्कारप्राप्त सरपंच शारदा गायधने यांनी केले.

भंडारा विधानसभा मतदार संघाच्या अपक्ष उमेदवार सौ. देवांगणा गाढवे (वालदे) यांच्या प्रचार दौऱ्यात नेरला येथे त्या बोलत होत्या. देवांगणा गाढवे यांनी मंगळवारी मतदारसंघातील दवडीपार, पहेला, श्रीनगर, नेरला, अड्याळ आणि इतर गावांमध्ये झंझावाती प्रचार करीत मतदारांशी प्रत्यक्ष संवाद साधला. या परिसरात गोसे प्रकल्पाच्या पुनर्वसित गावठाणात राहणाऱ्या प्रकल्पग्रस्तांच्या अनेक समस्या असून, गेल्या अनेक वर्षापासून त्या समस्यांचा निपटारा झाला नाही.



अनेकांना मोबदल्याची रक्कम मिळाली नाही, पुनर्वसित वस्त्यांमध्ये शाळा इमारत, रस्ते, गटारे, पिण्याचे पाणी यांची बिट समस्या असून, प्रशासनासह लोकप्रतिनिधींनी कायम दुर्लक्ष केले आहे. नेरला व अन्य गावातील महिला मतदारांनी त्यांच्या व्यथा बोलून दाखविल्या. आपल्या समस्या निकाली काढायच्या असतील तर सक्षम लोकप्रतिनिधी निवडणे गरजेचे असून, यावेळी बदल घडवायचाच, या निर्धाराने मतदान करण्याचे आवाहन शारदा गायधने यांनी केले.

## दोन्ही राष्ट्रवादीत राडा

### दीडशे समर्थकांवर गुन्हे दाखल

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. १२ :
मोहाडी तालुक्यातील मांडेसर येथे अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार राजू कारेमोरे यांचा समर्थक त्याच्या पत्नीच्या वाढदिवसानिमित्त मिठाई, टिफिन बॉक्स आणि अन्य साहित्य वाटप करीत असल्याचा प्रकार उघडकीस आला होता. सदर प्रकरणी भरारी पथकाने साहित्य जप्त केले होते,

यावरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटातील कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली आणि हे प्रकरण मोहाडी पोलीस ठाण्यात पोहोचले. अखेर तुमसरचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार चरण वाघमारे आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार राजू कारेमोरे यांचे बंधू विजय कारेमोरे यांच्यासह दोघांच्याही प्रत्येकी ७५ समर्थकांवर मोहाडी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

राष्ट्रवादी (शरद पवार)चे उमेदवार माजी आमदार चरण वाघमारे हे त्यांच्या असंख्य समर्थक आणि कार्यकर्त्यांसह पोलीस ठाण्यात पोहोचले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ( अजित पवार) उमेदवार राजू कारेमोरे यांचे बंधू विजय कारेमोरे हे सुद्धा त्यांच्या समर्थकांसह ठाण्यात पोहोचले. दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांनी आचारसंहितेचा आणि जमावबंदीचा आदेश झुगारून पोलीस ठाण्यातच रात्री उशिरापर्यंत ठाण मांडले होते.

दरम्यान दोन्ही गटाचे नेते आणि पदाधिकाऱ्यांच्या विरोधात मोहाडी ठाणेदार सुरेश बेलखेडे यांच्या तक्रारीवरून १५० हून अधिक कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मागच्या निवडणुकीतही वाघमारे, कारेमोरे यांच्यात असाच वाद उफाळून आला होता.

## माजी मंत्री अशोक शिंदे स्वगृही



■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. १२ :
तीनवेळा आमदार व एकदा मंत्री राहिलेले अशोक शिंदे स्वगृही म्हणजे परत शिवसेना (उबाठा)मध्ये दाखल झाले आहेत. आज त्यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते शिवबंधन बांधले.

स्वगृही आल्याचे समाधान वाटते, असे ते म्हणाले. मुळात मी कट्टर शिवसैनिक व ठाकरे परिवाराचा अनुयायी. हिंगणघाट व वर्धा जिल्ह्यात सेनेची बांधणी केली. इथल्या लोकांचे प्रेम मिळाल्याने तीन वेळा निवडून आलो. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी आशीर्वाद दिला आणि नारायण राणे यांच्या मंत्रिमंडळात मंत्रिपद लाभले. पुढे मात्र संवाद राहिला नाही. सेनेच्या काही मंडळींमुळे दुरावा आला. गैरसमज झाले. शांत बसलो. पण राजकीय पिंड म्हणून काँग्रेसमध्ये प्रवेश केला. तेथेही निराशा आली. म्हणून मग शिंदे यांच्या सेनेत गेलो.

तिथे मी ही विधानसभा निवडणूक लढण्यासाठी प्रयत्न केले, पण शेवटी कळले की गड्या आपलं गाव बरं. म्हणून भेटी घेतल्या. उद्धव ठाकरे यांनी कोणताही किंतू न ठेवता मला स्वीकारले. आता आपल्याच घरात यायचे होते म्हणून अटीशर्तीचा प्रश्नच उद्भवत नाही. महाविकास आघाडीच्या उमेदवारांसाठी प्रचार करणार, निवडून पण आणणार. जुने सोबती दुरावले होते, पण आता आपलेच घर म्हणून सर्व एकत्र राहू. अशी भूमिका त्यांनी मांडली.

महासागर
नागपूर
# वृत्तसागर
■ बुधवार, दि. १३ नोव्हेंबर २०२४ ■

## मोबाईल, लॅपटॉप चोरास दिल्लीतून अटक

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :** ईलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या दुकानात जाऊन मोबाईल आणि लॅपटॉप चोरी करणाऱ्या आरोपीला गुन्हे शाखा युनिट ४ च्या पथकाने दिल्लीतून अटक केली. हुसेन मकसूद अली (३५) रा. गौतम विहार, दिल्ली असे अटकेतील चोराचे नाव आहे.

गत २८ ऑक्टोबर रोजी मकसूद ग्राहक बनून खरेदी करण्याच्या बहाण्याने सिव्हील लाईन्स येथील इंस्पायर ॲप्पल स्टोअरमध्ये गेला होता. तेथे कार्यरत कर्मचारी रोहित गुप्ते याने त्याला मोबाईल दाखवत होता. या दरम्यान रोहितने एक १.४० लाख रुपये किंमतीचा फोन चार्जिंगसाठी लावला होता.

मकसूदने रोहितचे लक्ष विचलित करून मोबाईल चोरी केला होता. तक्रारीनंतर सदर पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला होता.

गुन्हे शाखा युनिट ४ चे पथकही या गुन्ह्याचा समांतर तपास करीत होते. तांत्रिक तपासाच्या मदतीने पोलिसांना मकसूदचा सुगावा लागला. तत्काळ एक पथक दिल्लीला रवाना झाले आणि त्याला अटक करून नागपुरात आणले.

चौकशीत मकसूदने मेडिकल चौकाजवळील व्हीआर मॉलच्या रिलायंस डिजिटल स्टोअरमधून एक लॅपटॉप चोरी केल्याचीही कबुली दिली. पथकाने चोरीचा माल जप्त करून मकसूदला पुढील कार्यवाहीसाठी सदर पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

## रामटेकमध्ये काँग्रेसचा मविआ विरोधातच प्रचार?

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १२ :** रामटेक मतदारसंघात महाविकास आघाडीने अधिकृत उमेदवार म्हणून शिवसेनेच्या (ठाकरे गट) विशाल बरबटे यांना उमेदवारी दिली आहे. मात्र, आघाडीचा घटक असूनही काँग्रेस पक्षातील नेते काँग्रेसचे बंडखोर राजेंद्र मुळक यांचा प्रचार करत आहे.

काँग्रेसची ही भूमिका संशयास्पद असून त्यांना छुपा पाठिंबा मिळत असल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार विशाल बरबटे यांनी केला. याची तक्रार शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांकडे केली असून काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनीही याकडे लक्ष द्यावे व हा संभ्रम दूर करावा, अशी मागणी बरबटे यांनी केली.



रामटेक मतदारसंघातील संपूर्ण घटनाक्रम फार वेदनादायक आहे. पूर्व विदर्भात एकूण २८ मतदारसंघ आहे. त्यापैकी केवळ एकच रामटेक मतदारसंघाची जागा शिवसेनेच्या उबाठा गटाला दिली गेली. त्यावरही काँग्रेसचे राजेंद्र मुळक यांनी बंडखोरी केली. ते अर्ज मागे घेतील, असे वाटले.

मात्र, सगळा घटनाक्रम आश्चर्यचकित करणारा आहे. आता तर काँग्रेसचे नेते बंडखोराच्या प्रचाराला लागले आहेत. राष्ट्रवादी गट संपूर्ण ताकदीने प्रचारात साथ देत आहे. मात्र काँग्रेसचे वागणे आघाडीच्या धर्माविरोधात आहे. महाविकास आघाडी म्हणून एकत्रित लढा देण्याऐवजी आपसात लढा द्यावा लागत आहे, असे विशाल बरबटे यांनी सांगितले.

घटनाक्रमाबाबत शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांशी संपर्कात आहोत. वरिष्ठ नेते लवकरच यावर तोडगा काढतील असा विश्वास बरबटे यांनी व्यक्त केला. यावेळी शिवसेनेचे राज्य संघटक सागर डबरासे, जिल्हाप्रमुख उत्तम कापसे उपस्थित होते.

नागपूर ग्रामीणमध्ये काँग्रेसच्या कोट्यात तीन जागा होत्या. त्यांना जर बंडखोर प्रिय होता तर त्याला तिथून उमेदवारी द्यायची होती. आधी आपल्या हक्काच्या जागा घ्यायच्या व नंतर मित्रपक्षांच्या जागांवर डोळा ठेवायचा, ही काँग्रेसची रणनीती चुकीची आहे. काँग्रेसकडून सोयीचे राजकारण केले जात आहे. जागावाटप झाल्यावर मित्रपक्षांच्या जागांचे विश्लेषण काँग्रेसकडून केले जात आहे.

काँग्रेसची ही खेळी समजण्यापलिकडची आहे. महाविकास आघाडीचे घटक पक्ष असूनही काँग्रेसच्या अशा वागणुकीमुळे विरोधकांशी लढा द्यायचा की आपसात लढायचे, असा प्रश्न बरबटे यांनी उपस्थित केला. निलंबनाची कारवाई ही केवळ दिखावा होती असे वाटत आहे. आम्ही नाव घ्यायला घाबरत नाही, मात्र आघाडी धर्मामुळे संयमाने घेत आहोत, असेही ते म्हणाले.

## पोस्टरवरून फाडला भांगेंचा फोटो

### काँग्रेस-भाजपच्या गोटात धास्तीचा आरोप

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :** दक्षिण पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघात भीमपुत्र विनय भांगे यांचे प्रचार पोस्टर फाडण्यात आलेत. या प्रकाराने मतदारसंघात खळबळ उडाली आहे. भांगे यांच्या उमेदवारीने इतर उमेदवारांमध्ये धस्ती असून त्यांच्या नैराश्याचा हा पुरावा असल्याचे भांगे आणि त्यांच्या समर्थकांनी म्हटले आहे.

यासंदर्भात बोलताना विनय भांगे म्हणाले की, आपण धडाक्यात प्रचार सुरू केला असून, जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. सभांमधील गर्दी बघून विरोधक काँग्रेस व भाजपच्या गोटात खळबळ माजली आहे. काँग्रेस आणि भाजपा या दोन्ही पक्षांनी भीतीपोटी हल्ले सुरू केले असून, आवाज दाबण्याचा प्रयत्न होत आहे.

भीमपुत्र विनय भांगे यांच्या तडाखेबंद प्रचाराने दक्षिण पश्चिम नागपूरमध्ये त्यांच्याबद्दल एक प्रचंड सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. विरोधकांना आता या प्रचाराच्या हवेचा त्रास होऊ लागला आहे. हीच जनतेच्या एकतेची, वंचितांच्या ताकदीची, आणि भीमपुत्राच्या नेतृत्वाचे लक्षण आहे, असे भांगे यांनी आवर्जून सांगितले. ही निवडणूक वंचितांचे भविष्य बदलण्याची आहे, २० तारखेला फक्त ७ नंबर बटन दाबा आणि वंचितांना सत्तेत आणा, असे भावनिक आवाहन भांगे यांनी केले आहे.




## प्रचार सोडून डास पळविले...

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :** मध्य नागपुरातील काँग्रेस उमेदवार बंटी शेळकेंनी सोमवारी प्रचारादरम्यान भाजप कार्यालयात घेतलेली गळाभेट चांगलीच चर्चेत आहे.

हे प्रकरण ताजे असतांनाच मंगळवारी मध्य नागपुरातील एका भागात डासांचा प्रकोप वाढल्याचा बंटी शेळकेंना फोन आला. त्यानंतर ते प्रचार सोडून थेट संबंधित ठिकाणी फॉगिंग यंत्र घेऊन पोहचले आणि फवारणी सुरू केली.

बंटी शेळके मंगळवारी सकाळपासून प्रचारात होते. दुपारी काही वेळ ते कार्यकर्त्यांशी प्रचाराबाबत संध्याकाळचे नियोजन ठरवत होते. यावेळी निकालस मंदीर, इतवारीतील एका नगरिकाचा त्यांना फोन आला. त्यांच्या भागात डास वाढल्याने अनेक नागरिक आजारी पडत असल्याचे नागरिकाने सांगितले. त्यानंतर बंटी शेळके प्रचार बैठक सोडून थेट संबंधित ठिकाणी फॉगिग यंत्रासह पोहचले.

येथे त्यांनी प्रथम स्थानिक नागरिकांशी संवाद साधत मग स्वतः फॉगिंग यंत्र घेऊन किटकनाशकाची फवारणी सुरू केली. थेट मध्य नागपूरातील उमेदवारच नागपूर महापालिकेची जबाबदारी असलेले फॉगिंगचे काम करत असल्याचे बघत स्थानिक नागरिकांनाही धक्काच बसला. हा व्हिडिओ बंटी शेळके यांनी स्वतः त्यांच्या विविध समाजमाध्यमांवर प्रसारीत केला. त्याला नागरिकांकडूनही चांगला प्रतिसाद मिळाला. त्यावर अनेक नागरिकांकडून वेगवेगळ्या प्रतिक्रियाही व्यक्त केल्या गेल्या.



बंटी शेळके यांनी समाज माध्यमावर व्हिडिओ प्रसारीत करत पोस्ट केली आहे. डेंग्यूचा प्रकोप बघता, मी पुन्हा एकदा आपल्या सेवेसाठी सज्ज आहे. निवडणूक येत-जात राहतील, पण जनसेवा कायम राहील. आपल्या प्रत्येकाच्या आरोग्याची काळजी घेणं हेच माझं प्रथम कर्तव्य आहे. संकटाच्या काळात साथ देणं, मदतीचा हात पुढे करणं झ हेच माझं काम आहे, आणि यापुढेही राहील. आपल्या सेवेच्या वचनासह. असे या पोस्टमध्ये नमुद केले आहे.

## साडेतीन लाखांच्या मालावर चोरट्यांनी केला हातसाफ

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :** कुटुंब बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने घरफोडी करीत ३ लाख ५१ हजार रुपयांच्या मालावर हातसाफ केला. ही घटना गिट्टीखदान पोलिस ठाण्यांतर्गत घडली.

पोलिसांनी जयंत शेषराव काळमेघ (५०) रा. नेताजी हाऊसिंग सोसायटी, फ्रेंड्स कॉलनीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

गत ७ नोव्हेंबर रोजी जयंता घराला कुलूप लावून कुटुंबासह मूळगावी गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचा कडीकोंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटातील सोन्याचांदीचे दागिने व रोख ६० हजार असा एकूण ३,५१,५०० रुपयांचा माल चोरी करून पसार झाला.

रविवारी सायंकाळी काळमेघ कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. घटनेची तक्रार पोलिसात करण्यात आली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. नागपूर शहरात चोरट्यांनी उच्छाद मांडला आहे.

## चिन्ना राठोडवर एमपीडीए

■ **नागपूर, दि. १२ :** अजनी परिसरात अनेक वर्षांपासून सक्रीय गुंड ओम उर्फ चिन्ना शोभा राठोड (23) रा. अजनी रेल्वे क्वॉर्टर विरुद्ध पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी एमपीडीए लावला आहे.

चिन्नाविरुद्ध खुनाचा प्रयत्न, खुनासाठी अपहरण, आर्म्स ॲक्ट, मारहाण, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, दंगा, दरोडा, दरोड्याची तयारी आणि तडीपारीच्या आदेशाचे उल्लंघन करण्यासह अनेक गुन्हे नोंद आहेत. तो गुन्हेगारीत सक्रीय होता. त्यामुळे त्याला दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले. तडीपारीची शिक्षा संपल्यानंतरही त्याने लुटमार आणि मारहाणीसह तीन गुन्हे केले. अजनीचे ठाणेदार नितीनचंद्र राजकुमार यांनी गुन्हे शाखेमार्फत त्याच्यावर एमपीडीए लावण्याचा प्रस्ताव पोलिस आयुक्तांकडे पाठवला.



■ **नागपूर :** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे मंगळवारी नागपूर येथे भाजपा उमेदवारांच्या प्रचार सभेसाठी आले होते. रेशिमबाग परिसरात त्यांची सभा झाली. यावेळी भाजपाचे उमेदवार मोहन मते आणि प्रविण दटके यांनी योगी यांना छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट दिली. यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे तसेच भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

## यूपीआय पेमेंटवरून लागला सुगावा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :** गंगा-जमुना परिसरात फिरायला गेलेल्या छिंदवाड्यातील तरुणाचे बहाण्याने अपहरण केले. कामठी रोडवरील निर्जनस्थळी घेऊन जात त्याला मारहाण केली. त्यानंतर त्याची मोटारसायकल, मोबाईल आणि रोकड लुटून आरोपी फरार झाले.

तपासादरम्यान माहिती मिळाली की, एका आरोपीने पीडिताला आईच्या नंबरवर 100 रुपये यूपीआयद्वारे पाठविण्यास सांगितले होते. त्यावरून पोलिसांनी आरोपींना शोधून काढत ताब्यात घेतले. दोन्ही आरोपींचे वय 17 वर्षे आहे.

छिंदवाडा येथे राहणारा एक 25 वर्षीय तरुण मोटारसायकलने नागपूरच्या गंगा-जमुना परिसरात फिरायला आला होता. परिसरात फिरताना त्याला रॅम्बो (बदललेले नाव) नावाचा अल्पवयीन मिळाला. रॅम्बोने त्याच्याशी मैत्री गाठून मौजमस्ती करायची असेल तर माझ्यासोबत ये, असे म्हटले. पीडित तरुणाने त्याची मोटारसायकल इतवारी रेल्वे स्थानकावर असल्याचे रॅम्बोला सांगितले.

दोघेही ऑटोने रेल्वे स्थानकावर पोहोचले. मोटारसायकल घेतली आणि लकडगंज परिसरात गेले. तेथे रॅम्बोने साथीदाराला फोन करून योजना सांगितली. दोघेही पीडित तरुणाला कामठी मार्गावर नाका नं. 5 जवळ निर्जनस्थळी घेऊन गेले. तेथे दोघांनीही तरुणाला जबर मारहाण केली. त्याची मोटारसायकल, मोबाईल आणि रोख 600 रुपये हिसकावून घेतले.

रॅम्बोला आणखी पैसे पाहिजे होते. मात्र पीडित तरुणाच्या खात्यात केवळ 168 रुपये शिल्लक होते. त्यातील शंभर रुपये रॅम्बोने आईच्या यूपीआय खात्यात वळते करण्यास सांगितले. त्यानंतर दोन्ही आरोपी पीडिताला तेथेच सोडून पसार झाले.

पारडी पोलिसांच्या मदतीने पीडित तरुण लकडगंज ठाण्यात पोहोचला. गुन्हे शाखेच्या पथकाने यूपीआय पेमेंटच्या माध्यमातून रॅम्बोच्या आईच्या खात्याचा शोध लावला. त्यात नोंद टेकानाका येथील पत्त्यावर पोहोचले. मात्र रॅम्बोचे कुटुंब तेथे भाड्याने रहात होते आणि चार वर्षांपूर्वीच त्यांनी ते घर सोडल्याची माहिती मिळाली.

त्यानंतर पोलिसांनी त्याचा नवीन पत्ता शोधून काढला आणि तेथे पोहोचले. रॅम्बो आणि त्याच्या साथीदाराला ताब्यात घेतले. चौकशीत दोघांनीही गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपींकडून लुटीचा माल जप्त केला आहे.

## अजनी पिट लाईन्सचे विद्युतीकरण पूर्ण

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १२ :** मध्य रेल्वे, नागपूर विभागाने अजनी वॉशिंग/पिट लाइन आणि नागपूर पिट लाइनचे विद्युतीकरण पूर्ण केले आहे.



प्रगत सुविधा आणि उच्च-गती क्षमतांसह प्रवाशांचा प्रवास अनुभव वाढविण्यासाठी डिझाइन केलेल्या अत्याधुनिक वंदे भारत ट्रेनच्या चाचणी आणि देखभालीसाठी हा विकास एक महत्त्वाचा टप्पा आहे. या पिट लाईन्सचे विद्युतीकरण आधुनिक, कार्यक्षम रेल्वे ऑपरेशन्ससाठी पायाभूत सुविधा अपग्रेड करण्यासाठी विभागाचे समर्पण प्रतिबिंबित करते. इलेक्ट्रिक सेटअप सक्षम करून, या सुविधा आता वंदे भारत गाड्यांच्या देखभालीच्या गरजा हाताळण्यासाठी सुसज्ज आहेत,

पर्यावरणास अनुकूल, ऊर्जा-कार्यक्षम रेल्वे प्रणालीला प्रोत्साहन देतात. हे यश मध्य रेल्वे, नागपूर विभागाची शाश्वत वाहतूक उपायांसाठी सतत असलेली वचनबद्धता अधोरेखित करते. विद्युतीकृत पिट लाइन्स हे स्वच्छ आणि हिरवेगार रेल्वेसाठी कार्यक्षमतेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.या विद्युतीकरणासह, नागपूर विभाग प्रवाशांसाठी सुरक्षित, विश्वासार्ह आणि पर्यावरणपूरक रेल्वे सेवा प्रदान करण्यात अग्रेसर आहे.

## ६ वर्षीय बालिकेचे लैंगिक शोषण

### नराधमाने घेतला चावा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :** चॉकलेटच्या बहाण्याने नराधम शेजाऱ्याने एका ६ वर्षीय चिमुकलीचे लैंगिक शोषण केले. त्याने मुलीच्या शरीरावर दाताने चावा घेतला. ही संतापदायक घटना पाचपावली ठाण्यांतर्गत बारसेनगर भागात घडली. नागरिकांमध्ये आरोपीबद्दल तीव्र संताप आहे. त्यांनी त्याच्या घरावर हल्लाही केला होता.

पोलिसांनी पीडित मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवत आरोपीला अटक केली. धीरेंद्र सुधीर भोतमांगे (५५) असे आरोपीचे नाव आहे.

धीरेंद्र एका खासगी कंपनीत बॅनर-पोस्टर बनविण्याचे काम करतो. चिमुकलीचे वडील मजुरी करतात आणि आरोपीच्या घराजवळच कुटुंबासह राहतात. गत रविवारच्या रात्री धीरेंद्रने चॉकलेट देण्याचे आमिष दाखवून चिमुकलीला घरी बोलावले. तेथे तिच्याशी अश्लील चाळे केले.

त्याने पीडितेच्या छातीवर दातांनी चावाही घेतला. याबाबत वाच्यता केल्यास मारण्याची धमकी दिली. मुलगी भेदारलेल्या अवस्थेत घरी आली. तिने कुटुंबीयांपासून ही घटना लपवून ठेवली. सोमवारी दुपारी आई तिला अंघोळ घालत असताना शरीरावर दातांनी चावा घेतल्याच्या जखमा दिसल्या. आईने विश्वासात घेऊन विचारपूस केली असता धीरेंद्रचे कुकृत्य बाहेर आले.

आई तत्काळ मुलीसह पाचपावली पोलिस ठाण्यात पोहोचली. पोलिसांनी घटनेची गंभीरता लक्षात घेत धीरेंद्र विरुद्ध लैंगिक अत्याचार आणि पोक्सो ॲक्टच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून अटक केली.

या घटनेची माहिती परिसरात पसरताच नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली. संतप्त जमाव पीडितेच्या नातेवाईकांसह धीरेंद्रच्या घरी पोहोचला. दोन्ही पक्षांकडून एकमेकांना शिविगाळ सुरू झाली. त्यानंतर धीरेंद्रचा भाऊ सत्यजीत भोतमांगे ठाण्यात पोहोचला.

त्याने नायब तहसीलदार असल्याचे सांगून कुटुंबाला सुरक्षा देण्याची मागणी केली. सत्यजीतने संपूर्ण प्रकरणच बोगस असल्याचे सांगत जिल्हाधिकाऱ्यांना फोन लावण्याची धमकी देत पोलिसांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी त्याच्या तक्रारीवरून पीडित मुलीच्या कुटुंबीयांविरुद्ध अदखलपात्र गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## पश्चिम नागपुरच्या प्रगतीत सर्व समाजाचा हात - आ. ठाकरे

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :** पश्चिम नागपूर विधानसभा क्षेत्रात हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शिख, ईसाई, पारशीसह इतर धर्मीय व समाजाचे मतदार आहेत. गेल्या पाच वर्षात पश्चिम नागपुरातील सर्व धर्मीय लोकांचा एकोपा मला कामाची स्फूर्ती देत असून, नागरिकांच्या सहकार्यानेच आपण विकास करू शकलो, अशी प्रांजळ कबुली पश्चिम नागपुरचे विद्यमान आमदार तथा नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विकास ठाकरे यांनी दिली.

जन-आशीर्वाद यात्रेत मंगळवारी गरीब नवाज नगर मस्जिद जवळ एका छोटेखानी सभेत विकास ठाकरे म्हणाले की, आपण पश्चिम नागपुरातील प्रत्येक समाजाच्या बांधवांच्या अडीअडचणी समजून घेत त्या सोडवण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असेन,असा शब्द दिला. मानकापूर, फ्रेंडस् कॉलनी, गोरेवाडा व दाभा येथील स्मशानभूमीचा पुनर्विकास होईल. मुस्लिम व बोहरा समुदायासाठी स्वतंत्र कब्रस्तान विकसित केले जातील. जुन्या जरीपटका आणि सिव्हिल लाइन्स येथे ख्रिश्चन सिमेंट्री आणि सेमिनरी हिल्स येथील पारसी सिमेंट्री येथे देखील अनेक कामे केली जातील.





विकास ठाकरे यांना महाराष्ट्र यादव महासभेने समर्थन जाहीर केले. संघटनेचे कार्यकारी अध्यक्ष सतिश यादव यांनी दिलेल्या समर्थन पत्रात त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र यादव महासभेच्या आयोजित बैठकीत सर्व उपस्थित पदाधिकाऱ्यांनी ठराव मंजूर केला. यात आगामी निवडणुकीत हिंदी भाषिक मतदारांच्या हितार्थ नागपूर जिल्ह्यातील सर्व १२ विधानसभा क्षेत्रात महाविकास आघाडीच्या उमेदवारांना पाठिंबा देण्याचा निर्णय महाराष्ट्र यादव महासभेने घेतला आहे.

येथील सर्व समाजात एकोपा जपण्यासाठी नेहमी प्रयत्नशीलच असतात असे नाही, तर ते सर्वधर्म समभाव जपत गुण्यागोविंदाने एकत्र राहत आहेत. हाच एकोपा मला विकास कार्य करण्यासाठी प्रेरणा देत असल्याचेही ठाकरे यावेळी म्हणाले.

## राऊतांच्या वक्तव्याचा व्यापाऱ्यांकडून निषेध

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १२ :** खासदार संजय राऊत यांनी केलेल्या एका वक्तव्याचा नागपूर चेंबर ऑफ कॉमर्सच्यावतिने निषेध करण्यात आला आहे. कैलास जोगाणी आणि अन्य व्यापाऱ्यांनी तीव्र शब्दात निषेध केला.

जोगणी म्हणाले की, देश व राज्याच्या जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा, रोजगार आणि महसूल वाढविण्यात व्यापारी वर्गाने नेहमीच मोलाचे योगदान दिले आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत उद्योगपतींचे योगदान जास्त आहे. अशा स्थितीत खासदार संजय राऊत यांनी व्यापाऱ्यांना लबाड म्हणणे म्हणजे त्यांचा अपमान करणे होय. राऊत यांनी माफी मागण्याची मागणीही करण्यात आली आहे.

## विमाशिचा आघाडीला पाठिंबा



■ **महासागर प्रतिनिधी, उमरेड, दि. १२ :** विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने महाविकास आघाडीला जाहीर पाठिंबा दिला आहे. मविआचे उमरेड येथील उमेदवार संजय मेश्राम यांना संघटनेचा पाठिंबा असल्याचे शिक्षक संघाने म्हटले असून, तसे पत्र संघटनेचे अध्यक्ष अरविंद देशमुख आणि सहकार्यवाह आ. सुधाकर अडबाले यांनी महा विकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांना पाठविले आहे.



# तुमान मध्ये रंगला खडा तमाशा

■ महासागर प्रतिनिधी

**वानाडोंगरी, १२ :** मौदा तालुक्यातील तुमान येथे दिवाळीच्या शुभ परवावर समस्त गाववासी यांच्या संयुक्त विद्यमाने, दुय्यम खडा तमाशाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध शाहीर, राजहंस देवगडे विरुद्ध महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध शाहीर ज्ञानेश्वर वाघमारे यांच्या दुय्यम खडा तमाशा चांगला रंगला, याप्रसंगी विदर्भ संघटक प्रमुख, महाराष्ट्र शाहीर परिषद पुणे, प्रबोधनकार शाहीर प्रदीप कडबे यांनी शाहीर राजहंस देवगडे यांच्या शाल पुस्तक देऊन जाहीर सत्कार करण्यात आला, यावेळी गट ग्रामपंचायत सरपंच गजभिये, रवी चव्हाण, केशवराव वासनिक, सुरेश सहारे, शाहीर अरुण मेश्राम, शाहीर रमेश रामटेके, शाहीर प्रदीप कडबे, प्रवीण चटवापा च इत्यादी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकांची शाळा मधील विद्यार्थ्यांनी केला मतदानाचा जागर

## ज्येष्ठ नागरिकांचाही सहभाग शंभर टक्के मतदानाची घेतली शपथ

■ महासागर प्रतिनिधी

**नागपूर, १२ :** नागपूर महानगरपालिकेतर्फे संपूर्ण शहरात मतदार जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानामध्ये रेशीमबाग येथील लोकांची शाळा मधील विद्यार्थी आणि शिक्षकांनी देखील उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला. मंगळवारी (ता.१२) लोकांची शाळा मधील विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृती रॅली काढून मतदानाचा जागर केला.






मतदारांचे पद्धतशीर शिक्षण आणि निवडणूक सहभाग अर्थात स्वीप कार्यक्रम अंतर्गत मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार नागपूर शहरामध्ये शंभर टक्के मतदान व्हावे याकरिता मतदार जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत मंगळवारी (ता.१२) लोकांची शाळा मधील विद्यार्थ्यांद्वारे जनजागृती करण्यात आली. या अभियानात ज्येष्ठ नागरिक महामंडळ विदर्भ नागपूर यांनी देखील सहभाग नोंदविला होता. रॅलीच्या प्रसंगी लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रभुजी देशपांडे, लोकांची शाळाच्या मुख्याध्यापिका रजनी राजूरकर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका माला केचे, पर्यवेक्षक श्रीकांत देशमुख, ज्येष्ठ नागरिक महामंडळ विदर्भ नागपूर चे पदाधिकारीसर्वश्री. ड. अविनाश तेलंग, विनोद व्यवहारे, डॉ. अरविंद शेंडे, डॉ. भुजाडे, बाबुराव लिखार, राजाभाऊ अंबाडे, प्रमोद अंजनकर, अरुण आनदेव आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्वांनी शंभर टक्के मतदानासाठी पुढाकार घेण्याची शपथ घेतली. लोकांची शाळा येथून मतदार जनजागृती रॅलीला सुरूवात झाली. यानंतर रॅली दसरा रोड, सिरसपेठ, अशोक चौक, रेशीमबाग या मार्गे पुन्हा शाळेत परत आली. रॅलीमध्ये सुमारे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. रॅलीच्या यशस्वीतेसाठी नागपूर महानगरपालिकेला लोक शिक्षण संस्थेचे कार्यवाह श्री. मनोहर ढोक, उपाध्यक्ष डॉ. वि.स. जोग, कोषाध्यक्ष श्यामकांत पुसदकर यांच्या मार्गदर्शनात शाळेचे सर्व शिक्षक, कर्मचारी आणि पालक प्रतिनिधींनी सहकार्य केले.

# आधी विरोधात आताप्रचारात, कुछ तो गडबड है दया

■ महासागर प्रतिनिधी

**काटोल, १२ :** काटोल मतदारसंघात सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन सतरंजी नावाची संघटना स्थापन केली मतदारसंघात परिवर्तन सभा आयोजित करत राष्ट्रवादीचे अनिल देशमुख व भाजपचे चरणसिंग ठाकूर या दोन्ही नेत्याविरोधात मोठा गाजावाजा करत यांना मतदार संघातून संपवण्याच वक्तव्य केले जात होते. आमदार होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या सतरंजी संघटनेच्या मात्र सुतळ्याच उसवण्यात आल्या. महायुतीचे भाजप नेते काटोल मतदारसंघात कुठल्याही कार्यक्रम प्रसंगी यायचे तेव्हा त्या मार्गावर सतरंजी संघटनेकडून स्वागताचे बॅनर लागायचे. व आपल्या सतरंजी संघटनेच वर्चस्व दाखवायचे या सतरंगी संघटनेमध्ये जवळपास नव्वद टक्के भाजपचे सदस्य होते महायुतीकडून २०२४ ची उमेदवारी सतरंजीच्या सदस्यांनाच मिळेल या आशेवर त्यांना ठेवण्यात आले. पण वेळेवर सतरंजीचा गेमच झाला आमच्या पक्षाने आमच्या सोबत विश्वासात केला असे वक्तव्य संदीप सरोदे यांनी खरसोलीच्या सभेत केले होते. सुनील केदार यांच्या अतिशय जवळचे प्रकाश वसु यांना तत्व पटत नसल्याने त्यांनी निवडणूक जाहीर होण्यापुर्वी आपला राजीनामा दिला.

अनिल देशमुख यांच्याकडून राजकारणात मला फार त्रास झाला आम्ही त्याला विरोध करू म्हणजे करूच अजित पवार गटाचे सतीश शिंदे यांनी अशाप्रकारे वक्तव्य केल्यानंतरही आता अनिल देशमुख यांच्या मांडीला मांडी लावून सलील देशमुखासाठी चरणसिंग ठाकूर विरोधात प्रचारात भिडले. शेकापच्या पक्षावर निवडून गेलेले भाजपवाशी येनवा सर्कलचे समीर उमप चरणसिंग ठाकूर यांना प्रचंड विरोध करणारे सध्या चरणसिंग ठाकुरासोबत गळ्यात दुपट्टे घालून फिरताना दिसत आहे. या सतरंजी संघटनेला पुन्हा अनिल देशमुख चरणसिंग ठाकुर यांच्या सतरंज्या उचलायच्या होत्याच तर मग हा तमाशा काटोल मतदारसंघात कशाला मांडलाय हा मतदारसंघातील जनता विचारत आहे.

# उत्तर भारतीयांचा छ्ठ पुजा महोत्सव उत्साहात

## उत्तर भारतीय समाजातील महत्त्वाचा सण



■ महासागर प्रतिनिधी

**वाडी, १२ :** परिसरातील द्रुगधामना, आठवा मैल, डिफेन्स, लाव्हा परिसरातील उत्तर भारतीयांनी ,हरिओम सोसायटी, इंद्रायणी नगर व गजानन सोसायटी येथील कृत्रीम तलाव व डिफेन्स तलावावर छ्ठ पुजा साजरी केली. या समाजात पवित्र छ्ठ पूजेला मोठे महत्व आहे. महीला द्वारे मुलांसाठी ही पूजा केली जाते. दोन दिवस घरीच पूजा केल्यानंतर गुरुवारी सायंकाळी मावळत्या सुर्याला अर्घ्य दिला दिले.शुक्रवारी पहाटे उगवत्या सूर्याला अर्घ्य देऊन पूजा समाप्त करण्यात आली. यावेळी डिफेन्स तलावावर मोठी गर्दी केली होती छट पूजे दरम्यान भाविकांनी जय छठी मैया म्हणत आशीर्वाद घेतले. छठ व्रत स्त्री,पुरुष आणि मुले नवीन कपडे घालतात आवश्यक पूजा साहित्यासह पूजेच्या कार्यक्रमस्थळी पोहोचले. आयोजकांतर्फे अर्घ्य मंडप, प्रकाशयोजना, कृत्रिम तलावाचे बांधकाम आणि सुशोभीकरण त्यासोबत योग्य ती व्यवस्था करण्यात आली होती. गजानन सोसायटीच्या क्रीडांगणात मोठ्या संख्येने लोक जमले होते. सकाळपासून छठ उपवासात सहभागी झाले होते. मोठ्या संख्येने भाविकांनी उगवत्या सूर्याची भक्तिभावाने पूजा करावी दुसरे अर्घ्य अर्पण करून सर्वांचा आनंद, समृद्धी आणि आनंदासाठी प्रार्थना केली. छठ च्या गाणी, प्रसाद वाटप, फटाक्यांची आतषबाजी सेलिब्रेशन करण्यात आले. हरिओम सोसायटी,महादेव नगर संकुलातही उत्सवासाठी विशेष बंदोबस्तात कार्यक्रम संपन्न झाला. रामप्रसाद पटले, रंगलाल राऊत, सार्वजनिक शिवमंदीर ट्रस्टचे अध्यक्ष कमल कनोजे, रोहित तिवारी , श्री कृपा इन्फ्राकॉनचे संचालक जितेंद्र रहांगडाले उपस्थित होते.



# जिल्हाधिकारी यांचा उपस्थीतीत रूट मार्च व मॉब डिस्पोजल

रामटेक :-( प्रतिनिधी )

रामटेक पोलीस स्टेशन अंतर्गत दि.१२ नोव्हेंबर ला दुपारी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ संबंधाने जिल्हाधिकारी विपिन इटनकर व नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांच्या मार्गदर्शनात रामटेक शहर मध्ये रूट मार्च व मॉब डिस्पोजल घेण्यात आले. रूट मार्चमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी रमेश बरकते, रामटेक पोलीस निरीक्षक आसाराम शेटे, अरोली ठाणेदार स्नेहल राऊत , देवलापार ठाणेदार नारायण तुरकुंडे सहित एकूण ०७ अधिकारी, ५४ अमलदार, आरसीपी पथक, एसएसबी पथक हजर होते. रूट मार्च पोलीस स्टेशन रामटेक, गांधी चौक,डॉ. आंबेडकर चौक ते बस स्टँड चौक असा घेण्यात आला. रूट मार्चमध्ये विधानसभा निवडणूक संबंधाने कुठेही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, तसेच आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही.याबाबत सूचना नागपूर जिल्हाधिकारी विपिन इटनकर यांनी दिल्या. गर्दीवर नियंत्रण कसे करता येईल या करिता बस स्टैंड चौक येथे प्रात्याक्षीक घेण्यात आले.

# तेजस संस्थेच्या ८ वे स्थापना दिनानिमित्त कामठी मोक्षधामचे अमित उके यांचा सन्मान



■ महासागर प्रतिनिधी

**कामठी, १२ :** राष्ट्रीय संत गाडगे बाबांच्या आदर्शावर चालणाऱ्या आणि त्यांच्या विचारांनुसार दहा कलमी कार्ये करणाऱ्या कामठी या तेजस बहुउद्देशीय संस्थेला ७ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ८ व्या स्थापना दिनानिमित्त अरगुलेवार यांची निवासस्थानी माजी उपाध्यक्ष महेंद्र भुटानी, सीए सुनील चोखारे यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात गेल्या ७ वर्षातील जनहिताचा उल्लेख केला, ज्यामध्ये कामठी मोक्षधाममध्ये गेली ३० वर्षे सेवारत असलेल्या अमित उके यांना महेंद्र भुटानी, सुनील चोखारेसंजय कनोजिया, श्रावण केझरकर, एम.ए. जब्बार, संस्थापक/ अध्यक्ष चंद्रशेखर अरगुलेवार आणि इतर मान्यवरांनी संस्थेचे सन्मानचिन्ह सल, पेन, रुमाल , श्रीफल आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानितकरण्यात आले.रोशन क्षीरसागर यांनी ७ वर्षात जनतेसाठी काय केले याची माहिती दिली, संस्थेचे संस्थापक/अध्यक्ष चंद्रशेखर अरगुलेवार यांनी आपल्या भाषणातपुढे जनता साठि क्या करायच्य आहे वृद्धाश्रम . तरूणांसाठी प्रशिक्षण केंद्र , संत गाडगे वाचनालयची स्थापना व मोठे स्थारवर सर्वधर्मीय मोफत सामूहिक विवाह आयोजित करणे, गोरगरिबांना रोगोपचारासाठी मदत करणे याची माहिती दिली महेंद्र भुटानी, सुनील चोखारे, उपेंद्र शेंडे, संजय कनोजिया, श्रावण केझरकर, एम.ए.जब्बार, यांनी संस्थाच्या कार्यची खुप प्रशंसा केली आणि संस्थाच्या कार्य करणारे साथीला शुभेच्छा दिली ,अर्जुन उपासे, शंकर बर्मन, रफिक शेख, नूरकलाम शेख, मिजवा रहमान, मुकेश कनोजिया, राजा संभोजी, रवींद्र तांडेकर, संघटनेचे सचिव किसन अरगुलेवार, उपाध्यक्ष देवीदास पेटारे सदस्य नरेश शिंदे उपस्थित होते.

# रेल्वेच्या नागपूर विभागाने दारीमेटा सब-स्टेशनवर ऊर्जा पायाभूत सुविधांचे अपग्रेड पूर्ण

■ महासागर प्रतिनिधी

**काटोल, १२ :** मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने दारिमेटा सब-स्टेशनपॉवर येथे महत्त्वपूर्ण ऊर्जा पायाभूत सुविधांचे अपग्रेड यशस्वीरित्या पूर्ण केले आहे, जो त्याच्या चालू असलेल्या आधुनिकीकरणाच्या उपक्रमांमध्ये आणखी एक मैलाचा दगड आहे. या प्रकल्पामध्ये संपूर्ण रेल्वे नेटवर्कमध्ये कार्यक्षमता आणि सुरक्षितता वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण विद्युत उपकरणे बदलणे समाविष्ट आहे. या नवीनतम अपग्रेडमध्ये, तीन जुने डबल पोल आयसोलेटर, पूर्वी ८०० -वर रेट केलेले, अपग्रेड केलेल्या १६०० - क्षमतेच्या आयसोलेटरने बदलले आहेत. क्षमतेचे हे दुप्पट होणे विभागाच्या उर्जा पायाभूत सुविधांमध्ये भरीव वाढ दर्शवते. नवीन उच्च क्षमतेचे पृथक्करण अधिक विश्वासार्ह विद्युत वितरण सुनिश्चित करतील, जे थेट रेल्वे ऑपरेशनच्या सुधारित कार्यक्षमतेस हातभार लावतील. मध्य रेल्वेचा नागपूर विभाग सुरक्षित, कार्यक्षम आणि आधुनिक रेल्वे सेवा देण्यासाठी वचनबद्ध आहे आणि भविष्यातील मागण्या पूर्ण करण्यासाठी पायाभूत सुविधांमध्ये सातत्याने सुधारणा करत आहे. हा विभाग मध्य भारतातील महत्त्वाचा रेल्वे केंद्र म्हणून काम करतो, प्रमुख शहरांना जोडतो आणि प्रवासी आणि मालवाहतूक दोन्हीची सोय करतो.

# काटोल येथे स्वीप अंतर्गत मतदार जनजागृती सभा

■ महासागर प्रतिनिधी

**काटोल, १२ :** तालुक्यातील खाजगी शाळा अंतर्गत सर्व मुख्याध्यापकांची निवडणूक मतदार जनजागृती व शासन शैक्षणिक उपक्रम नियोजन सभा गट साधन केंद्र सभागृहात पार पडली.

यावेळी मार्गदर्शक नव्याने रुजू झालेले गट विकास अधिकारी राजन पाटील, विस्तार अधिकारी रामदास गुंजरकर, शिक्षण विस्तार अधिकारी जावेद इकबाल शेख , कार्यालयीन कर्मचारी पाटील, लांबट, राऊत,आदी उपस्थित होते. विधान सभा निवडणुका २०नोव्हेंबर ला होत आहे. लोकसभा निवडणुकीत पूर्वीपेक्षा २ टक्के मतदान कमी झालेले होते. त्यामुळे यात टक्केवारी वाढीकरिता शाळा महाविद्यालयातून विविध माध्यमातून जनजागृती होण्यास मार्गदर्शन करण्यात आले.



**नवनियुक्त बिडीओ रुजू**

**तालुक्यातील मुख्याध्यापक यांना केले मार्गदर्शन**

मतदार जागृती करिता दि १६ नोव्हेंबर ला रॅलीचे आयोजन, चित्रकला, रांगोळी स्पर्धा, पथ नाट्य आदी कार्यक्रमातून शाळा सार्वजनिक ठिकाणे जनजागृती प्रभावी राबविण्यास बिडीओ पाटील यांनी सूचना दिल्या. शाळेत मतदान केंद्र असल्यास तेथील व्यवस्था बाबत नियोजन व अंमलबजावणी करिता मार्गदर्शन केले. याप्रसंगी माजी बिईओ गुंजरकर यांनी मनोगत व्यक्त केले. शैक्षणिक उपक्रम व योजनेबाबत ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी जावेद शेख यांनी यु डायस, नवभारत साक्षरता,अपहार आदी उपक्रमाबाबत विस्तृत माहिती दिली. नवनियुक्त बिईओ पाटील व माजी प्रभारी बिईओ गुंजरकर यांचा सत्कार करण्यात आला. आयोजनास गट साधन केंद्रातील चमू तथा विशेष तज्ञ पाटील, नितीन राऊत, प्रशांत लांबट,प्रशांत डांगे, नागमोते,खडसे आदींचे सहकार्य लाभले. संचलन व आभार विशेष तज्ञ धवड मॅडम यांनी केले.तालुक्यातील शैक्षणिक संस्था मतदान जनजागृती कार्यक्रम राबविणार असल्याचे सकारात्मक प्रतिसाद उपस्थित मुख्याध्यापक यांनी दिला. शाळा व निवडणुक मतदान कर्तव्यावर असल्याने शैक्षणिक व निवडणुका दोन्ही कामाचा भार कर्मचारी यांचेवर वाढला आहे.

# प्रसिद्ध कंपनीच्या नावावर बनावट प्लायवूडची विक्री

**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** प्रसिद्ध कंपनीच्या नावावर बनावट प्लायवूडची विक्री करणाऱ्या व्यावसायिकावर पोलिसांनी धाड टाकली. पोलिसांनी १.५२ लाख रुपये किंमतीची प्लायवूड शीट जप्त करून व्यावसायिकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. राजेश बद्रीनारायण बागडी (५०) रा. स्वामी नारायण एन्क्लेव्ह, वाठोडा असे आरोपी व्यावसायिकाचे नाव आहे.

फिर्यादी कृष्णकुमार रामउदीत सिंग हे नवी दिल्लीच्या ग्रीन प्लाय इंडस्ट्रीज या कंपनीत प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. ग्रीन हा त्यांच्या कंपनीचा नोंदणीकृत ट्रेडमार्क आहे. दिल्ली येथील कार्यालयातून सिंग यांना, लकडगंजच्या स्मॉल फॅक्ट्री परिसरातील माहेश्वरी प्लायवूड नावाच्या दुकानातून कंपनीच्या नावाने बनावट प्लायवूड विकले जात असल्याची माहिती मिळाली. सिंग यांनी कंपनीच्या वकिलासोबत माहेश्वरी प्लायवूडमध्ये जाऊन तपास केला असता माहिती खरी निघाली. त्यांनी पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी दुकानात येऊन तपास केली असता ग्रीन प्लाय प्रमाणेच हरा ईको ग्रीन नावाने प्लाय मिळाला. पोलिसांनी एकूण १ लाख ५२ हजार २४५ रुपये किंमतीचा प्लाय जप्त करून दुकान मालक राजेश बागडी विरुद्ध कॉपीराईट ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

# कन्हान येथे दिंडी यात्रा काढुन कार्तिकी एकादशी मोठ्या उत्साहात साजरी

## भाविकांनी विठ्ठल रुक्मिणी मंदिरात केली पुजा अर्चना , दिंडी यात्रेचे ठिकठिकाणी स्वागत

■ महासागर प्रतिनिधी

**कन्हान, १२ :** कन्हान शहरातील शिवाजी नगर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात कार्तिकी एकादशी निमित्य नागरिकांनी विधिवत पुजा अर्चना करून दिंडी यात्रा परिसरात भ्रमण करित विविध कार्यक्रमाने कार्तिकी एकादशी मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. मंगळवार (दि.१२) नोव्हेंबर ला कार्तिकी एकादशी निमित्य छत्रपती शिवाजी नगर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . विठ्ठल रुक्मिणी मंदिरात जेष्ठ नागरिक मुलचंद शिंदेकर , जयरामजी तिडके , भरत सावळे यांचा सह महिलांच्या प्रमुख उपस्थिति मध्ये



विठ्ठल रुक्मिणी देवीची विधिवत पुजा अर्चना , आरती करून मंदिर पासुन दिंडी यात्रा काढण्यात आली . दिंडी यात्रेत भगवानजी कावळे यांनी ढोलक आणि महिलांनी टाळ वाजवत दिंडी यात्रा परिसरात नगर भ्रमण करून दिंडी यात्रेचे मंदिरात समापन करण्यात आले . यावेळी दिंडी यात्रेचे ठिकठिकाणी फुलांच्या वर्षाने भाविकांनी जोरदार स्वागत केले . विठ्ठल रुक्मिणी मंदिरात फराळ , चाहा, पाणी वितरण करण्यात आले . महिलांनी मंदिरात भजन कीर्तन , आरती आणि विविध कार्यक्रम सादर करून कार्तिकी एकादशी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या प्रसंगी अनुराग महल्ले , कृणाल सिंग तिलवार , वामन येवले , देवचंद टिक्कम , भगवान कावळे , विनायक भिलकर , दिपक लाहोरी , हरीष तिडके , छोटु राणे , पवन टिक्कम , प्रदीप गायकवाड , शुभम येवले तडस काकाजी सह आदि महिला आणि भाविक भक्त मोठ्या संख्येत उपस्थित होते .

# स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी या उपक्रमांतर्गत मनपाने जमा केला

## २८,०२२ किलोंचा कचरा

■ महासागर प्रतिनिधी

**नागपूर, १२ :** मनपा अंतर्गत २१ ते ३१ ऑक्टोबर पर्यंत राबविण्यात आलेल्या स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी या अभियानाअंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमापैकी एक उपक्रम म्हणजे दिवाळीनिमित्त घरोघरी होणाऱ्या साफसफाई मध्ये नागरिकांनी उपयोगात नसणाऱ्या पण पुनर्वापर होऊ शकेल अशा वस्तूंचे संकलन कचरा संकलन केंद्रात करून कचरा पुनर्वापर करण्यास मदत करण्याचे आवाहन केल्या गेले होते. या अभियानांतर्गत २१ हजार ७३२ कुटुंबाने यामध्ये सहभाग दर्शविला व या अंतर्गत दहाही झोन मिळून ८१८.५ किलो चा कागद, ९२५ किलोचा ई वेस्ट, १३४८.१ किलोचे प्लास्टिक, २१,६६९.५ किलोचे कपडे व २५३२.५ किलोच्या इतर वस्तू जमा करण्यात आल्या. असा एकूण २८,०२२ किलोचा पुनर्वापर करण्याजोगा कचरा मनपाद्वारे जमा करण्यात आला. या कचऱ्याच्या पुनर्वापरासाठी झोननिहाय रेडयुस रियूज रिसायकल (आर. आर. आर.) सेंटर उभारण्यात आले आहे व या कामाची अंमलबजावणी करण्याचे काम तेथील बचत गटाच्या महिलांना सोपविण्यात आले आहे

### कोंबड्यांच्या झुंजीवर जुगार खेळताना ४ अटकेत

**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** कोंबडयांच्या झुंजीवर पैसे लावून जुगार खेळताना नंदनवन पोलिसांनी ४ जणांना अटक केली आहे. गुलशन किशोर चिलमलदवार (३२), सूरज उर्फ गोलू उमेश गुंतेवार (२७) दोन्ही रा. सीरसपेठ, राहुल उर्फ गब्बू शंकर ठाकरे (३०) रा. शिवाजीनगर, गंगाबाई घाट आणि खेमचंद लक्ष्मण पौनिकर (३१) रा. माताधरे मोहल्ला, जुनी मंगळवारी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

रमना मारोतीच्या एमएसईबी कार्यालयाजवळ सार्वजनिक ठिकाणी काही लोक कोंबड्यांच्या झुंजीवर जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी घेराबंदी करून तेथे धाड टाकली असता वरील आरोपी रंगेहात सापडले. पोलिसांनी सर्वांना अटक करून त्यांच्याकडून रोकड, मोबाईल आणि ९ जीवंत कोंबडे जप्त केले.

# हिंगणा मतदारसंघातील आमदार समीर मेघे यांचा जनसंवाद दौरा



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, १२ :
हिंगणा विधानसभा मतदारसंघातील रायपूर सर्कलमध्ये दि. ११ नोव्हेंबर २०२४ रोजी आयोजित जनसंवाद दौऱ्यात आमदार समीर मेघे यांनी मतदार संघातील विविध समस्या आणि स्थानिक विकासाच्या बाबींचा सखोल आढावा घेतला. यावेळी विविध गावातील नागरिकांशी संवाद साधत समस्यांबाबत चर्चा केली.

दौऱ्यात सहभाग घेणाऱ्या प्रमुख गावांचा समावेश होता:
नेरी (मानकर), मंगरूळ, मेटाउमरी, मोहगांव (झिल्पी), मांडवघोराड, किन्ही (धानोली), खैरी (पन्नसे), जुनेवानी, मोंढा, बिडबोरगांव, देवळी, सावंगी, आमगांव, खडका सुकळी (गुपचुप) आदी गावात त्यांनी भेटी दिल्या. पाणीपुरवठा, टाकी आणि नाली संबंधित समस्यांचा मागोवा घेतला. तसेच, येथील रस्त्यांचे आणि पुलाचे काम लवकर पूर्ण करावे, असे स्थानिक नागरिकांचे मत आहे. लाईटच्या कामाचीही मागणी केली गेली. पाणी आणि रस्ते बांधणीचे मुद्दे समोर आले. नागरिकांनी पाणी पुरवठा आणि रस्त्यांच्या दुर्दशेबाबत चिंता व्यक्त केली. येथील ग्रामीण भागातील रस्ते आणि पाणी समस्या तसेच लाईटच्या सुविधा वाढवण्याची आवश्यकता दर्शविण्यात आली.

दौऱ्यात सहभागी झालेल्या प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये सौ अर्चना ताई गिरी, नरेन्द्र वाघ, विकास दाभेकर, विशाल भोसले, गजेंद्र खोबे कैलाश गिरी, अनिल चानपुरकर, पंकज गजबे, कमलाकर आंदे, शरद मानकर, श्रीकांत गावंडे, सतीश रोडे, शिवम खांगार, आकाश पवार, आकाश खुरसंगे, अभिषेक, खुरसंगे, अंकितेक चतुर, वैभव रोडे, नितेश सोनुले, शंभु पवार, वामन फुलझेले, बाबाराव दाफ, अरुण बावनकर, बाबाराव टिपले, पपिता धनोरे, पियूष बावनकर, सोनू सुरकर, प्रमोद डाखले, मुरलीधर निघोट, जनार्धन निघोट, भारती दडमल, सतीश निघोड, महेंद्र सोंटक्के, रामदास पांडे, प्रकाश उमरेडकर, संजय लोखंडे, रवी वानखेडे, मधुकर पांडे, भोलाजी, रविंद्र आष्टनकर, सतीश मोरे, शेखर पिसे, अशोक इटनकर,
चिंतामण फटिंग, संजय चाफले, धनराज उमाळे, मिलिंद चाफले भिमेश्वर अवचट, विनोद काकडे, अशा सेलकर, सौरभ काकडे, शुभम शंभरकर, अजय हुरपाटे, विलास कोंढाळकर, विजय जाधव, धनराज (पाटील) पवार, बाबा (पाटील) येनुरकर, जयंत दहीकर, रजनी टोगे, जागेश्वर कावळे, राधिका राऊत, रवींद्र पवार, अमोल रामटेके, पनवर बावणे, मनोहर मानकर, चंदू येनुरकर, प्रणय बंड, सूरज गोतमारे, किशोर बीडवाईक, बाळू माळोदे, हरिभाऊ नाईक, पंकज गौर, दिनेश कोडापे, संजय झलके, निलेश नागोडे, ओमराज शर्मा, गजानन आकोने, राजेश मेश्राम, चिरकूट मेश्राम यांचा समावेश होता.

आमदार समीर मेघे यांनी जनसंवाद दौऱ्याद्वारे हिंगणा मतदारसंघातील विविध समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची माहिती प्राप्त केली. यावेळी, त्यांनी नागरिकांच्या समस्यांचे गांभीर्याने ऐकून त्यांचे निराकरण करण्यासाठी संबंधित विभागांशी समन्वय साधण्याचे आश्वासन दिले.

या दौऱ्याच्या माध्यमातून समीर मेघे यांनी मतदारसंघातील विविध ग्रामस्थांच्या समस्यांबाबत जागरूकता निर्माण केली आणि नागरिकांना त्यांच्या समस्यांबद्दल थेट संवाद साधण्याची संधी दिली.

आमदार समीर मेघे यांच्या जनसंवाद दौऱ्यामुळे हिंगणा विधानसभा मतदारसंघातील लोकांच्या समस्या समोर आल्या आहेत. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रशासन व आमदार यांच्या समन्वयाने काम करण्याची आवश्यकता आहे. आगामी काळात या समस्यांवर त्वरित कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले.

# १.८७ लाखांच्या मालावर नोकराचाच डल्ला

नागपूर, क्राईम रिपोर्टर. ईलेक्ट्रिकलच्या दुकानात काम करणारा नोकरच मालकाच्या विश्वासाचा गैरफायदा घेत चोरी करीत होता. या प्रकरणी तहसील पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपी नोकराला अटक केली. मंगेश रमेश मालखेडे (२४) रा. हुडको कॉलनी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. तपासात त्याने आतापर्यंत १.८७ लाख रुपयांचा माल चोरी केल्याचे समोर आले आहे. फिर्यादी किसनलाल परपूमल लराई (३४) रा. जरीपटका यांचे गांजाखेत चौकाजवळ एचएसबी लाईट हाऊस नावाने ईलेक्ट्रिक सामानाचे दुकान आहे. मागील ५ महिन्यांपासून मंगेश त्यांच्या दुकानात काम करीत होता. गत ९ नोव्हेंबरच्या सायंकाळी मंगेश लघुशंका करण्याच्या बहाण्याने दुकानातून बाहेर जात असताना किसनलाल यांना त्याच्यावर संशय आला. मंगेशला थांबवून झडती घेतली असता पॅन्टमध्ये वायरचे बंडल लपवून ठेवल्याचे आढळले. त्यांनी तहसील पोलिसांना सूचना दिली. पोलिसांनी मंगेशला ताब्यात घेऊन चौकशी केली असता जूनपासून आतापर्यंत त्याने १६२ वायरचे बंडल चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी मंगेशला अटक करून १ लाख ८७ हजार ५०० रुपयांचा माल जप्त केला. पुढील तपास सुरू आहे.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ९६ प्रकरणांची नोंद

## उपद्रव शोध पथकाची धडक कारवाई







■ महासागर प्रतिनिधी
महासागर, १२ : नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ५१ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. मंगलवार (१२) रोजी शोध पथकाने ९६ प्रकरणांची नोंद करून ४६,६००/-रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/-दंड) या अंतर्गत २४ प्रकरणांची नोंद करून ९,६००/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे (रु. १००/-दंड) या अंतर्गत ५ प्रकरणांची नोंद करून ५००/-रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/-दंड) या अंतर्गत ५ प्रकरणांची नोंद करून २,०००/- रुपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हीस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून २,००० रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत २५ प्रकरणांची नोंद करून १५,७००/- रुपयांची वसुली करण्यात आली. वर्कशाप, गॅरेजेस व इतर दुरुस्तीचे व्यवसायीकांने रस्ता, फुटपाथ मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत २ प्रकरणांची नोंद करून २,०००/ रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास २४ प्रकरणांची नोंद करून ४,८००/-दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास १० प्रकरणांची नोंद करून १०,०००/-दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मे.आर्या एमीनेस यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. १०,०००/-हजार रुपयांचा दंड वसूल केला. धरमपेठ झोन अंतर्गत मे. महालक्ष्मी ज्वेलर्स यांच्या विरूध्द विनापरवानगी विद्युत खांबांवर जाहिरातीचे बॅनर लावल्याप्रकरणी रु. १०,०००/-चे दंड वसुल करण्यात आला. तसेच मे. लक्ष्मीनारायण एन्क्लेव यांच्या विरूध्द विनापरवानगी विद्युत खांबांवर जाहिरातीचे बॅनर लावल्याप्रकरणी रु. १०,०००/-चे दंड वसुल करण्यात आला. हनुमान नगर झोन अंतर्गत मे.नाव्या एन्क्लेव यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. १०,०००/-हजार रुपयांचा दंड वसूल केला. गांधीबाग झोन अंतर्गत मे. नीखील स्वीट्स यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू.५०००/हजार रुपयांचा दंड वसुल केला. सतरंजीपुरा झोन मे. धोटे ट्रेडर्स यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. ५०००/-हजार रुपयांचा दंड वसुल केला. उपद्रव शोध पथकाने ६ प्रकरणांची नोंद करून रू. ५०,०००/ दंड वसूल केला.

# रेल्वेच्या नागपूर विभागाने ऑपरेशनल कार्यक्षमता व सेवा गुणवत्ता वाढविण्यासाठी व्हेंडर मॅनेजमेंट सिस्टम लाँच

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, १२ :
मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने प्रगत, एकात्मिक विक्रेता व्यवस्थापन प्रणाली ऍप्लिकेशनची यशस्वीपणे अंमलबजावणी केली आहे ज्याचा उद्देश रेल्वे स्थानकांवर आणि ऑनबोर्ड ट्रेनमध्ये केटरिंग आणि नॉन-कॅटरिंगसेवा प्रदान करणाऱ्या विक्रेत्यांचे निरीक्षण सुधारणे आहे. नवीन सिस्टीममध्ये क्यूआर कोड तंत्रज्ञानाचा समावेश करण्यात आला आहे ज्यामुळे विक्रेते ऑपरेशन्स सुव्यवस्थित होतात, अनुपालन सुनिश्चित होते आणि रेल्वेच्या महसूलाचे रक्षण होते.

व्हेंडर मॅनेजमेंट सिस्टम ही पोलिस पडताळणी, वैद्यकीय इतिहास आणि आधार कार्ड तपशील यांसारख्या महत्त्वाच्या विक्रेता डेटावर रिअल-टाइम ऍक्सेस प्रदान करण्यासाठी डिझाइन केले आहे, ज्यामुळे पारदर्शकता आणि ऑपरेशनल कार्यक्षमता वाढते. हे सेवा मानकांचे काटेकोर पालन सुनिश्चित करून, वारंवार उल्लंघनाच्या बाबतीत डिफॉल्ट विक्रेत्यांना काळ्या यादीत टाकण्याची यंत्रणा देखील देते.

ऍप्लिकेशनची प्रमुख वैशिष्ट्ये:
* -आधारितप्रमाणीकरण: निर्बाध विक्रेता ओळखण्यास अनुमती देते आणि विक्रेता माहितीची सत्यता सुनिश्चित करते.

**एक्सपायरी अलर्ट:** पोलिस पडताळणी, वैद्यकीय फिटनेस आणि कराराची वैधता यासारख्या महत्त्वाच्या विक्रेता अनुपालन डेटासाठी स्वयंचलितपणे स्मरणपत्रे व्युत्पन्न करते.

**रिअलटाइम डेटा ऍक्सेस:** पेपरलेस आणि कार्यक्षम प्रक्रियेस प्रोत्साहन देऊन कोडद्वारे विक्रेता माहितीवर त्वरित प्रवेश.

**केंद्रीकृत डेटा स्टोरेज:** सर्व विक्रेता-विशिष्ट डेटा केंद्रीय सर्व्हरमध्ये सुरक्षितपणे संग्रहित केला जातो, जलद पुनर्प्राप्ती आणि सुलभ व्यवस्थापन सुनिश्चित करते.

व्यवस्थापन माहिती प्रणाली विक्रेता कामगिरी आणि करार व्यवस्थापनावरील स्वयंचलित अहवाल विभागाला आर्थिक पारदर्शकता राखण्यात आणि महसूल संकलन सुव्यवस्थित करण्यात मदत करतात.

* सुधारित समन्वय: रिअल-टाइम डेटा शेअरिंग आणि मॉनिटरिंगसाठी कमर्शियल इन्स्पेक्टर, आरपीएफ, जीआरपी, तिकीट तपासणी कर्मचारी आणि दक्षता टीम यांच्यात अखंड संवाद साधणे.

कॅटरिंग स्टॉल्स, ऑनबोर्ड केटरिंग सेवा आणि इतर मूल्यवर्धित सुविधांसह प्रवाशांना थेट सेवा देणाऱ्या व्यावसायिक करारांशी संबंधित विक्रेत्यांवर लक्ष केंद्रित करून ही प्रणाली पहिल्या टप्प्यात आणली गेली आहे. नागपूर विभागातील एकूण ५६८ विक्रेते आणि १०५ व्यावसायिक युनिट्स ऑनबोर्ड केले गेले आहेत, त्यांच्या संबंधित डेटासह - पोलिस पडताळणी, वैद्यकीय प्रमाणपत्रे, आधार माहिती आणि छायाचित्रांसह सिस्टममध्ये फेड केले गेले आहे.

प्रत्येक विक्रेत्यासाठी कोड व्युत्पन्न केले गेले आहेत आणि त्यांच्या ओळखपत्रांवर चिकटवले गेले आहेत, ज्यामुळे रेल्वे कर्मचाऱ्यांना विक्रेत्याची ओळखपत्रे तत्काळ सत्यापित करण्यासाठी सहज स्कॅनिंग करता येते. सिस्टीमची मोबाइल प आवृत्ती व्यावसायिक निरीक्षक, , , तिकीट तपासणी कर्मचारी आणि दक्षता संघांद्वारे प्रवेशयोग्य आहे, विक्रेत्याच्या माहितीवर अखंड आणि त्वरित प्रवेश सुनिश्चित करते.

श्री अमन मित्तल, वरिष्ठ विभागीय व्यवसायिक व्यवस्थापक, नागपूर, यांनी या उपक्रमावर विश्वास व्यक्त करताना सांगितले की, या नवीन प्रणालीमुळे विक्रेत्यांच्या व्यवस्थापनात अधिक पारदर्शकता येईल आणि रेल्वे स्थानकांवर आणि ऑनबोर्ड गाड्यांवर दिल्या जाणाऱ्या सेवेच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा होईल. ऑपरेशनल कार्यक्षमता आणि ग्राहकांचे समाधान वाढविण्यासाठी आमच्या चालू असलेल्या प्रयत्नांमध्ये हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. अंमलबजावणी हा नागपूर विभागाच्या डिजिटल परिवर्तनातील एक महत्त्वाचा टप्पा आहे आणि मध्य रेल्वेवरील विक्रेता व्यवस्थापनात एक नवीन बेंचमार्क स्थापित करेल अशी अपेक्षा आहे.



## ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत रेल्वे संरक्षण दल

# वर्धा यांनी दोन अल्पवयीनची सुटका केली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, १२ : रेल्वे प्रोटेक्शन फोर्स वर्धा यांनी त्यांच्या चालू असलेल्या ऑपरेशन नन्हे फरिश्ते चा एक भाग म्हणून वर्धा रेल्वे स्टेशन, प्लॅटफॉर्म क्रमांक २ येथे दोन अल्पवयीन मुलींची यशस्वीरित्या सुटका केली. नियमित गस्तीवर असताना, उपनिरीक्षक आर.के. मिश्रा हरवलेल्या आणि मदतीची गरज असलेल्या मुलींना भेटले. मध्य प्रदेशातील अनुपपूर येथील रहिवासी असलेल्या या मुली चुकून मुंबईला जाणाऱ्या ट्रेनमध्ये चढल्या होत्या, आणि ती जबलपूरला जाणारी समजली होती. ते त्यांच्या कुटुंबीयांना न सांगता, शैक्षणिक संधी शोधत घर सोडले होते, परंतु प्रवासादरम्यान ते विचलित झाले आणि प्रवासातील चुकीची दिशा लक्षात आल्यावर वर्धा स्टेशनवर उतरले. त्वरीत कृती करत, आरपीएफ वर्धा यांनी निरीक्षक वर्धा यांना परिस्थितीची सूचना दिली आणि मुलींना आरपीएफ वर्धा कार्यालयात नेले. चाइल्डलाइन वर्धाच्या सहकार्याने, आरपीएफने अल्पवयीन मुलांचा सुरक्षित ताबा आणि आरोग्य सुनिश्चित केले. चाइल्डलाइनचे प्रतिनिधी, पर्यवेक्षक पुरुषोत्तम कांबळे आणि केस वर्कर शीतल घोडाराव आणि सूरज वानखडे हे मुलींची जबाबदारी घेण्यासाठी तातडीने पोहोचले.

मानक प्रोटोकॉलचे पालन करून, अल्पवयीन मुलींची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आणि त्यांना चाइल्डलाइन वर्धा येथे सुपूर्द करण्यात आले, कुटुंबाला सूचित करण्यात आले आणि त्यांच्या सुरक्षिततेची हमी देण्यात आली.

ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत हे बचाव मध्य रेल्वेच्या संपूर्ण नेटवर्कवरील प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि कल्याणासाठी असलेली अटल वचनबद्धता अधोरेखित करते.

# दहावीच्या विद्यार्थ्यांची वर्षानंतर गाठ भेट

## समर्थ हायस्कूल रामटेक च्या माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना दिला उजाळा



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, १२ :
रामटेक येथील समर्थ हायस्कूलच्या १९९८ बॅचच्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहमिलन नुकतेच, समर्थ हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय रामटेक येथे पार पडले. कार्यक्रमात एकूण ३० विद्यार्थ्यांसमवेत आजी-माजी शिक्षकांनी सुद्धा सहभाग घेतला.

समर्थ हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य व तत्कालीन दहावी बॅचच्या वर्गशिक्षिका सौ. ममता लोखंडे मॅडम, माझी प्राचार्य गायधने सर, माजी प्राचार्य कुरेशी सर, माजी उपप्राचार्य कस्तुरे सर, कांबळे सर, टाकळे मॅडम, माने मॅडम उपस्थित होते. श्री समर्थ शिक्षण मंडळाचे सचिव ऋषिकेश किंमतकर तसेच सदस्य सारंग किंमतकर यांची प्रमुख अतिथी म्हणून विशेष उपस्थिती होती.
महाविद्यालयाच्या प्राचार्य व तत्कालीन दहावी वर्गाच्या वर्गशिक्षिका सौ. ममता लोखंडे मॅडम ह्या होत्या. माजी विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या या आगळ्यावेगळ्या व भावनिक कार्यक्रमाने महाविद्यालयाच्या प्राचार्या, मनोगत व्यक्त करताना भावनिक झाल्या व आज पर्यंत मी केलेल्या माझ्या प्रामाणिक सेवेची विद्यार्थ्यांकडून मिळालेली ही पोचपावती आहे अशी भावना व्यक्त केली. तब्बल २६ वर्षानंतर माजी विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या प्रयत्नांनी, विद्यार्थी व आजी-माजी शिक्षकांचा पुनर्मिलन सोहळा आयोजित केला गेला. जुन्या मित्र-मैत्रिणींच्या व शिक्षकांच्या गोड आठवणींना उजाळा देताना या कार्यक्रमाने त्यांना एकत्र आणले व छान असा पुनर्मिलनाचा कार्यक्रम घडून आणला जी प्रत्येकाच्या हृदयात कायमचे घर करेल. कार्यक्रमाची सुरुवात श्री समर्थ शिक्षण मंडळाचे सचिव ऋषिकेश किंमतकर यांच्या प्रेरणादायी शब्दांनी झाली. शिक्षकांनी माजी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाला मनापासून दाद दिली आणि त्यांनी हा सोहळा साजरा करण्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले याबद्दल त्यांनी त्यांचे आभार मानले. पुनर्मिलनाच्या या कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या शालेय जीवनाच्या गोड आठवणी एकमेकांसोबत शेअर केल्या. सहलींची, क्रीडा स्पर्धेतील आनंदाचे क्षण आणि शाळेतील सर्वात मजेदार प्रसंग यावर त्यांच्या हसऱ्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा आठवणींचा सगळा रंग उतरला. यावेळी शालेय जीवनाने त्यांना दिलेल्या मार्गदर्शनाच्या आणि शिक्षणाच्या किमती धड्यांची जाणीव ही झाली. आयोजक विद्यार्थ्यांनी एकमेकांवर असलेल्या विश्वास आणि मित्रत्वाच्या बंधावर भर दिला एकत्र येऊन हा कार्यक्रम यशस्वी करणे या प्रत्येकाने केलेल्या छोट्या छोट्या प्रयत्नामुळेच शक्य झाले त्यात एक खास गोष्ट म्हणजे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना फक्त शालेय जीवनातील शिकवणींचा पाठ दिला नाही तर प्रत्येकाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी त्यांना प्रेरणा दिली. कार्यक्रमाचे संचालन माजी विद्यार्थी प्रवीण थेटे यांनी केले व आभार प्रदर्शन गोपाल देशमुख यांनी केले. जयश्री वलोकर, नीतू अहिरकर, मीनाक्षी बावनगडे यांनी मनोगत व्यक्त केले. माजी विद्यार्थ्यांमध्ये प्रवीण थेटे, शिव कदम, संजय खजुरे, प्रवीण झाडे, गोपाळ देशमुख, लक्ष्मण रॉय, राजकुमार खोब्रागडे, अनमोल चौरे, प्रदीप मोहुर्ले , नितीन चांदेकर, रणजीत बावनकुळे, शंकर खोडे, संतोष झाडे, पंकज कारामोरे, योगेश डबलडूके, सविता उकासे आम्रपाली रंगारी, अनिता आवारी, जयश्री बलगेवार, मुमताज मालाधारी हे माजी विद्यार्थी उपस्थित होते. प्रामुख्याने या अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन पूनम निनावे, प्रवीण थेटे, शिव कदम या माजी विद्यार्थ्यांच्या कल्पनेतून आयोजित करण्यात आले होते.

# प्रतिबंधित तंबाखू, गुटखा जप्त



नागपूर, क्राईम रिपोर्टर. गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने जनता चौकातील एका पानठेल्यावर धाड टाकून मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित तंबाखू आणि गुटखा जप्त केला. पानठेला चालक गणेश देवनारायण पांडे (३९) रा. विजय भवन, जनता चौक याला अटक केली.

सोमवारी सायंकाळी गुन्हे शाखेचे पथक धंतोली पोलिस ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान महाराष्ट्र उपहारगृहाजवळील भोला पान मंदिर येथून सर्रास प्रतिबंधित पान मसाला, गुटखा आणि तंबाखूची विक्री होत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी सापळा रचून पानठेल्यावर धाड टाकली. झडमीमध्ये विविध कंपन्यांचा प्रतिबंधित पान मसाला आणि तंबाखू मिळाला. पोलिसांनी पानठेला चालक पांडे याला अटक करून ७१,१६३ रुपये किंमतीचा माल जप्त केला. पुढील कार्यवाहीसाठी त्याला मालासह धंतोली पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले आहे.

## रेल्वे प्रोटेक्शन फोर्स सीबीआय नागपूर टीमने ऑपरेशन

# बेकायदेशीर रेल्वे ई-तिकीटिंग ऑपरेशन उघड केले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, १२ :
१० नोव्हेंबर २०२४ रोजी जलद आणि यशस्वी ऑपरेशनमध्ये, रेल्वे संरक्षण दल नागपूरने, गुन्हे गुप्तचर शाखा नागपूर टीमच्या सहकार्याने, अवैध रेल्वे ई-तिकीटिंग ऑपरेशन उद्ध्वस्त केले. ऑपरेशन उपलब्ध अंतर्गत मिळालेल्या विश्वसनीय माहितीच्या आधारे आणि ने ९ नोव्हेंबर २०२४ रोजी नागपुरातील संशयिताच्या निवासस्थानी तपशीलवार तपास सुरू केला. सीआयबी नागपूरचे एएसआय मुकेश राठोड आणि कॉन्स्टेबल श्याम झादोकर यांच्या सहकार्याने या ऑपरेशनचे नेतृत्व सहाय्यक उपनिरीक्षक (एएसआय) अश्विन पवार आणि आरपीएफ नागपूरचे कॉन्स्टेबल गोवर्धन सवई यांनी केले. संशयित बेकायदेशीरपणे ई-तिकीट बुक करण्यासाठी एकाधिक वैयक्तिक वापरकर्ता आयडीसह माय ट्रॅव्हल बाजार प्लॅटफॉर्मवर वैध एजंट आयडी वापरत असल्याचे आढळले.



संशयिताने प्रति तिकिटासाठी रु५०-१०० अतिरिक्त कमिशन घेतल्याची कबुली दिली.

तपासादरम्यान, टीमने सात छापील तिकिटे, एक लॅपटॉप आणि एक मोबाइल फोन जप्त केला, जप्त केलेल्या वस्तूंची एकूण अंदाजे किंमत रु३०,२५४.७५ आहे. या बाबी पुरावा म्हणून दस्तऐवजीकरण करण्यात आल्या आहेत. एएसआय अश्विन पवार यांच्या नेतृत्वाखालील तपास, बेकायदेशीर कारवाईच्या मर्यादेबाबत अधिक तपशील उघड करण्यासाठी सुरू आहे.

# नागपूर जिल्ह्याच्या १२ विधानसभा मतदारसंघात केवळ पंधरा महिला रिंगणात

■ सुजाता बंडावार
नागपूर, दि. १२ :
नागपूर जिल्ह्यात एकूण बारा विधानसभा मतदारसंघ असून त्यापैकी सहा विधानसभा मतदार संघ हे शहरात तर सहा विधानसभा मतदार संघ ग्रामीण भागात येतात.

विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात एकूण बारा विधानसभा मतदारसंघांमध्ये एकंदर 217 उमेदवार उभे आहेत, त्यापैकी केवळ 15 महिला उमेदवार असून हे प्रमाण एकूण उमेदवारांच्या केवळ सात टक्के आहे त्यामुळे नारी शक्तीचा नारा देणाऱ्या, लाडक्या बहिणी म्हणून त्यांच्या सशक्तीकरणासाठी योजना सुरू करणाऱ्या सत्ताधारी सरकार व सरकार विरोधी पक्षांकडून या निवडणुकीत महिलांना मोठ्या संख्येने कौल देण्यात येईल ही अपेक्षा मात्र फोल ठरली आहे.

नागपूर शहरात सहा मतदारसंघांमध्ये एकूण 117 उमेदवार विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात असून त्यापैकी केवळ दहा महिलांना उमेदवारी मिळाली आहे तर नागपूर ग्रामीण भागातील एकूण सहा मतदारसंघांमध्ये एकंदर 100 उमेदवार रिंगणात असून त्यापैकी केवळ पाचच महिलांना उमेदवारी मिळाली आहे.

अशाप्रकारे नागपूर जिल्ह्यातील एकूण 217 उमेदवारांपैकी केवळ 15 महिलांना उमेदवारी मिळाली असून हे प्रमाण केवळ सात टक्के आहे. या 15 महिलांपैकी सावनेर विधानसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाकडून केवळ अनुजा केदार ज्या आमदार सुनील केदार यांच्या पत्नी आहेत त्यांना उमेदवारी मिळाली आहे.

**मतदारसंघनिहाय महिला उमेदवारांची संख्या**

| विधानसभा मतदार संघ | एकूण उमेदवार | महिला उमेदवार |
|---|---|---|
| नागपूर द. पश्चिम | 12 | 1 |
| नागपूर पूर्व | 17 | 1 |
| नागपूर उत्तर | 26 | 2 |
| नागपूर पश्चिम | 20 | 2 |
| नागपूर दक्षिण | 22 | 4 |
| नागपूर मध्य | 20 | 0 |
| कामठी | 19 | 0 |
| रामटेक | 17 | 0 |
| काटोल | 17 | 0 |
| हिंगणा | 18 | 2 |
| सावनेर | 18 | 2 |
| उमरेड | 11 | 1 |
| एकूण | 217 | 15 |

याच मतदारसंघात बहुजन समाज पार्टीकडून तारा गौरकर यांना उमेदवारी मिळाली आहे तर उमरेड मतदार संघात वंचित बहुजन आघाडी तर्फे सपना मेश्राम यांना उमेदवारी देण्यात आली आहे. जिथे सत्ताधारी सरकार व विरोधी सरकार महिला सशक्ति करण्यासाठी महिलांसाठी महालक्ष्मी योजना, लाडकी बहीण योजना आणत आहेत, जिथे 33% महिलांच्या आरक्षणाचा मार्ग सुकर झालेला आहे तिथे जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीसाठी महिला उमेदवारांची टक्केवारी राजेनैतिक अनास्था व राजनैतिक प्रतिगामित्व दर्शवित आहे.

याशिवाय नागपूर शहर विभागात 117 उमेदवारांपैकी 47 उमेदवार हे अपक्ष उभे आहेत तर नागपूर ग्रामीण विभागात एकंदर 100 उमेदवारांपैकी 41 उमेदवार अपक्ष उभे आहेत अशा प्रकारे एकूण 217 उमेदवारांपैकी 88 उमेदवार हे अपक्ष असून हे प्रमाण 41 टक्के एवढे जास्त आहे. त्यामुळे अपक्ष उमेदवारांना दुर्लक्षित करणे प्रस्थापितांना महागात पडू शकते.

# उपमुख्यमंत्र्याच्या विरोधात क्रेन ऑपरेटर मैदानात





■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :
राज्यात निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला आहे. सर्वच प्रमुख राजकीय पक्ष आणि नेते दिवसरात्र एक करून मतदारांपर्यंत पोहोचण्याच्या प्रयत्नात आहेत. राज्यात असे अनेक मतदारसंघ आहेत ज्यावर संपूर्ण राज्यातील जनतेचे लक्ष लागून आहे. असाच एक मतदारसंघ नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघ आहे.

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः या मतदार संघातून निवडणुकीच्या रिंगणात आहेत. महाविकास आघाडीने काँग्रेसच्या प्रफुल गुडधे पाटील यांना उमेदवारी दिली.

या हायप्रोफाईल मतदारसंघात या दोन्ही प्रमुख उमेदवारांशिवाय आणखी एका उमेदवाराचे नाव चर्चेत आहे. फडणवीस आणि गुडधे पाटील यांना आव्हान देणारा नितीन गायकवाड नावाचा हा उमेदवार क्रेन ऑपरेटर असून सातारा येथील रहिवासी आहे.

या ३१ वर्षीय उमेदवाराचे पूर्ण नाव नितीन विश्वास गायकवाड आहे. सातारा जिल्ह्यातील वाई मतदारसंघातील ते रहिवासी आहेत. निवडणूक आयोगाकडे दाखल केलेल्या शपथपत्रानुसार, नितीन गायकवाड हे क्रेन ऑपरेटर आहेत. त्यांच्या हातात केवळ ६ हजार रोख रक्कम असून बँक खात्यात २ हजार रुपये जमा आहेत. त्यांच्यावर एक लाख ७२ हजार रुपयांचे कर्जही आहे.

कोल्हापूरच्या शिवाजी महाविद्यालयातून त्यांनी बारावी उत्तीर्ण केली आहे. यंदा त्यांची प्रकृती बरी नसल्याने त्यांनी अद्याप प्रचाराला सुरुवात केली नाही, मात्र येत्या दोन-तीन दिवसात जोरदार प्रचार करून दक्षिण-पश्चिम विधानसभा काबीज करण्याचा त्यांचा मानस आहे. २०१९ मधील विधानसभा निवडणुकीत गायकवाड यांनी मुंबईच्या वरळी विधानसभा मतदारसघातून शिवसेनेच्या आदित्य ठाकरेविरुद्ध निवडणूक लढविली होती.

नितीन गायकवाड यांनी सांगितले की त्यांना फडणवीस यांची नीती पटलेली नाही. त्यांनी राज्यात फोडाफोडीचे राजकारण सुरू केले आहे म्हणूनच नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा क्षेत्रातून निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

गरिबांचे आणि कष्टकऱ्यांचे प्रश्न घेऊन मतदारसंघात प्रचार करणार आहे. राज्यात चार पैसे दिले जात आहेत, मात्र वाईट पद्धतीने काढलेही जात आहे. याचा विरोध करण्यासाठी निवडणूक लढवत असल्याचे नितीन गायकवाड म्हणाले.

# काँग्रेसचे बंटी थेट भाजपा कार्यालयात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :
विधानसभा निवडणुकीच्या मतदानासाठी राज्यात प्रचाराची जोरदार रणधुमाळी सुरू आहे. केंद्रातले नेते, इतर राज्यातले नेते सध्या महाराष्ट्रात प्रचार करत आहेत. तर उमेदवारही जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी मतदारसंघ पिंजून काढत आहेत.

विदर्भात यंदा काँग्रेस आणि भाजपा असा सामना रंगला आहे. मागच्या दोन निवडणुकांत विदर्भात भाजपाने यश मिळविले होते. मात्र आता विदर्भावर पुन्हा एकदा वर्चस्व मिळविण्यासाठी काँग्रेसकडून जोरदार प्रयत्न होताना दिसत आहेत.

अशातच नागपूर मध्य विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे अधिकृत उमेदवार बंटी शेळके हे पळत पळत भाजपा कार्यालयात घुसल्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या घटनेचा व्हिडीओ खुद्द बंटी शेळके यांनी आपल्या एक्स अकाऊंटवर टाकला आहे.

नागपूर मध्य विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे बंटी शेळके आणि भाजपाचे प्रवीण दटके यांच्यात थेट लढत होत आहे. काल सायंकाळी बंटी शेळके प्रचार करत असताना ते अचानक भाजपाच्या संपर्क कार्यालयात पळत पळत गेले.

त्यांनी कार्यालयात अचानक प्रवेश करत तेथील भाजपाच्या कार्यकर्त्यांशी हस्तांदोलन करत त्यांना मिठ्या मारल्या. ज्येष्ठ कार्यकर्त्यांचे आशीर्वाद घेतले आणि काही मिनिटांत ते तिथून आपल्या प्रचारासाठी निघून गेले.



बंटी शेळके यांच्या अचानक केलेल्या कृतीमुळे भाजपा कार्यकर्तेही काही वेळेसाठी चक्रावून गेल्याचे पाहायला मिळाले, पण त्यांनीही बंटी शेळके यांना शुभेच्छा दिल्या.

## कारागृह विभागाचे काम पेपरलेस होणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
इतर विभागांप्रमाणेच आता कारागृह विभागही पेपरलेस होणार आहे. कागदी कार्यवाही करण्याऐवजी आता कारागृह विभागात ई-प्रिझन आयसीजेएस प्रणालीचा उपयोग केला जाईल. एडीजी कारागृह प्रशांत बुरडे आणि डीआयजी स्वाती साठे यांच्या मार्गदर्शनात ई-प्रिझन आयसीजेएस प्रणाली कॉम्प्यूटर लॅबचे बांधकाम डीआयजी पूर्वच्या कार्यालयात करण्यात आले.

नागपूर मध्यवर्ती कारागृहाचे पोलिस अधीक्षक वैभव आगे यांच्या हस्ते या लॅबचे उद्घाटन करण्यात आले. पूर्व विभागाच्या कारागृहांत कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी चार दिवसांचे प्रशिक्षण कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहे. गडचिरोली ते बुलडाणापर्यंत विदर्भाच्या सर्व ११ कारागृहांचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हे प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रणालीमुळे आता कारागृह विभागाचे कार्यालयीन काम पेपरलेस आणि डिजिटल होईल.

# नागपुरात दिग्गजांच्या सभांचा धुरळा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या शेवटच्या आठवड्यात नागपूर व विदर्भात दिग्गज नेत्यांच्या सभा आयोजित करण्यात आल्या आहेत. भाजपचे स्टार प्रचारक व उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची मंगळवारी नागपुरात सभा झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या रविवारी नागपूर ग्रामीणमधील मतदारसंघात दोन सभा होणार आहेत.

नागपूर जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचला आहे. भाजपच्या प्रचारातील भव्य-दिव्यता स्वरूपात दिसत असली तरी महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा संयमी प्रचारही प्रभावीपणे सुरू आहे. प्रचारासाठी केवळ सहा दिवस असल्याने युती आघाडीच्या बड्या नेत्यांचे दौरे नागपूर व ग्रामीणमध्ये आयोजित करण्यात आले आहे.

योगी आदित्यनाथ यांची मंगळवारी सायंकाळी ६ वाजता आवारी चौकात (मध्य व दक्षिण नागपूर मिळून) सभा झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या १७ नोव्हेंबरला नागपूर जिल्ह्यात दोन सभा आहेत. काटोलमध्ये सकाळी ११ वाजता, तर सावनेरमध्ये दुपारी १२.३० वाजता ते सभा घेणार आहेत. हे दोन्ही मतदारसंघ भाजपकडे नाही.

**काँग्रेससह आघाडीची संथगती**

काँग्रेस नेत्यांच्या सभा होत असल्या तरी त्याचा गाजावाजा होताना दिसत नाही. छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूषेशकुमार बघेल नागपूरमध्ये तळ ठोकून आहेत. छोट्या छोट्या सभांच्या माध्यमातून त्यांनी संपूर्ण नागपूर आणि जिल्हा पिंजून काढला आहे. काँग्रेसचे स्टार प्रचारक राहुल गांधी यांची बुलढाणा व गोंदिया या नक्षलप्रभावीत जिल्ह्यातील प्रचार सभा विमानात बिघाडामुळे रद्द करण्यात आली. मविआतील उद्धव ठाकरे पूव विदर्भात दिसले नाहीत. शरद पवार एकदा इकडे येवून गेलेत.

काटोलमध्ये राष्ट्रवादीचे (शरद पवार) नेते व माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे पुत्र सलील देशमुख रिंगणात आहेत तर सावनेरमध्ये काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुनील केदार यांच्या पत्नी अनुजा केदार निवडणूक लढवत आहेत. या दोन्ही जागा भाजपने प्रतिष्ठेच्या केल्या आहेत. त्यामुळे सावनेर व काटोलमध्ये शहा काय बोलतात हे महत्त्वाचे ठरणार आहे. विशेष म्हणजे २०१९ च्या निवडणुकीतही शहा यांनी सावनेर मतदारसंघात सभा घेतली होती. पण, तेथे भाजपचा पराभव झाला होता, हे येथे उल्लेखनीय.

## तलवारीसह रील बनवणे अंगलट

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
तलवारबाजी करतानाची रील बनवून समाज माध्यमांवर टाकणे ५ तरुणांना चांगलेच महागात पडले. ती रील पोलिसांपर्यंत पोहोचली. पोलिसांनी याची गंभीर दखल घेत तपास सुरू केला. दोन अल्पवयीनसह पाचही तरुणांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ६ तलवारीही जप्त करण्यात आल्या. प्रशांत रमेश चट्टे (१९) रा. देवीनगर, दीपक हरीकिशन निमकर (१९) आणि पियूष अतूल साखरे (१९) अशी आरोपींची नावे आहेत.

काही दिवसांपूर्वी वरील आरोपी दोन अल्पवयीन साथीदारांसोबत मिळून उज्जैन येथे फिरायला गेले होते. तेथे सर्वांनी स्थानिक दुकानदाराकडून म्यानसह नवीन तलवारी खरेदी केल्या. त्यानंतर एका खोलीत बसून तलवार आणि तडकफडक गाण्यासह रील बनवली. ती रील आपल्या इंस्टाग्रामवर शेअरही केली. ती रील शेअर होत पोलिसांपर्यंत पोहोचली.

कळमना पोलिसांनी पाचही तरुणांना ताब्यात घेत चौकशी केली. पोलिसांनी त्यांच्या घरांची झडती घेतली असता ६ तलवारी मिळाल्या. पोलिसांनी सर्व तलवारी जप्त करून पाचही आरोपींवर आर्म्स ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

# नगर माहेश्वरी सभेच्या स्नेहसंमेलनात २५०० समाज बांधवांची ऐतिहासिक उपस्थिती









■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :
नगर माहेश्वरी सभा नागपूरच्या वतीने सात रंगांनी सजवलेल्या सप्तरंगी दिवाळी स्नेहस्पर्शचे शुक्रवार, ८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सात वाचन लॉन, भंडारा रोड येथे सुमारे २५०० समाज बांधवांच्या ऐतिहासिक उपस्थितीत आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास आलेल्या समाज बांधवांचे ड्राय फ्रुट देवून तसेच टिळा लावून स्वागत करण्यात आले. स्वागत गेटजवळ मोना दास यांनी फुलांनी काढलेली सुंदर रांगोळी सर्वांना मोहित करत होती. मुस्कान तापडिया (कृष्ण) आणि तनुश्री मोहता (राधा) ही जिवंत पात्रे स्तोत्रांच्या तालावर नाचत त्याच रूपात अंगणात दाखल झाली, त्यावर उपस्थितांनी फुलांचा वर्षाव केला. माहेश्वरी सभेचे सचिव गिरधर चांडक व मुख्य संयोजक शरद टावरी यांनी ही माहिती दिली.

कुंज बिहारीची आरती, गिरधर कृष्ण मुरारीच्या दर्शनाचा आनंद घेत, छप्पन भोग प्रसादी या कार्यक्रमाला नगर माहेश्वरी महिला समितीच्या सर्व कार्यकर्त्यांनी सहकार्य केले. बॉलीवूड गाणी आणि संगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. राजस्थानी फॅशन शोमध्ये एक वर्षाच्या मुलांपासून ते समाजातील ज्येष्ठांपर्यंत ११ जोडप्यांनी भाग घेतला.

माहेश्वरी युथ क्लबच्या रिया लखोटिया, गरिमा हेडा, कृतिका छापरवाल, जान्हवी लद्धड यांनी एक अप्रतिम वेलकम डान्स सादर केले. काजल बागडी आणि तनिषा मोहता यांनी सादर केलेल्या लघुनाट्याने सामाजिक संदेश दिला.

या कार्यक्रमात प्रथम आलेल्या समुदाय सदस्यांसाठी लकी ड्रॉद्वारे आकर्षक भेटवस्तू चांदीची नाणी देण्यात आली. दिवाळी स्नेहस्पर्शच्या सात रंगी कार्यक्रमाची सुरुवात भगवान महेशाच्या सामुहिक पूजेने करण्यात आली .

यावेळी मुख्य अतिथी म्हणून इंदूर निवासी सीए जयंत गुप्ता (माहेश्वरी), नगर माहेश्वरी सभेचे माजी अध्यक्ष, उद्योगपती व समाजसेवक नंदकिशोर सारडा, माहेश्वरी सभेचे अध्यक्ष कमल तापडिया, सचिव गिरधर चांडक, माहेश्वरी महिला समिती अध्यक्ष नीता सारडा, सचिव ज्योती मंत्री, कार्यक्रम प्रभारी निलेश राठी, मुख्य संयोजक शरद टावरी, संयोजिका सविता मुंधडा यांची प्रमुख उपस्थिती होती.

कमल तापडिया यांनी आपल्या स्वागतपर भाषणात सर्व समाज बांधवांचे स्वागत करून दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. पाहुण्यांचे पुष्पगुच्छ, स्कार्फ व स्मृतीचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. नंदकिशोर सारडा यांनी भव्य कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल नगर सभा संघ व आयोजन मंडळाचे अभिनंदन केले.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय कविता टावरी यांनी करून दिला तर स्वागत कमल तापडिया व गिरधर चांडक यांनी केले. मुख्य अतिथी जयंत गुप्ता (माहेश्वरी) यांनी आपल्या भाषणाने समाजातील सदस्यांमध्ये नवीन ऊर्जा आणि प्रेरणा दिली. मुलांचे लग्न त्यांच्याच समाजात व्हावे, यासाठी त्यांनी १६ वर्षांच्या मुलांना प्रवृत्त करण्याविषयी सांगितले.

सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन संयोजक शरद टावरी यांनी केले. मंच व्यवस्थापन गिरधर चांडक यांनी केले.

दीपावली स्नेहस्पर्शची चमू प्रभारी निलेश राठी, मुख्य संयोजक शरद टावरी यांच्यासह त्यांच्या पत्नी कविता टावरी, संयोजक सविता मुंधडा, किशोर भैय्या, जितेंद्र माहेश्वरी, हेमंत भट्टड, सीए अजय राठी, रमाकांत कलंत्री, रिया लखोटिया यांना नगर माहेश्वरी सभेचे पदाधिकारी विजय पनपलिया, सुरेश गांधी आणि विनोद चांडक यांनी कार्य गौरव अभिनंदन स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित केले.

कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक कुकरेजा इन्फ्रास्ट्रक्चर ऑफ पॅरिस सिटीच्या संपूर्ण चमूचे त्यांच्या सहकार्याबद्दल कमल तापडिया आणि सचिव गिरधर चांडक यांनी स्मृतिचिन्ह देऊन गौरवान्वित केले.

सामाजिक एकतेच्या या भव्य कार्यक्रमात अखिल भारतीय माहेश्वरी महासभेचे सहमंत्री दिनेश राठी, विदर्भ विभागीय माहेश्वरी सभेचे ब्रिजगोपाल दरक, सीए राजेश काबरा, अखिल भारतीय युवा संघटनेचे हिमांशू चांडक, नागपूर जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष हरेश सोनी, सचिव सतीश बियाणी, नगर माहेश्वरी सभेचे माजी अध्यक्ष/सचिव मधुसूदन सारडा, अधिकारी. विजय चांडक, मदनमोहन डागा, राकेश भैया, सोमप्रकाश मंत्री, नीरज लखोटिया, विदर्भ विभागीय महिला समितीच्या अध्यक्षा सुषमा बंग, जिल्हा महिला समितीच्या सचिव मीनू भट्टड, नगर माहेश्वरी महिला समितीच्या माजी अध्यक्षा कमलेश बियाणी, कमला मोहता, विद्या लद्धड, आशा दुजारी, ललिता मंत्री, सावित्री पचिसिया, रुपा चांडक, शिवदास राठी, माहेश्वरी पंचायत सीताबर्डीचे विनोद फाफट, बिकानेरी माहेश्वरी पंचायतीचे गिरधर डागा, श्रीकुमार मुंधडा, राज चांडक, बडी मारवाड माहेश्वरी पंचायतीचे पुरुषोत्तम मालू, रामावतार तोतला यांच्यासह नगर माहेश्वरी सभेचे सर्व झोन अध्यक्ष, सचिव तसेच महेश एम. बजाज, आनंद राठी, ओमप्रकाश बंग, योगेश नावंदर, राजकुमार झंवर, पवन बजाज, प्रकाश हेडा, हरीश राठी, आनंद डागा, प्रकाश पनपलिया, अजय नबिरा, अजय डागा, मुकेश राठी , किशोर चांडक, मनीष मालपाणी , श्रीकृष्ण चांडक, अशोक चांडक, योगेश राठी, श्रीकिसन लखोटिया, गोपाल भट्टड, अनिल मंत्री, गोपाल राठी, हेमंत भुतडा, भंवरलाल सारडा, सुभाषचंद्र चांडक, प्रभा भैया, माया तापडिया, संतोष लड्ढा, सुधा चांडक, संदीप साबू, प्रदीप बियाणी आदींची उपस्थिती होती. विनोद चांडक यांनी ही माहिती दिली.